मराठी अस्मितेचा आवाज बुलंद करण्याचे कार्य गेली २७ वर्षे करणारे 'दैनिक वृत्तमानस' आता घरोघरी पोचवण्याचे काम आम्ही करणार आहोत. वाचकांना आमच्या लोकप्रिय दैनिकाची प्रत उपलब्ध होत नसेल तर या दूरध्वनींवर संपर्क साधावा.
**दातार अँड सन्स न्युज पेपर डिस्ट्रिब्युटर्स**
भ्रमणध्वनी - ८६५५१९४४५२, ८५९१६६२६१६,९८६७३०८०६३

मराठी अस्मितेचा बुलंद आवाज.
https://epapervrittamanas. in/
# वृत्तमानस
Email : vrittamanas1@gmail. com
मुंबई/ पालघर | मुंबई, सोमवार, २ सप्टेंबर २०२४ | वर्ष- २९ | अंक - ७४ | पाने- ८ | आर. एन. आय क्र. - ६५६०९/९६ | किंमत : ३ रुपये



'तमाशा कलावंताचा आधारवड' जुन्नरचे 'नेराळे' पान 4

# महाराष्ट्र शिवरायांचा अपमान करणाऱ्यांना कधीही माफ करणार नाही

## 'मविआ'च्या 'जोडे मारो आंदोलना'त ठाकरे गरजले




**प्रतिनिधी**
**मुंबई**

सिंधुदुर्गातील राजकोट किल्ल्यावर उभारलेला छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळला. यानंतर सरकारचा निषेध करण्यासाठी जोडे मारो आंदोलन केले. यावेळी बोलताना उद्धव ठाकरे म्हणाले की, महाराष्ट्र शिवरायाचा अपमान करणाऱ्यांना कधीही माफ करणार नाही. तर नाना पटोले आणि शरद पवार यांनी मालवणमधील पुतळ्याच्या उभारण्यात भ्रष्टाचार झाला आहे. त्यामुळे पुतळा पडला. हा शिवप्रेमींचा अपमान आहे असे म्हणत सरकारवर हल्लाबोल केला.

माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदींनी माफी कशासाठी मागितली? पुतळा पडला म्हणून माफी मागितली की पुतळा बसवताना भ्रष्टाचार झाला म्हणून मागितली? की भ्रष्टाचाऱ्यांवर पांघरूण घालण्यासाठी मागितली, अशी खोचक टीका ठाकरे यांनी केली.

### ..म्हणूनच पुतळा पडला- शरद पवार

खासदार शरद पवार म्हणाले की, वाऱ्यामुळे पुतळा पडला, असे सांगितले जाते. गेटवेवर हा पुतळा 50 वर्षांपासून आहे. पण तो अजूनही टिकून आहे. राज्यातही असे अनेक पुतळे आहेत. मालवणमधील पुतळ्याच्या उभारण्यात भ्रष्टाचार झाला आहे. त्यामुळे पुतळा पडला. हा शिवप्रेमींचा अपमान आहे.

### महाराजांच्या नावाने पेशवाई सुरु- नाना पटोले

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले की, राज्यात आणि देशात शिवद्रोही सरकार आहे. महाराजांच्या नावाने पेशवाई सुरु आहे. कमिशनखोरी आणि भ्रष्टाचार केला. महाराजांचा अपमान करण्याचं काम सरकारने केलं. मालवणमध्ये महाराजांची प्रतिमा पडली. ती फक्त महाराजांची प्रतिमा नव्हती, ती महाराष्ट्राचा धर्म आणि राज्याचा अवमान या सरकारने केला. छत्रपती शिवरायांच्या प्रतिमेचा अवमान सरकारकडून झाला. महाराज आमचे दैवत आहेत, त्यांच्यासमोर आम्ही नतमस्तक झालो. देशातील शिवप्रेमींचा यांनी अवमान केला आहे. जनतेने पुतळा कोसळला त्यांच दिवशी महाराजांची माफी मागत असे शिवद्रोही सरकार पुन्हा येऊ देणार नाही, असा संकल्प केल्याचे नाना पटोले यांनी म्हटले आहे.

## अभ्युदयनगरचा राजा - मुंबईचा रथाधिश जल्लोषात मंडपाकडे...




**मुंबई: 'अभ्युदयनगरचा राजा' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या बाप्पाला मुंबईचा रथाधिश या उपाधीने गौरविण्यात येते. यंदा या बाप्पाच्या आगमनाचा रथ भव्यदिव्य हनुमानाची सुंदर, विलोभनीय मूर्तीने सजविला आहे. यंदाच्या मिरवणुकीचे विशेष म्हणजे महिला आणि मुलींचे समाजातील आणि मानवजातीतील अमूल्य महत्व सांगणारे संदेश देणारे फ्लेक्स हाती घेऊन महिला आणि मुली बाप्पाच्या परेल वर्क्सशॉपमधून निघालेल्या आगमन मिरवणुकीत सहभागी झाले होते. मूर्तिकार : विफुल जाधव**

**फोटो -अनिल पानस्कर**

## म ह त्त्वा चे

### येत्या 3 महिन्यांत वंदे भारत स्लीपर होणार लाँच

**बंगुळुरु :** केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी रविवारी वंदे भारत स्लीपर ट्रेनच्या पहिल्या मॉडेलची झलक दाखवली. ते बंगुळुरु येथील भारत अर्थ मूव्हर्स लिमिटेड (BEML) च्या कारखान्यात ट्रेनची पाहणी करण्यासाठी आले होते.त्यांनी सांगितले की, वंदे भारत स्लीपर ट्रेन येत्या ३ महिन्यांत सुरू होईल. कोचच्या निर्मितीचे काम पूर्ण झाले आहे. तो काही दिवसांत बीईएमएल कारखान्यातून बाहेर येईल. पुढील २ महिने ट्रेनची चाचणी सुरू राहणार आहे. त्यानंतर ही ट्रेन प्रवाशांसाठी सुरू करण्यात येणार आहे.रेल्वेमंत्र्यांनी सांगितले की, वंदे भारत स्लीपर ट्रेन ८०० ते १२०० KM अंतर प्रवास करण्यासाठी तयार करण्यात आली आहे. रात्री 10च्या सुमारास प्रवासी त्यात चढतील आणि सकाळी त्यांच्या गंतव्यस्थानी पोहोचतील. ही ट्रेन मध्यमवर्गीयांसाठी बनवण्यात आली आहे. त्याचे भाडे राजधानीइतकेच असेल.

### केसी त्यागी यांनी सोडले जेडीयूचे राष्ट्रीय प्रवक्तेपद

**पाटणा :** जेडीयूचे ज्येष्ठ नेते केसी त्यागी यांनी वैयक्तिक कारणास्तव पक्षाच्या राष्ट्रीय प्रवक्तेपदाचा राजीनामा दिला आहे. त्यांच्या जागी पक्षाने राजीव रंजन यांना राष्ट्रीय प्रवक्ते बनवले आहे. पक्षाचे सरचिटणीस अफाक अहमद खान यांनी पत्र जारी करून ही माहिती दिली आहे.पत्रात लिहिले आहे की, 'जेडीयूचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीश कुमार यांनी राजीव रंजन प्रसाद यांची राष्ट्रीय प्रवक्ता पदावर नियुक्ती केली आहे. केसी त्यागी यांनी वैयक्तिक कारणामुळे राजीनामा दिला आहे.पक्ष वैयक्तिक कारणांमुळे हा राजीनामा म्हणत असला तरी, जेडीयूचा दीर्घकाळ प्रमुख चेहरा असलेल्या केसी त्यागी यांना नुकत्याच केलेल्या वक्तव्यांमुळे राजीनामा द्यावा लागल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे. पक्षाच्या अधिकृत कार्यपद्धतीपेक्षा वेगळ्या असलेल्या अग्निवीरसह विविध योजना आणि मुद्द्यांवर त्यांनी प्रश्न उपस्थित केल्याचीही चर्चा आहे.पक्षनेतृत्व आणि वरिष्ठ नेत्यांशी सल्लामसलत न करता त्यांनी अनेक प्रसंगी विधाने केली. त्यामुळे पक्ष आणि त्याचा घटक पक्ष भाजपमध्ये नाराजी आहे.

# राष्ट्रवादीचे माजी नगरसेवक वनराज आंदेकर यांच्यावर गोळीबार, उपचारादरम्यान मृत्यू

**प्रतिनिधी**
**पुणे**

राष्ट्रवादीचे माजी नगरसेवक वनराज आंदेकर यांच्यावर पिस्तुलातून गोळीबार करण्यात आल्याची खळबळजनक घटना रविवारी रात्री नाना पेठेत घडली. आंदेकर यांच्यावर गोळीबार करणाऱ्या हल्लेखोराचा पोलिसांकडून शोध घेण्यात येत आहे. आंदेकर यांना खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. गणेशोत्सवाच्या तोंडावर माजी नगरसेवकारवर गोळीबार करण्यात आल्याने मध्यभागात घबराट उडाली.

वनराज आंदेकर रविवारी रात्री साडेआठच्या सुमारास नाना पेठेतील डोके तालीम परिसरात थांबले होते. त्यावेळी त्यांच्यावर हल्लेखोराने पिस्तुलातून पाच ते सहा गोळ्या झाडल्या. गोळीबार झाल्याची माहिती मिळाल्यानंतर परिसरात घबराट उडाली. गोळीबाराच्या घटनेपूर्वी डोके तालीम परिसरातील वीज पुरवठा खंडीत झाला होता. या घटनेची माहिती मिळताच गुन्हे शाखेतील अधिकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली. वनराज यांच्यावर वैमनस्यातून गोळीबार झाल्याची माहिती पोलिसांनी दिली. गोळीबारामागचे कारण समजू शकले नाही. वर्चस्वाच्या वादातून गोळीबार करण्यात आल्याची माहिती पोलिसांनी दिली. नाना पेठेत आंदेकर टोळीचा दबदबा आहे.

# निवडणुकीत महाविकास आघाडीला जनताच जोडे मारणार - मुख्यमंत्री

## शिवराय आमच्या अस्मितेचा विषय, पण विरोधकांचे राजकारण दुर्दैवी



**प्रतिनिधी**
**मुंबई**

छत्रपती शिवाजी महाराज हे आमच्यासाठी राजकीय मुद्दा नसून ते आमच्या अस्मितेचा विषय आहेत. मात्र विरोधकांकडून या घटनेचे राजकारण केले जात आहे. हे अतिशय दुर्दैवी असल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले.

शिंदे पुढे म्हणाले की, महाविकास आघाडीचं हे आंदोलन राजकीय हेतूने प्रेरित आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळला ही अतिशय वाईट आणि दुःखद घटना आहे. आमच्यासाठी ही अत्यंत संवेदनशील बाब आहे. तमाम महाराष्ट्रातील शिवभक्त या घटनेने भावनिक झाले आहेत.

कर्नाटकात काँग्रेस सरकारने बुलडोझर लावून छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा जेसीबी लावून तोडण्यात आला. आता तेच काँग्रेसवाले आंदोलन करत आहेत. या काँग्रेसवाल्यांनाच खरंतर जोड्याने किंवा चपलेने मारलं पाहिजे. ते सोडून आता मुंबईत आंदोलन करत आहेत. मात्र महाराष्ट्राची जनता समजदार आहे. त्यांना पराभव दिसू लागला आहे. येत्या निवडणुकीत महाविकास आघाडीला जनता जोड्याने मारणार असल्याचेही एकनाथ शिंदे म्हणाले.

मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेच्या विरोधात हे लोक कोर्टात गेले. आधी मुंबई उच्च न्यायालयात गेले, आता नागपूर खंडपीठात गेले. गरीब भगिनींना आम्ही पैसे देत आहोत तर यांच्या पोटात का दुखतं? असा सवालही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केला आहे. तसेच यावरुन यांची मानसिकता समजत असल्याचेही शिंदे म्हणाले.

# मुंबईत भीषण अपघात, टेम्पोची ट्रकला धडक

## तिघांचा दुर्दैवी मृत्यू, 3 गंभीर जखमी



**प्रतिनिधी**
**मुंबई**

मुंबईच्या आरसीएफ पोलिस स्टेशनच्या हद्दीत भीषण अपघात झाला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, दुपारी 1.50 च्या सुमारास गवहापाडा-शंकर देव रस्त्यावर क्वालिस गाडीच्या चालकाचा नियंत्रण सुटून गाडी पलटी होत थेट एका टँकरवर धडकली. या गाडीत एकूण सहा प्रवासी होते व सर्व एकाच परिसरातील रहिवासी आहेत. या अपघातात तिघांचा दुर्दैवी मृत्यू झाला असून तिघे भीषण जखमी आहेत. जखमींना तातडीने जवळच्याच रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

समृद्धी महामार्गावर पुन्हा एकदा भीषण अपघात झाला आहे. छत्रपती संभाजीनगरजवळ आयशर ट्रक आणि टेम्पो ट्रॅव्हलरमध्ये हा अपघात झाला आहे.समृद्धी महामार्गावर उभ्या असलेल्या आयशर ट्रकला टेम्पो ट्रॅव्हलरने पाठिमागून जोरदाची धडक दिली, हा अपघात इतका भीषण होता की त्यामध्ये टेम्पो ट्रॅव्हलरच्या समोरील भागाचा चुराडा झाला आहे.

दरम्यान या टेम्पो ट्रॅव्हलरमधून एकूण 15 प्रवासी प्रवास करत होते, या अपघातामध्ये हे 15 प्रवासी गंभीर जखमी झाले आहेत. पहाटे साडेचारच्या सुमारास हा अपघात झाला आहे. जखमींना स्थानिकांच्या मदतीने तातडीने उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे, जखमींपैकी चालक आणि वाहकाची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती समोर येत आहे.

# प्रलंबित खटले हे न्यायव्यवस्थेसाठी मोठे आव्हान - राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू




**वृत्तसंस्था**
**नवी दिल्ली**

प्रलंबित खटले आणि अनुशेष (बॅकलॉग) हे न्यायव्यवस्थेसमोर मोठे आव्हान असल्याचे राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी रविवारी सांगितले. बलात्कारासारख्या प्रकरणांमध्ये न्यायालयाचा निर्णय एक पिढी उलटून गेल्यावर येतो, तेव्हा न्यायप्रक्रियेत संवेदनशीलता उरलेली नाही, असे सर्वसामान्यांना वाटते.

राष्ट्रपती मुर्मू यांनी रविवारी नवी दिल्लीतील भारत मंडपम येथे जिल्हा न्यायपालिकेच्या राष्ट्रीय परिषदेच्या समापन कार्यक्रमाला उपस्थिती लावली. यावेळी त्या बोलत होत्या.

सरन्यायाधीश डीवाय चंद्रचूड आणि केंद्रीय कायदा व न्याय राज्यमंत्री (स्वतंत्र प्रभार) अर्जुन राम मेघवाल हेही या कार्यक्रमाला उपस्थित होते. या कार्यक्रमात मुर्मू यांच्या हस्ते सर्वोच्च न्यायालयाच्या ध्वजाचे आणि चिन्हाचे प्रकाशनही करण्यात आले. या कार्यक्रमात राष्ट्रपती मुर्मू यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या ध्वजाचे प्रकाशन केले.

मुर्मू म्हणाल्या की, न्यायालयांमध्ये तात्काळ न्याय मिळण्यासाठी खटल्यांची सुनावणी पुढे ढकलण्याची संस्कृती संपवली पाहिजे. त्यासाठी आवश्यक ते सर्व प्रयत्न झाले पाहिजेत. न्यायाचे रक्षण करणे ही या देशातील सर्व न्यायाधीशांची जबाबदारी आहे.

राष्ट्रपती म्हणाल्या की, सामान्य माणसाची कोर्टरूममध्ये येताच तणावाची पातळी वाढते. त्याला 'ब्लॅक कोट सिंड्रोम' असे नाव दिले आणि त्याचा अभ्यास करावा असे सुचवले. न्यायव्यवस्थेत महिला अधिकाऱ्यांच्या वाढत्या संख्येबद्दलही त्यांनी आनंद व्यक्त केला. राष्ट्रपती म्हणाल्या की, गावातील लोक न्यायव्यवस्थेला दिव्य मानतात कारण त्यांना तिथे न्याय मिळतो. एक म्हण आहे - भगवान के पास देर है, पर अंधेर नही. पण किती दिवस? याचा विचार करायला हवा.

# भाजपा सत्तेत असताना अल्पसंख्यांक अन् मुस्लिमांवर अधिक हल्ले ; राहुल गांधींची टीका


**वृत्तसंस्था**
**नवी दिल्ली**

बीफ नेत असल्याच्या संशयावरून एका ज्येष्ठ नागरिकाला पाच-सहा तरुणांनी बेदम मारहाण केल्याची घटना धुळे-मुंबई एक्स्प्रेसमध्ये घडली. तसेच हरियाणा येथील चरखी-दादरी येथे झालेल्या मारहाणीच्या घटनेवरून राहुल गांधी यांनी सत्ताधारी भाजपा सरकारवर जोरदार हल्लाबोल केला आहे. एक्सवर एक पोस्ट करत काँग्रेस खासदार आणि विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी भाजपा सरकारवर टीकास्त्र सोडले. तसेच भाजपा सत्तेत असताना अल्पसंख्यांक अन् मुस्लिमांवर अधिक हल्ले होत आहेत, असा मोठा आरोपही केला आहे.

एक्सवर केलेल्या पोस्टमध्ये खासदार राहुल गांधी म्हणतात की, द्वेषाचा राजकीय शस्त्र म्हणून वापर करून सत्तेच्या शिडीवर चढलेले लोक देशभरात सतत भीतीचे वातावरण प्रस्थापित करत आहेत. जमावाच्या रूपात लपलेले द्वेषी घटक कायद्याला आव्हान देत जाहीरपणे हिंसाचार पसरवत आहेत. या उपद्रवी घटकांना भाजपा सरकारकडून मोकळे रान देण्यात आले आहे. त्यामुळेच त्यांनी हे असे धाडस दाखवले आहे. असा आरोप राहुल गांधी यांनी केला.

# महायुतीच्या बैठकीत 173 जागांवर एकमत

## जागावाटपाची 10 सप्टेंबरला होणार घोषणा



**प्रतिनिधी**
**नागपुर**

राज्यात लवकरच विधानसभा निवडणूक होणार आहे. त्यामुळे जागावाटपात आता महायुतीने आघाडी घेतली आहे. लोकसभेवेळी जागावाटप करण्यास महायुतीला विलंब झाला होता. त्याचा फटका बसला होता. त्यामुळे आता जागावाटप निश्चित करण्याची लगबग सुरु झाली आहे. शुक्रवारनंतर नागपूरमध्ये शनिवारी रात्री उशिरा महायुतीची बैठक झाली. त्यामध्ये जागावाटप जवळपास अंतिम टप्प्यात आले असून येत्या 10 सप्टेंबरपर्यंत घोषणा करण्यात येणार असल्याचे भाष्य भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले.

लोकसभा निवडणुकीत महायुतीला मोठा फटका बसला होता. या फटक्यानंतर राज्यात होणाऱ्या विधानसभेसाठी तयारी जोरात सुरु आहे. आता जागावाटप लवकर मार्गी लावायचे असे महायुतीने ठरवल्याचे दिसत आहे. येत्या 10 दिवसांत महायुतीचे जागावाटप पूर्ण होण्याची शक्यता असल्याचे भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले.

नागपुरात शनिवारी रात्री उशिरापर्यंत महायुतीची एक महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार उपस्थित होते. त्यासह भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, प्रफुल्ल पटेल देखील उपस्थित होते.

या बैठकीत जागावाटपावर चर्चा झाली. दरम्यान या बैठकीत भाजपला जास्त जागा देण्याबाबत चर्चा झाली असल्याचे समजते. मात्र कोणत्या पक्षाला किती जागा मिळणार यावर अजून फायनल निर्णय झालेला नाही.

जागावाटप निश्चित करण्यासाठी चर्चेच्या आणखी दोन ते तीन बैठकीच्या फेऱ्या होऊ शकतात. हे जागावाटप करताना महायुतीच्या इतर मित्रपक्षांचा देखील विचार करण्यात येणार असल्याचे चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले. जागावाटप कोणता पक्ष कोणती जागा जिंकण्याची क्षमता राखतो, त्यानुसार केले जाणार आहे.

महायुतीच्या बैठकीत 288 पैकी जवळपास 173 जागांवर एकमत झाले आहे. तर उर्वरित 115 जागांवर अद्याप निर्णय होणे बाकी आहे.

# करंजा बंदर देशातील मोठे 'फिशिंग हार्बर' म्हणून विकसित करणार

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची ग्वाही



**प्रतिनिधी**
**उरण**

रायगड जिल्ह्यातील करंजा येथे एक हजार मच्छीमार बोटी क्षमतेचे मच्छीमार बंदर उभारणीचे कामाला गती देण्यात येणार असून त्यासाठी १५३ कोटींचा निधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. याशिवाय याठिकाणी अत्याधुनिक अशी जेटी तयार करण्यात येणार असून, हे बंदर देशातील सर्वात मोठे फिशिंग हार्बर म्हणून विकसित करण्यासाठी राज्यशासन प्रयत्नशील असल्याचे प्रतिपादन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

उरण नगरपरिषदेच्या नवीन प्रशासकीय इमारत, सावित्रीबाई फुले फुल मार्केट आणि भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर भवन आणि समाज विकास केंद्र, उरण टाऊन हॉल यांचे लोकार्पण आणि उपजिल्हा रुग्णालय भूमिपूजन,उरण चारफाटा येथील मच्छिमार्केटचे उदघाटन यांसह विविध विकास कामांचा शुभारंभ उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज उरण येथे झाला. यावेळी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर उद्योग मंत्री तथा रायगड जिल्ह्याचे पालकमंत्री उदय सामंत,लोकनेते रायगडचे माजी खासदार रामशेठ ठाकूर मावळचे खा. श्रीरंग बारणे,आ. प्रशांत ठाकूर,आ.रविंद्र पाटील,आ. महेश बालदी, जिल्हाधिकारी किशन जावळे,रायगड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.भरत बास्टेवाड यांसह विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, न्हावा - शिवडी अटल सेतूमुळे जिल्ह्याच्या विकासाला चालना मिळाली आहे. भविष्यात उद्योगाचे खरे मॅग्नेट रायगड जिल्हा होणार आहे. यामुळे जिल्ह्यात मोठया संधी निर्माण होणार आहेत.नवी मुंबई विमानतळामुळे जी डी पी मध्ये १ टक्के वाढ होणार आहे. डेटाचे हब म्हणून रायगड आणि नवी मुंबईची ओळख निर्माण झाली आहे. या दोन भागांमधून मोठ्या प्रमाणात डेटाची निर्मिती होत असून देशपातळीवर डेटा सेंटर्सची ६० टक्के क्षमता ही रायगड आणि नवी मुंबईत आहे.त्यामुळे या पुढील काळात महाराष्ट्राचे ग्रोथ इंजिन म्हणून रायगड जिल्हा होत असल्याचेही उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी म्हटले आहे.

मच्छीमारांचे हित जोपासत वाढवण बंदराची उभारणी करण्यात येत आहे. या बंदरामुळे निर्यात क्षमता वाढणार आहे. ग्लोबल सप्लाय चेनचा भाग आपण आता झालो आहोत असे उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सांगितले.आ. महेश बालदी हे अतिशय अभ्यासू लोकप्रतिनिधी आहेत. त्यांनी अतिशय कल्पकतेने मतदार संघात दर्जेदार व उत्कृष्ट विकासकामे केली आहेत. त्यांच्या प्रत्येक विकासकामासाठी पुरेसा निधी आणि आवश्यक ते सर्व सहकार्य करण्यात येईल. उरणच्या विकासासाठी सर्वोतोपरी सहकार्य करण्यात येईल अशी ग्वाही उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी दिली.

यावेळी पालकमंत्री उदय सामंत म्हणाले मच्छिमारांचे प्रश्न सोडविण्यासाठी आ. महेश बालदी सातत्याने आग्रही आहेत. उरण मध्ये सर्वसमावेशक विकास कामाना प्राधान्य देण्यात आले आहे. उरणच्या सर्वांगीण विकासाला चालना देण्याचे काम आ. बालदी यांनी केले आहे. उरणच्या विकासासाठी जिल्हा वार्षिक नियोजनाच्या माध्यमातून निधी देण्यात येईल असेही त्यांनी यावेळी सांगितले.

## राजस्थानमधील गुंतवणुकीसाठी 4.5 लाख कोटी रुपयांचे सामंजस्य करार

**मुंबई:** 'रायझिंग राजस्थान' ग्लोबल इन्व्हेस्टमेंट समिट २०२४ ची पहिली 'गुंतवणूकदार बैठक' आज माननीय मुख्यमंत्री भजन लाल शर्मा यांच्या नेतृत्वाखाली भारताची आर्थिक राजधानी मुंबई येथे यशस्वीरित्या पार पडली. या 'गुंतवणूकदार मेळाव्या' दरम्यान, राजस्थानमधील गुंतवणुकीसाठी राज्य सरकारच्या ब्युरो ऑफ इन्व्हेस्टमेंट प्रमोशन आणि विविध उद्योगपती यांच्यात ४.५ लाख कोटींहून अधिक किमतीचे सामंजस्य करार करण्यात आले. यावेळी माननीय मुख्यमंत्री, राजस्थान सरकारचे उद्योग आणि वाणिज्य मंत्री, कर्नल राज्यवर्धन राठोड यांच्या व्यतिरिक्त उपस्थित होते. या 'गुंतवणूकदार मेळाव्या'मध्ये उद्योग आणि व्यवसाय जगतातील अनेक नामवंत व्यक्तींनी सहभाग घेतला आणि यादरम्यान अक्षय ऊर्जा, सिमेंट, रसायने आणि पेट्रोकेमिकल्स, नागरी विमान वाहतूक आणि ITI च्या अपग्रेडेशन यांसारख्या अनेक क्षेत्रात गुंतवणुकीसाठी सामंजस्य करार करण्यात आले.




## थोडक्यात

### वाळूमाफियांचा मोर्चा दगड गोट्यांवर

**मनोर:** सक्शन पंपाच्या साह्याने बेसुमार रेती उपसा केल्यानंतर रेतीमाफियांनी वैतरणा खाडीतील दगड गोट्यांकडे मोर्चा वळवला आहे. दगड-गोट्यांपासून तयार केलेल्या रेतीविक्रीचा अनधिकृत व्यवसायाने अलीकडे जोर धरला आहे. खाडीतून निघालेल्या ठिसूळ दगड-गोट्यांपासून रेती तयार करण्यासाठी महामार्गालगत क्रशन प्लांट उभे केले आहेत. दगड गोट्यांची बेकायदा वाहतूक, त्यापासून तयार केलेल्या रेतीची विक्री आणि वाहतूक होत असताना जिल्हा खनिकर्म अधिकारी आणि भरारी पथकाकडून दुर्लक्ष होत आहे. यात सरकारचा कोट्यवधी रुपयांचा महसूल बुडत आहे. त्यामुळे दगड गोट्यांची वाहतूक आणि क्रशर प्लांटवर कारवाईची मागणी जोर धरत आहे. पालघर तालुक्यातील हालोली पाटील पाड्याच्या हद्दीत खडीपासून रेती तयार करण्यासाठी क्रशर प्लांट सुरू करण्यात आले आहेत. वैतरणा खाडीतील दगड-गोट्यांचा वापर करून रेती तयार केली जात आहे.

### आश्रम शाळेतील विद्यार्थिनीचा आत्महत्येचा प्रयत्न

**कासा:** : डहाणू तालुक्यातील रानशेत येथील आश्रमशाळेतील दहावीत शिकणाऱ्या विद्यार्थिनीने आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. ही घटना रविवारी घडली. या १६ वर्षीय विद्यार्थिनीने बाथरूममध्ये ओढणीच्या साहाय्याने गळफास घेण्याचा प्रयत्न केला; परंतु तिच्या सहकाऱ्यांच्या प्रसंगावधानामुळे तिचा जीव वाचला..बेशुद्ध अवस्थेत या विद्यार्थिनीला कासा उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. तिची प्रकृती चिंताजनक असल्यामुळे तिला पुढील उपचारासाठी वलसाड येथे हलविण्यात आले आहे. रानशेत आश्रमशाळेत हजारो विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. त्यामुळे या निवासी शाळेत २४ तास सुरक्षा रक्षकाची नेमणूक करण्याची मागणी येथील ग्रामस्थांनी केली. दरम्यान, पालघर विधानसभेचे माजी आमदार अमित घोडा यांनी या शाळेत भेट देत या घटनेची माहिती घेतली.

### अवयवदानातून चौघांना जीवदान

**मुंबई:** चक्कर येऊन कोसळल्याने रुग्णालयात दाखल झालेल्या एका ४३ वर्षीय व्यक्तीचा मेंदू मृत झाला होता. या व्यक्तीच्या अवयवदानातून चौघांना जीवदान मिळणार आहे. सिव्हिल इंजिनिअर शिबिन सुकुमारन चक्कर येऊन कोसळल्याने ठाण्याच्या ज्युपिटर रुग्णालयात दाखल होते. डॉक्टरांनी केलेल्या तपासणीनंतर त्यांच्या मेंदूत गुठळ्या असल्याने शस्त्रक्रिया करण्यात आली होती; मात्र त्यानंतरही रुग्ण बरा झाला नसल्याने कुटुंबीयांच्या संमतीनंतर हृदय, यकृत आणि दोन मूत्रपिंडांचे दान करण्यात आले.

**महत्त्वपूर्ण निवेदन**

वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीचा मजकूर स्वीकारण्यापूर्वी काळजी घेतली जात असली तरी त्याच्या आशयाची पडताळणी करणे शक्य होत नाही. तरी आपल्या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील जाहिरातदार कंपन्या, सहयोगी संस्था अथवा व्यक्तीबरोबर व्यवहार केल्यामुळे कोणत्याही स्वरूपाचे नुकसान व हानी झाल्यास त्यासाठी अथवा संबंधित जाहिरातीतील आशयासाठी मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.ला जबाबदार ठरविता येणार नाही. त्यामुळे जाहिरातदारांना कोणतीही रक्कम प्रेषित करण्यापूर्वी अथवा त्याच्याबरोबर कोणत्याही स्वरूपाचे संमतिपत्र कार्यसिद्ध करण्यापूर्वी अथवा एखाद्या जाहिरातीवर आधारित कोणतीही कृती करण्यापूर्वी वाचकांनी आवश्यकती चौकशी करण्याची खबरदारी घ्यावी.

## विधानसभा निवडणुकीच्या पूर्वसंध्येला अनधिकृत बांधकामांचा मुद्दा गाजणार?

# पेल्हारमधील अनधिकृत बांधकामं उच्च स्तरीय चौकशीच्या फेऱ्यात?

प्रतिनिधी
■ वसई

वसईतील अनधिकृत बांधकामं आणि त्यांना मिळत असलेला राजाश्रय आता लपून राहीलेला नाही. त्याची अनुभूती लोकसभा निवडणुकीच्या पूर्वसंध्येला आली. भाजपाने अनधिकृत बांधकामांतून होणाऱ्या वसुल्या या बहुजन विकास आघाडीसाठी होत असल्याचा थेट यार्कर एका पत्रकार परिषदेत टाकत बविआलाच कोंडित पकडले होते. तसेच उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणविस यांच्याकडे याप्रश्नी चौकशीची मागणी केली होती. याच धर्तीवर आता पेल्हारमधील अनधिकृत बांधकामांचा मुद्दा गाजणार असून ही अनधिकृत बांधकामं उच्च स्तरीय चौकशीच्या फेऱ्यात अडकणार आहेत, अशी चर्चा आहे.



पेल्हार विभागात अनधिकृत बांधकामांचा जोर वाढला आहे. येथील भूमाफिया हे प्रत्येक राजकारण्यांना अनधिकृत बांधकामांसाठी विशेष रसद पुरवत आहेत, असा आरोप होत आहे. वसईतील बरेचसे भूमाफिया एका विशिष्ट पक्षाकडे वळले होते. मात्र आता या भूमाफियांतच दुफळी माजली असल्याने प्रत्येक भूमाफिया विविध राजकर्त्यांच्या आश्रयाला गेला आहे. या राजकीय पक्षांना त्यासाठी भूमाफियांकडून विशेष रसद पुरवली जात आहे. अनधिकृत बांधकामांतून मोठ्या प्रमाणात झेड फंड वसुल करण्याचे काम राजकीय मंडळींच्या दबावाने होत असल्याचा आरोप यापूर्वीच झाला आहे. त्याच धर्तीवर वसईतील प्रामुख्याने पेल्हारमधील अनधिकृत बांधकामांसंदर्भात होत असलेल्या आर्थिक स्वरूपाच्या देवाणघेवाणीचा व्यवहार याप्रश्नी वसईतील एक मोठा पक्ष ईडीकडे चौकशीसाठी मागणी करणार आहे.

त्यामुळे अनधिकृत बांधकामांतून मोठ्या प्रमाणात वसुल्या केलेले राजकीय नेते व पालिका अधिकारी यांच्यासमोरील अडचणी वाढणार आहेत. विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर पेल्हारमधील अनधिकृत बांधकामांचा मुद्दा पेटणार असून त्याची उच्चस्तरीय चौकशी होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

## मंत्र्यांचे दौरे असल्यावर महामार्ग सुसाट

● इतर वेळेस वाहतुककोंडीने फुललेला महामार्ग
● वाहनचालकांत संताप

प्रतिनिधी
■ वसई

मंत्र्यांसंत्र्यांचे दौरे असले की मुंबई-अहमदाबाद महामार्गावर मोठ्या प्रमाणात अगदी दिड -दोन किलोमीटरवर पोलीस बंदोबस्त ठेवून वाहतुकीचे नियोजन केले जाते. या दौऱ्यावेळी महामार्ग हा सुपरफास्ट असतो. मात्र इतरवेळेस महामार्ग हा वाहतुककोंडीने फुललेला असतो. मंत्र्यांना एक न्याय आणि सर्वसामान्य जनतेला वेगळा न्याय असे चित्र असल्याने नागरिकांनी आणि वाहनचालकांनी तिव्र संताप व्यक्त केला आहे.

सध्या महामार्गाचे सिमेंट काँक्रिटीकरणचे काम सुरू आहे. या काँक्रीटीकरण कामात योग्य तो नियोजनाचा अभाव असल्याने वाहनचालकांना अनेक अडचणिंचा सामना करावा लागत आहे. पोलीस, वाहतूक पोलीस महामार्गावरून गायब असल्याने वाहतुककोंडित सर्वसामान्य नागरिकांचा जीव कोंडीत अडकला आहे. तसेच पालघरमध्ये नुकतेच वाढवण बंदराचा भूमीपूजन सोहळा पार पडला. या प्रस्तावित बंदराच्या भूमीपुजनसाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी हे स्वत: आले होते. ते येणार म्हणून महामार्गावर कडेकोट सुरक्षा ठेवण्यात आली होती. तसेच कोठेही वाहतुककोंडी उद्भवणार नाही यासाठी महामार्ग पोलिसांनी खास खबरदारी घेतली होती. त्यामुळे महामार्गाने पंतप्रधानांच्या दौऱ्यावेळी वाहतुककोंडीतून मोकळा श्वास घेतला होता.

मंत्री-संत्री दौऱ्यावरच आल्यावर चांगले नियोजन करायचे आणि इतर वेळी हे प्रशासन महामार्गावरील कोंडी सोडवण्यासाठी जाते कोठे? असा संतप्त सवाल नागरिकांकडून विचारला जात आहे. भारत हे लोकशाहीयुक्त राष्ट्र आहे. मात्र मंत्री-संत्री या देशाचे मालक आणि जनता कोण? जनता खऱ्या अर्थाने या देशाची मालक असताना नोकरांना व्हीआयपी ट्रीटमेंट देणाऱ्या प्रशासनाविरोधात तिव्र नाराजी व्यक्त होत आहे.

## नायगाव पूर्वेत विजेचा खेळखंडोबा; नागरिक त्रस्त

● वीज वितरण कर्मचाऱ्यांना खाजगी कामे प्रिय
● तक्रार निवारण फोन नेहमीच बंद

■ वसई

नायगाव पूर्वेत सध्या विजेच्या सततच्या लपंडावाने नागरिक हैराण झाले आहेत. सततच्या विजेच्या खेळखंडोब्यामुळे नागरिकांना दैनंदीन व्यापाला सामोरे जावे लागत आहे. तर येथील वीज वितरण महामंडळाचे कर्मचारी खाजगी कामे कशी मिळतील यावर डोळा ठेवून असल्याने ग्राहकांना विजेसंदर्भात अनेकदा तक्रारींचा सामना करावा लागतो.

नायगाव पुर्व परिसरात सध्या विजेच्या लपंडावामुळे नागरिकांना मनस्ताप सोसावा लागत आहे. बत्ती गुल अवस्थेमुळे नागरिकांची कामे खोळंबत आहेत. याबाबत वीज वितरण महामंडळाच्या कार्यालयातील तक्रार निवारण केंद्रावर संपर्क साधल्यावर तेथील फोन सतत बंद येतो. त्यामुळे तक्रारदारांना थेट अडचणिंचा सामना करावा लागत आहे. तर वीज वितरण महामंडळातील कर्मचारी स्टार सिटी येथील चहा टपरीवर बसून खाजगी कामे मिळवण्यात व्यस्त असतात. सध्या पावसाळ्यात विजेसंदर्भात अनेक तक्रारी कार्यालयाकडे येतात. मात्र त्या तक्रारींकडे लक्ष न देता बेकायदा चाळींना वीज जोडणी देण्याकडे वीज वितरण महामंडळाच्या कर्मचाऱ्यांचा कल दिसून येतो.

वीज वितरण महामंडळाच्या कारभारामुळे येथील नागरिकांत कमालीची नाराजी आहे. सध्या गणेशोत्सव तोंडावर आला आहे. त्यामुळे सणाच्या पार्श्वभूमीवर तरी कर्मचाऱ्यांनी वीज विषयक समस्यांचे निराकरण करावे, अशी मागणी येथील नागरिकांनी केली आहे.

## म्युनिसिपल बँकेच्या कारभारात हवी पारदर्शकता; सभासदाची मागणी

प्रतिनिधी
■ मुंबई

मुंबई महानगर पालिकेच्या अधिकारी/कर्मचारी वर्गाकरीता निर्माण झालेल्या दि म्युनिसिपल को. ऑप. बँकेच्या कारभारात पारदर्शकता हवी अशी मागणी सभासदांमार्फत करण्यात येत आहे. याबाबत बँकेचे सभासद रुपेश पुरळकर संजय जाधव, मनोज सागरे,यांनी बँकेच्या जी/ साउथ परेल नाम जोशी मार्ग शाखा व्यवस्थापक आणि जी नॉर्थ शाखा व्यवस्थापकांना दिलेल्या मागणी अर्जानुसार गेल्या ७० वर्षापासून दि म्युनिसिपल को. ऑप. बँक लि. ही बँक पालिका कर्मचार्यांना कर्जवाटप करीत आहे. गेल्या काही वर्षात बँकेची उलाढाल ७००० कोटीची झाली आहे. परंतु संचालक मंडळाच्या गलथान कारभारामुळे बँकेचे एनपीए कर्ज १३० कोटीचे झाले आहे. काही सभासदांना विना जामीनदार कर्जाचे वाटप करण्यात आले आहे. कर्जबुडव्यांवर कायदेशीर नोटीस बजावणे अथवा त्यांची मालमत्ता जप्तीची कारवाई करण्यात उदासीनता दाखवित असल्याची खंत पुरळकर यांनी व्यक्त केलेली आहे.

कर्जबुडव्यांच्या वाढत्या आलेखामुळे सभासदांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून कर्जाच्या विम्यावर सुरक्षा कवच मिळावे, कर्ज बुडव्यांकडून थकित रक्कम वसूल करण्यात यावी आणि बँकेच्या कारभारात पारदर्शकता यावी 2020 ते 2024 यांच्या सिबिल संदर्भात लोन प्रकरणाची मंजूर करण्यात आली याची सखोल चौकशी करण्यात यावी.

## वसई दोन ठिकाणी खैर तस्करी उघड, लाखोचा मुद्देमाल जप्त

प्रतिनिधी
■ वसई

वसई तालुक्यात मुंबई-अहमदाबाद महामार्गावर वनविकास महामंडळाच्या मांडवी, शिरसाड, व गणेशपुरी या वन परीक्षेत्रातील अधिकाऱ्यांना होणारी अवैध खैर तस्करी रोखण्यास यश आले असून त्यांनी केलेल्या दोन कारवाईत दोन वाहनासह लाखोचा मुद्देमाल जप्त केला आहे.दरम्यान, या कारवाईचा तस्करांना सुगावा लागल्याने अंधाराचा फायदा घेत त्यांनी जंगलात पोबारा केला असून सदर आरोपींचा शोध सुरू असल्याचे वनविकास मंडळाचे अधिकारी यांनी सांगितले.



मुंबई -अहमदाबाद महामार्गावर टोल नाका परिसर व हिमाचल ढाबा या ठिकाणी खैर तस्करी होणार असल्याची गुप्त बातमी वन अधिकाऱ्यांना मिळाली. सदर अधिकाऱ्यांनी या ठिकाणी सापळा रचून लाखोंचा मुद्देमाल ताब्यात घेतला.मात्र कारवाई होणार असल्याचा सुगावा खैर तस्करांना लागताच अंधाराचा फायदा घेत जंगलात पळून गेले. या घटनेत दोन वाहने ताब्यात घेतली असून यामध्ये खैर जातीची लाकडे व दोन वाहने जप्त करण्यात आली आहेत.

## जिल्हा परिषदेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप

### ट्रायबल एज्युकेशनल अँड डेव्हलपमेंट सोसायटीचा नाविन्यपूर्ण उपक्रम

प्रतिनिधी
■ मोखाडा

आदिवासी भागातील विद्यार्थ्यांनी उच्चशिक्षण घेऊन समाज आणि परिसराचे नावलौकिक करावे. त्यासाठी दरवर्षी जिल्हा परिषदेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप डॉ. सुमित मधुकर ढाक व संस्थेचे पदाधिकारी सदस्य करतात. मोखाडा तालुक्यातील एकूण 13 जिल्हा परिषद शाळा पळसपाडा, निरगुडवाडी, पवारपाडा, पोशेरा, मोरखडक, पारध्याची मेट, वखारीचा पाडा, खडकाची मेट, गायमुखपाडा, मोरड्याचा पाडा, मोरचुंडी, सातुर्ली, कळमवाडी अशा एकूण 1004 विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.



महाराष्ट्र आदिवासी राज्य शासनाच्या वतीने आदिवासी समाजरत्न पुरस्काराने गौरविण्यात आलेले, मृदा आणि जलसंधारण अभियांत्रिकी क्षेत्रात डॉक्टरेट मिळविणारे देशातील सर्वात लहान वयाचे आदिवासी समाजातील तरुण, इनस्पायर अवॉर्ड, जेआरफ अवॉर्ड ने सन्मानित असे डॉ. सुमित मधुकर ढाक "ट्रायबल एज्युकेशनल अँड डेव्हलोपमेंट सोसायटी" चे अध्यक्ष व संस्थापक असून विद्यार्थाच्या शिक्षणाच्या प्रगतीसाठी, शेतकऱ्यांच्या प्रगतीसाठी तसेच समाजकल्याणासाठी "ट्रायबल एज्युकेशनल अँड डेव्हलोपमेंट सोसायटी" स्थापना केली आहे.

दिनांक 30/08/2024 रोजी "ट्रायबल एज्युकेशनल अँड डेव्हलोपमेंट सोसायटी" यांच्या मार्फत मोखाडा तालुक्यातील एकूण १३ जिल्हा परीषद शाळांना शालेय शैक्षणिक साहित्य वाटपाचा कार्यक्रम करण्यात आला. सर्व शाळा मिळून एकूण 1004 विद्यार्थाना शालेय शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले. यामध्ये १.चित्रकला वही २.चौकटी वही ३.चाररेघी वही ४. दूरेघी वही ५.रंगपेटी ६.पाटी खडू बॉक्स ७.पेन्सिल ८. शोर्प्नर ९.सचित्र बालमित्र अंकलीपी १०.रबर ११.पाटया १२. इंग्लिश ऑल इन वन 13. कंपास पेटी 14. पेन 15. पोस्टरकलर बॉक्स असे वस्तूंचे किट देण्यात आले. प्रमुख पाहुणे माननीय साईनाथ कानू डुकले आणि चंद्रकांत मारुती मालकरी यांच्या आर्थिक मदतीमुळे आणि सहकार्यामुळे हा कार्यक्रम यशस्वी झाला. कार्यक्रमावेळेस संस्थेचे अध्यक्ष व संस्थापक डॉ. सुमित मधुकर ढाक, उपाध्यक्ष नवनीत अशोक सापटे व्यवस्थापकिय समिती सदस्स . सुरेश शांताराम बीज, सह खजिनदार कु. दत्ता नंदू सापटे, सदस्स गणेश चिमा चिमडे आणि मोखाडा युनिटचे सदस्स जनार्दन शिद वरिष्ठ हितचिंतक सोमा लक्ष्मणशिद व सदर शाळेचे शिक्षक उपस्थित होते.

सर्व नियोजनामध्ये निरगुडवाडी शाळेचे उपक्रमशील शिक्षक . गोसावी सर यांचा मोलाचा हातभार व सर्व शाळेचे नियोजन केल्याने कार्यक्रम यशस्वी झाला. असेच कार्य भविष्यात विद्यार्थ्यांच्या विकासासाठी चालू राहील असे संस्थेच्या वतीने अध्यक्ष डॉ. सुमित मधुकर ढाक यांनी सांगितले आहे.

## नालासोपारा-तुळींज येथे 3 सप्टेंबर रोजी 'रानभाज्यांचे प्रदर्शन व विक्री`कार्यक्रम

### युवा आमदार क्षितिज ठाकूर यांच्याहस्ते उद्घाटन

प्रतिनिधी
■ वसई

वसई आणि परिसरातील आदिवासी गरीब-गरजू महिलांच्या शेतमालाला योग्य बाजारभाव मिळावा, त्यांनी मेहनतीतून पिकवलेल्या; तसेच रानावनातून प्राप्त केलेल्या नैसर्गिक पौष्टिक रानभाज्यांना लौकिक प्राप्त व्हावा, या महत्त्वपूर्ण उद्देशातून मंगळवार 3 सप्टेंबर रोजी सकाळी 10.30 वाजता नालासोपारा-तुळींज येथील देशमुख विद्यालयात 'रानभाज्यांचे प्रदर्शन व विक्री`चे आयोजन करण्यात आले आहे.



वसई-विरार शहर महानगरपालिका, वसई तालुका पत्रकार संघ आणि यंगस्टार ट्रस्ट विरार यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचे उद्घाटन नालासोपारा विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान युवा आमदार क्षितिज ठाकूर यांच्या हस्ते होणार आहे. तर वसई विधानसभा मतदारसंघाचे आमदार हितेंद्र ठाकूर, आमदार राजेश पाटील, वसई-विरार महापालिका आयुक्त अनिलकुमार पवार आणि माजी महापौर रूपेश जाधव ,उपमहापौर उमेश नाईक या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असतील.

मागील वर्षी 8 जुलै रोजी वसई येथील समाज मंदिर सभागृहात 'रानभाज्यांचे प्रदर्शन व विक्री` कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. वसईसह पालघर, जव्हार, मोखाडा परिसरातील अनेक महिलांनी विविध रानभाज्यांसह या कार्यक्रमात सहभाग नोंदवला होता. त्या वेळी वसई-विरारकरांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला होता. या वर्षीदेखील अशाच पद्धतीने प्रतिसाद व पाठिंबा मिळेल, असा विश्वास व्यक्त करतानाच समस्त वसई, नालासोपारा व विरारवासीयांनी या 'प्रदर्शन व विक्री` कार्यक्रमाला अवश्य भेट द्यावी, असे आवाहन वसई तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष संदीप पंडित यांनी केले आहे.



*मुंबई । शिवसेनेचे वरळी विधानसभा संघटक, माजी नगरसेवक दत्ता नरवणकर यांच्या वतीने आयोजित वरळी येथे उत्तर भारतीय संवाद संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते.त्यास नागरिकांचा उस्फुर्त प्रतिसाद मिळाला. या कार्यक्रमात माजी खासदार शिवसेना नेते संजय निरुपम यांनी नागरीकांना मार्गदर्शन केले.*

## महाराष्ट्र नवनिर्माण कामगार सेनेचा १८ वा वर्धापन दिन साजरा

प्रतिनिधी
■ मुंबई

मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत असलेल्या महाराष्ट्र नवनिर्माण कामगार सेनेचा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. मनसे सरचिटणीस व महाराष्ट्र नवनिर्माण कामगार सेनेचे अध्यक्ष मनोज चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली गेल्या १८ वर्षात विविध स्थापनेत मनसेचा झेंडा फडकावला असून कामगारांना बळ दिले आहे. महाराष्ट्र नवनिर्माण कामगार सेनेच्या माध्यमातून महाराष्ट्राच्या विविध भागात अन्याय झालेल्या हजारो कामगारांना राज ठाकरे ह्यांच्या शिलेदारांनी न्याय मिळवून देऊन त्यांचा विश्वास संपादन केला. मनसे कामगार सेनेच्या वर्धापन दिनानिमित्त दादर येथील कामगार सेनेच्या कार्यालयात श्री सत्यनारायण महापूजा चे आयोजन करण्यात आले होते, या दरम्यान सौ. शर्मिलाताई राज ठाकरे ह्यांनी उपस्थित राहून कामगार सेनेच्या सर्व शिलेदारांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. या प्रसंगी मनसे नेते नितीन सरदेसाई, रिटा गुप्ता, संदीप देशपांडे, वाहतूक सेनेचे अध्यक्ष संजय नाईक, सरचिटणीस प्रदीप वाघमारे, महेश ओवे यांच्यासह कामगार संघटनेचे सदस्य उपस्थित होते. यावेळी कामगार सेनेचे अध्यक्ष मनोज चव्हाण, सरचिटणीस गजानन राणे,भाई धुरी,भाई बेळणेकर, केतन नाईक, उपाध्यक्ष प्रकाश पवार यांच्यासह अन्य पदाधिकाऱ्यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत करून त्यांचा सन्मान केला. यावेळी कार्यालय सदस्य संदीप बोरकर, पूनम शिंदे, रुपेश मुनीयार, प्रशांत अहिरे यांनी कार्यक्रम यशस्वीपणे राबविण्यात कार्य केले.



Printed and Published by **Bhushan B.Mhatre** for Owner **Marik Media And Communication Pvt .Ltd.** at S.R.Publicatiinns ,Mohan Arjun Compound ,Godown No. 8,9 And 10 , Near Ghartan Pada ,Vaishali Nagar ,Last Bus Stop ,Dahisar (E ) ,Mumbai -400068 and Published From Marik Media And Communication Pvt .Ltd.,102, Shyam Sunder Sadan ,Sitaram Jadhav Marg, Lower Parel ,Mumbai 400013. Editor - **Deepak B. Mhatre**, E-mail vruttmanas1@ gmail.com ,telephone 2498546,24985609. Resident Editor - **Sham Deulkar**

As per PRB Act Editorial Responsibilities On Deepak B. Mhatre Nespaper Related Desputes Lies Under Jurisdiction of Mumbai Courts

Year - Twenty Nine
Issu - 74
R.N.I. Registration No. - 65609/96

मुद्रक आणि प्रकाशक **भूषण भा. म्हात्रे** यांनी मालक **मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.** साठी, एस. आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंपाऊंड, गोडाऊन नं. ८,९ आणि १०, घारटन पाडाजवळ, वैशालीनगर लास्ट बस स्टॉप, दहिसर (पूर्व), मुंबई - ४०० ०६८ येथे छापून मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि., १०२, श्याम सुंदर सदन, सीताराम जाधव मार्ग, लोअर परळ (पश्चिम), मुंबई - ४०० ०१३ येथून प्रकाशित केले. संपादक - **दीपक भा. म्हात्रे,** E-mail: vrittamanas1@gmail.com दूरध्वनी क्रमांक - २४९८५४६, २४९८५६०९ निवासी संपादक - **शाम देऊलकर**

पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी दीपक भा. म्हात्रे यांच्यावर राहील. सदर वृत्तपत्रासंबंधीच्या विवादित बाबी मुंबई न्यायालय क्षेत्रात येतील.

वर्ष- एकोणतीसावे
अंक - ७४
आर.एन.आय. रजिस्ट्रेशन क्र.- ६५६०९/९६

*मुंबई: वृत्तपत्रात सातत्याने वाचकांची पत्रे या सदरात सातत्याने पत्रलेखन करणाऱ्या पत्रलेखकांच्या मराठी वृत्तपत्र लेखक संघाच्या अमृत महोत्सवी सांगता समारंभात संघाच्या जडणघडणीत मोलाचे योगदान दिलेल्या माजी अध्यक्ष विजय कदम, माजी प्रमुख कार्यवाह सुनील शिंदे व नंदकुमार रोपळेकर यांचा सन्मान करताना कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त भूषण गगराणी आणि जेष्ठ पत्रकार विनय हर्डीकर. हा कार्यक्रम शनिवारी मंत्रालयासमोरील फ्री प्रेस हाऊस मध्ये झाला.*




## थोडक्यात

### गणेशोत्सवानिमित्त प्रभादेवीत स्वच्छता मोहीम

**मुंबई:** शिवसेना(उद्धव बाळासाहेब ठाकरे) प्रभाग क्रमांक १९३, प्रभादेवी च्या विद्यमाने दिनांक ३ व ४ सप्टेंबर २०२४ या कालावधीत गणेश उत्सवाचे औचित्य साधून विभागात स्वच्छता मोहीम राबविण्यात येणार आहे. यानिमित्ताने "संत गाडगे महाराज स्वच्छता" दिंडीचे देखील आयोजन करण्यात आले आहे. दक्षिण मध्य मुंबई चे खासदार अनिल देसाई तसेच विभाग क्रमांक १० चे विभागप्रमुख महेश सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली शाखा प्रमुख संजय भगत यांच्यावतीने विभागातील रस्ते व पदपथ यांची साफ - सफाई तसेच धूर फवारणी करण्यात येणार आहे. तरी विभागातील जास्तीत जास्त जनतेने या मोहिमेत सहभागी होऊन ती यशस्वी करण्यास सहकार्य करावे. असे आवाहन या पत्रकाद्वारे शाखा प्रमुख संजय भगत यांनी केले आहे.

### डॉक्टरांच्या सुरक्षेसाठी जे.जे. रुग्णालयात पोलीस घालणार गस्त

**मुंबई:** डॉक्टरांच्या सुरक्षेसाठी स्थानिक पोलीस ठाण्यातील अधिकाऱ्यांनी दररोज रुग्णालय परिसरात गस्त घालून विशेष लक्ष द्यावे, तसेच त्याची नोंद ठेवावी, अशा सूचना दक्षिण मुंबईचे अतिरिक्त पोलीस आयुक्त डॉ. अभिनव देशमुख यांनी दिल्या आहेत. त्यामुळे आता जे.जे. रुग्णालयात स्थानिक पोलिसांकडून नियमित गस्त घातली जाण्याची शक्यता आहे. निवासी डॉक्टरांच्या सुरक्षेसाठी जे.जे. रुग्णालयाच्या अधिष्ठाता डॉ. पल्लवी सापळे यांच्या दालनात दक्षिण मुंबईचे अतिरिक्त पोलीस आयुक्त डॉ. अभिनव देशमुख यांच्याशी नुकतीच बैठक झाली.

### कापड व्यापारी नगराज जैन यांचे निधन



**मुंबई:** परळ एस.टी. डेपो जवळील सत्यम रघुवंशी या कपड्याच्या दुकानाचे मालक नगराज शेषमलजी श्रीश्रीमालजी (जैन) वय-64 यांचे काल शनिवारी आकस्मिक निधन झाले.त्यांच्या निधनाबद्दल एल्फिन्स्टन रोड व्यापारी असोसिएशनने तीव्र दु:ख व्यक्त केले आहे.त्यांच्या पश्चात पत्नी रेखा, विवाहित कन्या प्रीती,स्नुषा केजल आणि पुत्र चार्टर्ड अकौटंट केतन जैन व नातवंडे आहेत. त्यांचा श्री शत्रुंजय भावयात्रा व शोकसभेचा कार्यक्रम हा सोमवारी २ सप्टेंबर रोजी दु.१२ ते १:३० पर्यत महाजनवाडी,वोल्टास कपौडच्या समोर चिंचपोकळी येथे होणार आहे.

# जे काम मुघल करु शकले नाहीत ते भाजपाच्या बेईमान लोकांनी केले; धमकीच्या स्वरात मागितलेली माफी मंजूर नाही - पवन खेरा

**प्रतिनिधी**
**मुंबई**

छत्रपती शिवाजी महाराजांचा अवमान करुन भाजपा सरकारने महाराष्ट्राच्या स्वाभिमानाला ठेच पोहचवली आहे. महाराज आपले दैवत आहेत, भाजपाने त्यांचा धडधडीत अपमान केला आहे, या अपमानाविरोधात जोडे मारो आंदोलन आयोजित केले असताना शिवद्रोही व्यवस्थेने विरोध केला, परवानगी नाकारली. आता काँग्रेसनेच महाराजांचा अवमान केल्याचा फेक नॅरेटिव्ह देवेंद्र फडणवीस व भाजपा पसरवत आहे, फेक नॅरेटिव्ह पसरवणे हा भाजपाचा डिएनए आहे, असे प्रत्युत्तर देत आज मुंबईत जोडे मारो आंदोलन करण्यात आले असून उद्या २ तारखेपासून राज्यभर हे आंदोलन सुरु राहिल, असे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष नाना पटोले यांनी सांगितले.




गांधी भवन येथे पत्रकारांशी बोलताना नाना पटोले पुढे म्हणाले की, 'छत्रपती शिवाजी महाराज हे केवळ महाराष्ट्राचेच नाही तर संपूर्ण देशाचे गौरव आहेत', असे पंडित जवाहरलाल नेहरु यांनी प्रतापगडावरील शिवाजी महाराजांच्या पुतळा अनावरणावेळीच जाहीरपणे सांगितले होते. आता पंडित नेहरुंच्या नावाने देवेंद्र फडणवीस अपप्रचार करत आहेत. फडणवीस यांनी नेहरुंचे पुस्तक संपूर्ण वाचलेले दिसत नाही, अर्धवट माहितीच्या आधारावर ते बोलत आहेत. खोटे बोल पण रेटून बोल अशी भाजपाची पध्दत आहे. पंडित नेहरु यांच्याबद्दलचा अपप्रचार फडणवीस यांनी थांबवावा. राजकोट किल्ल्यावरील महाराजांच्या पुतळयाचे काम ज्याने केले त्या आपटेला अद्याप अटक का केली नाही? तो कुठे पळून गेला? देवेंद्र फडणवीस यांनी अजून माफी का मागितली नाही? असे प्रश्नही नाना पटोले यांनी विचारले.

अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या मीडिया विभागाचे चेअरमन पवन खेरा यावेळी म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळयाने महाराष्ट्राच्याच नाही तर देशभरातील जनतेच्या मनात प्रचंड राग आहे. फक्त पुतळा कोसळला नाही तर लोकांचे मन दुखावले आहे. जे काम मुघल करु शकले नाहीत ते भाजपाच्या बेईमान लोकांनी केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी उपकार केल्याच्या अविर्भात माफी मागितली, धमकीच्या स्वरात मागितलेली माफी मंजूर नाही. भाजपा शिवद्रोही असून त्यांनी महाराष्ट्राच्या पाठीत खंजीर खुपसला आहे. शिवाजी महाराजांच्या अस्मितेशी चालवलेला खेळ खपवून घेतला जाणार नाही अस खेरा म्हणाले. पत्रकारांनी विचारलेल्या एका प्रश्नाला उत्तर देताना पवन खेरा म्हणाले की, देवेंद्र फडणवीस यांनी पंडित नेहरु यांचे Discovery of India हे पुस्तक संपूर्ण वाचलेले दिसत नाही. जेलमध्ये असताना संदर्भ मिळाले नाहीत, दुसऱ्या आवृत्तीत सुधारणा करण्यासाठी पंडित नेहरुंनी १९३६ साली पी. आर. देवगिरीकर तसेच श्रीप्रकाश यांना ३ मे १९३६ रोजी पत्र पाठवून संदर्भ मागितले होते व पुढच्या आवृत्तीत सुधारणा केली असे पवन खेरा यांनी स्पष्ट केले.

यावेळी बोलताना खासदार छत्रपती शाहू महाराज म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळल्याचा प्रकार राजकारणापलिकडचा आहे, या घटनेने जनतेच्या भावना दुखावल्या आहेत. १९ व्या शतकात कोण इतिहास लिहित होते हे सर्वांना माहित आहे, योग्य व्यक्तींनी लिहिलेलाच इतिहास वाचला पाहिजे असे शाहू महाराज म्हणाले.

या पत्रकार परिषदेला काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, खासदार छत्रपती शाहू महाराज, अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या मीडिया विभागाचे चेअरमन पवन खेरा, CWC चे सदस्य व प्रदेश कार्याध्यक्ष नसीम खान, प्रदेश काँग्रेसचे मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे, ठाणे ग्रामीण जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष दयानंद चोरघे, प्रवक्ते गोपाळ तिवारी आदी उपस्थित होते.

# 'महाराष्ट्र माझा' छायाचित्र, रिल्स आणि लघुपट स्पर्धेत सहभागी होण्यासाठी 15 सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ

**प्रतिनिधी**
**मुंबई**

महाराष्ट्राच्या प्रगतीचे सचित्र आणि दृकश्राव्य माध्यमातून दर्शन घडावे, यासाठी माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाने ही स्पर्धा जाहीर केली आहे.महाराष्ट्राचा प्राचीन, ऐतिहासिक वारसा आणि सरकारच्या विविध महत्त्वाच्या योजनांवर आधारित 'महाराष्ट्र माझा' छायाचित्र, रिल्स आणि लघुपट स्पर्धा आयोजित केली आहे. स्पर्धेत सहभागी होण्यासाठी अंतिम त ३१ ऑगस्ट २०२४ होती. सहभागासाठी मुदतवाढ देण्यात आली असून ही आता १५ सप्टेंबर २०२४ अशी करण्यात आली आहे.

'महाराष्ट्र माझा' या संकल्पनेवर आधारित महाराष्ट्राचे कृषी, शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक, जलसंधारण, जलसंपदा, पायाभूत सुविधा, आरोग्य, पर्यटन आणि पर्यावरण, वने आदी योजनांशी संबंधित छायाचित्र, रिल्स आणि लघुपट स्पर्धेसाठी पाठवता येतील.

निवड झालेल्या छायाचित्र, रिल्स आणि लघुपटांना प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांकासाठी अनुक्रमे २५ हजार रुपये, २० हजार रुपये आणि १५ हजार रुपयांचे पारितोषिक प्रदान केले जाणार असून तीन हजार रुपयांची पंधरा उत्तेजनार्थ बक्षिसे देण्यात येणार आहेत. या स्पर्धेत प्राप्त झालेल्या छायाचित्रांपैकी दर्जेदार छायाचित्रांचे मंत्रालयातील त्रिमूर्ती प्रांगणात तसेच राज्यभरात प्रदर्शन भरविण्यात येणार आहे. तसेच रिल्स आणि लघुपटांना शासनाच्या समाजमाध्यमांवरून प्रसिद्धी देण्यात येईल. राज्यभरातून प्राप्त दर्जेदार छायाचित्रांची, प्रदर्शनासाठी निवड करण्यासाठी तज्ज्ञांची समिती नेमण्यात येणार आहे.

स्पर्धेत भाग घेऊ इच्छिणाऱ्यांनी dgiprdlo@gmail.com या ई-मेल आयडीवर १५ सप्टेंबर २०२४ पर्यंत स्पर्धेनुसार छायाचित्र, रिल्व किंवा लघुपट पाठवावीत. सोबत आपले नाव, संपूर्ण पत्ता, मोबाइल नंबर आणि छायाचित्र कोणत्या ठिकाणचे आहे, याची माहिती देणे आवश्यक आहे.

***स्पर्धेची नियमावली छायाचित्रण स्पर्धा :***

- *छायाचित्रे १८x३० इंच HD च्या मानक आकाराची असावीत. छायाचित्राची संकल्पना माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाने सुचविलेल्या संकल्पनेशी सुसंगत असावी.*
- *छायाचित्र ही स्वतःची सर्जनशीलता असावी.*
- *छायाचित्रांमध्ये कोणतेही अनुचित दृश्य नसावेत. कोणतीही कॉपीराईट सामग्री वापरली जाऊ नये.*
- *छायाचित्राचे तपशीलवार वर्णन अपेक्षित आहे.*
- *स्पर्धेत भाग घेतलेल्यांचे छायाचित्रांचे स्वामित्व अधिकार माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाकडे असतील.*
- *रिल्स स्पर्धा रिल्ससाठी वेळ मर्यादा कमाल १ मिनिटांपर्यंत असावी. असभ्य भाषा, आक्षेपार्ह शब्द याचा वापर यामध्ये करता येणार नाही. कोणतेही स्वामित्व अधिकारांचे उल्लंघन होणार नाही, याची काळजी घ्यावी.*
- *एकाधिक नोंदींना परवानगी नाही.*
- *स्पर्धा १८ वर्षे आणि त्यावरील सर्वांसाठी खुली असेल. रिल्स नवीन असणे आवश्यक आहे आणि विशेषतः या स्पर्धेसाठीच तयार केली पाहिजे. लघुपटाचा अवधी किमान ३ मिनिटे ते कमाल ५ मिनिटे इतका असावा.*



***मुंबई: शिवद्रोही महाराष्ट्र सरकार विरोधात हुतात्मा चौक येथे महाविकास आघाडी आयोजित भ्रष्ट सरकारला जोडे मारा आंदोलनात माजी मंत्री सुरेश शेट्टी, राजन भोसले, भूषण पाटील राजेश निर्मल, अँड. संदेश कोंडविलकर आदी सहभागी झाले होते.***

# घाटकोपरमध्ये काँग्रेस पार्टी आयोजित 'मुंबई न्याय यात्रेचे' भव्य स्वागत

**प्रतिनिधी**
**मुंबई**

मुंबईतील जनतेच्या न्याय हक्कासाठी मुंबई काँग्रेसने आयोजित केलेल्या "मुंबई न्याय यात्रेचे" घाटकोपर पश्चिम येथे आगमन होताच काँग्रेस कार्यकर्त्यांनी भव्य स्वागत केले. राज्यातील सर्वसामान्यांच्या जीवनाशी निगडित महत्वाचे प्रश्न हातळण्यासाठी सध्याचे महायुती सरकार संपूर्णपणे अपयशी ठरले आहे. जनतेला न्याय पाहिजे अणि याच न्यायासाठी मुंबई काँग्रेसच्या वतीने काढण्यात आलेल्या मुंबई न्याय यात्रेत घाटकोपर पश्चिम काँग्रेस पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.



या यात्रेत मुंबई काँग्रेसच्या अध्यक्षा सौ. वर्षाताई गायकवाड, माजी मंत्री आरीफ नसीम खान, मुंबई काँग्रेसचे माजी अध्यक्ष आमदार भाई जगताप,मुंबई काँग्रेसच्या उपाध्यक्षा जेनेट डिसोझा आदीसह अन्य मान्यवर व काँग्रेस कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गणपती आगमनामुळे अनेक बेस्ट बस चे मार्ग वळविले

**प्रतिनिधी**
**मुंबई**

गणेशोत्सवाला येत्या ७ सप्टेंबर पासून सुरुवात होत आहे. मुंबईत १० हजारापेक्षा अधिक सार्वजनिक गणेशोत्सव मंडळे धूमधडाक्यात गणेशोत्सव साजरा करतात. उंच गणेश मूर्ती असल्यामुळे मंडप उभारणीपूर्वीच मूर्ती आणून आपल्या जागेवर ठेवतात. काल शेवटचा शनिवार , रविवार असल्यामुळे मुंबईत अनेक सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांच्या गणेश मूर्तीचे आगमन झाले आहे.

त्यामुळे दोन दिवस रस्त्यावर गर्दी झाल्यामुळे वाहतुकीचे मार्ग बदलण्यात आले होते. काल रविवारी सुट्टीच्या दिवशी गणेश आगमन सोहळ्यामुळे बस मार्ग क्र. १, ४,५,६,७,८,१९,५१,२२,२५ इत्यादी बसेस चे मार्ग बदलून त्यांना लालबाग उड्डाण पुलावरून १३.३०वाजल्यापासून परावर्तित करण्यात आले होत. तर बस मार्ग क्रमांक ६६ डाउन दिशेने भारत माता येथे उजवीकडे वळण घेऊन महादेव पालव मार्ग, नाम जोशी मार्ग असे प्रवर्तन करण्यात आले.

लालबाग येथे गणपती आगमन सोहळ्यामुळे भाविकांची गर्दी जमल्यामुळे बस मार्ग क्रमांक 67 ,9,69 हे बस मार्ग डाऊन दिशेत एस. एस. राव मार्गाने डावे वळण घेऊन साईबाबा मार्गाने जी.डी .आंबेकर मार्गाने काळाचौकी वाजल्यापासून. उतर टी .बी .कदम मार्गाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोड येथे डावे वळण घेऊन आपल्या नियोजित मार्गाने दुपारी दीड वाजता पुढे सोडण्यात आल्या.

# महाविकास आघाडीच्या 'जोडे मारो आंदोलनाचा' बोरिवलीत छत्रपती शिवाजी महाराजांना विनम्र मानवंदना देऊन केला निषेध

**प्रतिनिधी**
**मुंबई**

मालवण येथील शिव पुतळ्या वरून संपूर्ण महाराष्ट्रात वातावरण दूषित आहे. देशाचे पांत नरेंद्र मोदींनी तसेच महाराष्ट्राच्या मुख्यमंत्री उपमुख्यमंत्र्यांनी झाल्या प्रकाराची जाहीर माफी मागितली व छत्रपती आमचे दैवत असल्याचे पंतप्रधान. मोदींनी प्रतिपादन करूनही महाराष्ट्रात अराजक व्हावे व सरकारला बदनाम करण्याच्या हेतूने काल महविकास आघाडी



तर्फे जोडे मारो आंदोलन जाहीर झाल्याच्या निषेधार्थ माजी खासदार गोपाळ शेट्टी यांनी कसल हजारो कार्यकर्ते व शिवप्रेमी जनतेला बरोबर घेऊन बोरीवली पूर्व टाटा पॉवर येथील शिवप्रतीमेला पुष्पांजली अर्पण करून शिवरायांची पुन्हा एकदा माफी मागून त्यांच्या चरणी नतमस्तक झाले.

या प्रकारचे राजकारण न करता सगळ्यांना एकत्र येऊन एक सन्मानजनक शिवरायांचे स्मारक होण्यासाठी प्रयत्न व्हायला हवे असे प्रतिपादन शेट्टी यांनी या वेळी बोलताना केले. छत्रपती शिवजी महाराज हे कोणत्या पक्षाचे राजे किंवा नेते नव्हते तर ते संपूर्ण रयतेचे राजे होते. यात कोणीही घाणेरडे राजकारण करू नये असे आवाहनही यलत्यांनी केले व महाविकास आघाडीच्या जोडे मारो आंदोलनाचा जाहीर निषेध केला. या प्रसंगी भाजप चे सर्व पदाधिकारी कार्यकर्ते माजी नगरसेवक व शिवप्रेमी नागरिक उपस्थित होते.

# एस टी महामंडळाच्या मध्यवर्ती कार्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अर्धपुतळ्याचे अनावरण

**प्रतिनिधी**
**मुंबई**

एस टी महामंडळाच्या मध्यवर्ती कार्यालयात मुंबई सेंट्रल येथे भारतीय घटनेचे शिल्पकार विश्व भूषण प पू डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या अर्धपुतळ्याचे अनावरण महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ माधव कुसेकर यांच्या हस्ते शुक्रवारी करण्यात आले. यावेळी बोलताना डॉ माधव कुसेकर यांनी सांगितले की,प पू डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुस्तकांचे मी भरपूर वाचन केले आहे. माझ्याकडे त्यांची असंख्य पुस्तके आहेत त्यांनी सांगितलेल्या विचारांवर आपण वाटचाल केली पाहिजे. आपण आपसात धर्म, जातीच्या नावावर भेदभाव निर्माण केले आहेत ते आपण बाजूला ठेवून आपण सर्व एक आहोत,



एकमेकांना समजून घ्या, एकमेकांना मदत करा भेदभाव नष्ट केले पाहिजे असे आवाहन त्यांनी उपस्थितांना केले

ह्या वेळी महामंडळाचे वित्तीय सल्लागार व मुख्य लेखाधिकारी गिरीश देशमुख, महाव्यवस्थापक (बांधकाम) मा दिनेश महाजन, महाव्यवस्थापक (यंत्र अभियांत्रिकी)मा नंदकुमार कोलारकर, महाव्यवस्थापक (क व औ सं)मा मोहनदास भरसट, कास्ट्राईब रा प कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष धर्मपाल ताकसांडे, सरचिटणीस सुनिल निरभवणे, एस टी कामगार संघटनेचे अध्यक्ष संदिप शिंदे, एस टी कामगार सेनेचे संघटक सचिव मा सुभाष जाधव, कास्ट्राईब रा प कर्मचारी संघटनेचे कार्याध्यक्ष विजय नंदागवळी, माजी कोषाध्यक्ष रविंद्र मांडवे, विधी सल्लागार उदय मालाधारी,सी डी आढाव, प्रसिद्धी सचिव विश्वनाथ जाधव, उपाध्यक्ष नंदरत्न खंडारे,प्रादेशिक अध्यक्ष एम जी कांबळे, प्रादेशिक सचिव गौतम कांबळे, मुंबई विभागीय अध्यक्ष सुभाष पालवे, अतिरिक्त सरचिटणीस काशिनाथ सुलाखे पाटील, संघटक सचिव शाम जाधव आदी उपस्थित होते.

## महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ
(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

**ई निविदा सूचना क्रमांक ३२/२०२४-२०२५ (मुंबई)**

म.औ.वि.महामंडळातर्फे खालील कामांकरीता ई निविदा सूचना मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम रुपये |
|---|---|---|
| १. | ठाणे येथील वागळे औद्योगिक क्षेत्रातील अनिवासी इमारतीची देखभाल व दुरूस्ती....... ठाणे येथील वागळे औद्योगिक क्षेत्रातील ऑफिस कॉम्प्लेक्स बिल्डिंग मधील इलेक्ट्रिक मीटर रूम, लिफ्ट मशीन रूम व कॉमन पॅसेजची दुरुस्ती व रिवायरिंग करणे. | ₹१०,५०,१३२.०० |
| २. | टिटिसी औद्योगिक क्षेत्रातील भूमिगत सांडपाणी वाहिनीची देखभाल व दुरूस्ती.. टिटिसी औद्योगिक क्षेत्रातील सी व डी ब्लॉकमधील सांडपाणी वाहिनीची वर्ष २०२४-२६ (२ वर्षा करीता) वार्षिक तत्वावर देखभाल व दुरूस्ती करणे. | ₹ १,४८,५८,७५९.०० |
| ३. | वागळे औद्योगिक क्षेत्रातील पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती... बागळे इस्टेट, ठाणे, रोड नं. ३४ येथील एचएसआर (गोल टाकी) ला युपीव्हिसी छत व आरसीसी पायऱ्या बसविणे. | ₹ ३९,९२,३६०.०० |
| ४. | बारवी पाणी पुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती.... मऔवि महामंडळाच्या जलवाहिनी सेवा रस्त्याची दुरुस्ती करणे व खड्डे भरणे. | ₹४०,१६,८३८.०० |
| ५. | बारवी धरणाची देखभाल व दुरूस्ती... बारवी धरण परिसरात जुने एमएस पथदिव्यांचे खांब जीआय अष्टकोनी खांबांनी बदलणे. | ₹३८,३३,६२१.०० |
| ६. | शहाड वॉटर वर्क्सची देखभाल व दुरूस्ती... शहाड येथील जलशुद्धीकरण केंद्रात \|ईपीबीएक्स प्रणालीचा पुरवठा करून, उभारणे व कार्यान्वित करणे. | ₹१५,५३,७४३.०० |
| ७. | अग्निशमन इमारतीची देखभाल व दुरूस्ती..... टिटिसी औद्योगिक क्षेत्रातील 'आर' ब्लॉक मधील रबाळे अग्निशमन केंद्राच्या परिसरातील प्रशासकीय इमारत, वसतिगृह इमारत, निवासी इमारत, कार्यशाळा, पार्किंग, गार्डन व रस्ते इत्यादींचे व्यवस्थापन, देखभाल, हाऊसकीपिंग, साफसफाई करणे. | ₹३४,१५,७४४.०० |
| ८. | बारवी धरणाची उंची वाढवणे... पुनर्वसनाचे काम... कचकोली येथे म्हसा रस्त्यावर पथदिव्यांचा पुरवठा करणे. | ₹३३,७७,८२७.०० |
| ९ | मिलेनियम बिझनेस पार्कची देखभाल व दुरूस्ती.. महापे येथील मिलेनियम बिझनेस पार्कमध्ये चेंबरची उंची वाढवणे व खराब झालेले चेंबर कव्हर तसेच खराब झालेली ड्रेनेज लाईन बदलणे. (दुसरी मागणी) | ₹३७,०८,५३०.०० |

उपरोक्त कामांकरीता निविदा प्रपत्र दिनांक ०२/०९/२०२४ ते दिनांक १०/०९/२०२४ पर्यत महामंडळाच्या http://www.midcindia.org या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.
इच्छुकांनी वरील कामांबाबत दिनांक ०४/०९/२०२४ पूर्वी त्यांचे प्रश्न महामंडळाच्या संकेत स्थळावर नोंदवावेत. कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण /महामंडळाचा खुलासा दिनांक ०५/०९/२०२४ पासून महामंडळाच्या संकेत स्थळावर उपलब्ध होईल.
जा.क्र./का.अ.(मुख्या)/ P-305660/२०२४

# कोकणातील घरात श्रीगणेशाची स्थापना करणाऱ्या मुंबईकर भाविकांसाठी स्पर्धा

**मुंबई**

अटल सेवा केंद्र - अभिजित सामंत, कोकण विकास आघाडी मुंबई , व भाजप वॉर्ड 84 च्या सहकार्याने आपल्या कोकणातील घरात श्री गणेशाची स्थापना करणाऱ्या मुंबईकर भाविकांसाठी एक आगळी वेगळी स्पर्धा आयोजित करण्यात आहे

कोकणातील घरात स्थापना केलेल्या गणपती बाप्पाचे 3 Photos आणि 2 Reels बनवा, गणेशोत्सवाचे वर्णन 150 शब्दात करा (जसे की किती वर्ष हा गणेशोत्सव साजरा होतोय, कोण कोण आणि कुठून कुठून ह्या गणेशोत्सवात सहभागी होतात, काही कार्यक्रम होत असल्यास, काही विशेष उपक्रम असल्यास त्याबाबतीत माहिती ई) आमच्या सोबत Tag करा आणि *भरघोस बक्षिसे जिंका स्पर्धेत सहभाग घेण्यासाठी पूर्व नोंदणी आवश्यक आहे. आपण मुंबईचे रहिवाशी असणे आवश्यक आहे.

घरगुती गणपतीची स्थापना आपल्या कोंकणातील गावच्या घरी केलेली असावी. गणपती बाप्पाच्या देखाव्यात, घरगुती कार्यक्रमात आपल्या संस्कृतीचे / परंपरेचे दर्शन असावे. बाप्पाचे आगमन आणि सेवा यांसाठी घेतलेले श्रम आणि कल्पकता रिल्स , फोटोत सर्वांना दाखववी.

स्पर्धेत सहभागी होण्यासाठी खाली दिलेल्या Link वर Click करून Google Form द्वारे नोंदणी करा (आवश्यक), घरगुती गणपती, बाप्पांसाठी केलेली सजावट, आयोजित कार्यक्रम इत्यादीचे दर्शन घडवणारी Reel (कमाल 2 किमान 1) Photo( कमाल 3 किमान 1) तयार करा त्यात तुमची Creativity ला गुण असतील. आपले Photo किंवा Reel स्वतःच्या Instagram व / वा Facebook अकाउंटवर पोस्ट करा त्या पोस्ट मध्ये Instagram Page व वा फेसबुक *@abhijit.samant.bjp1 . ला Tag करा, आपल्या कॅप्शनमध्ये #bjpwithkonkan हे Hashtag वापरा.

Google Form वर नोंदणी करण्याची अंतिम तारीख : 7 सप्टेंबर 2024 तर Reels , Photos , 150 शब्दातील वर्णन पोस्ट करण्याचा कालावधी 18 ते 27 सप्टेंबर २०२४ सार्वजनिक बक्षीस समारंभ सोहळा: ऑक्टोबर २०२४ अखेर होणार आहे.

(रायगड, सिंधुदुर्ग, रत्नागिरी) पहिले बक्षीस (तीनही जिल्ह्यासाठी प्रत्येकी एक प्रथम बक्षीस ) प्रत्येक जिल्ह्यासाठी प्रथम बक्षीस रू 21000/- दुसरे बक्षीस (तीनही जिल्ह्यासाठी प्रत्येकी एक बक्षीस) प्रत्येक जिल्ह्यासाठी द्वितीय बक्षीस रू 15000/- तीसरे बक्षीस (तीनही जिल्ह्यासाठी प्रत्येकी एक तृतीय बक्षीस) प्रत्येक तृतीय बक्षीस रू 11000/- अधिक उत्तेजनार्थ बक्षीस (तीनही जिल्ह्यांमध्ये मिळून पाच) रू 5000/- प्रत्येकी

## ठाणे महानगरपालिका, ठाणे
**सार्वजनिक बांधकाम विभाग**
**निविदा सूचना**

ठाणे महानगरपालिका क्षेत्रात "इमारत दुरुस्ती" या लेखाशीर्षका अंतर्गत ठाणे महानगरपालिका दिवा प्रभाग समिती कार्यालयात आवश्यक फर्निचर पुरविणे या कामाकरीता ऑनलाईन ई-निविदा मागविण्यात येत आहेत. ज्या कंत्राटदारांविरुध्द शासकीय/ निमशासकीय/ सार्वजनिक क्षेत्रातील संस्था व उपक्रम / स्थानिक स्वराज्य संस्था इ. यांनी शिस्तभंगाचे कार्यवाहिच्या अनुषंगाने नोंदणीपत्र रद्द करण्याची कार्यवाही केली / सुरु आहे, अशा कंत्राटदारांना निविदा प्रक्रियेत भाग घेता येणार नाही. निविदा सुचना व निविदा प्रपत्र संकेतस्थळ https:://mahatenders.gov.in वर दि.०२/०९/२०२४ ते दि.०९/०९/२०२४ रोजीपर्यंत सायं. १६:०० वाजेपर्यंत उपलब्ध आहेत. ऑनलाईन निविदा संकेतस्थळ वर दि.०९/०९/२०२४ रोजी सायं. १६:०० वाजेपर्यंत स्विकारण्यात येतील. निविदा दि.०९/०९/२०२४रोजी सायं. १६:३० वाजता निविदाकार अथवा त्यांचे अधिकृत प्रतिनिधी यांचे समक्ष उघडण्यात येतील.

ठामपा/पिआरओ/सा.बा/३९६/२०२४-२५
दि.३०.०८.२०२४

**सही/-**
कार्यकारी अभियंता
ठाणे महानगरपालिका, ठाणे

**Pls visit our oficial web-site www.thanecity.gov.in**

देश जर भ्रष्टाचार मुक्त करायचा असल्यास 3 सदस्य महत्त्वाचे आहेत. ते म्हणजे आई, वडील आणि शिक्षक



- डॉ. ए पी जे अब्दुल कलाम
माजी राष्ट्रपती

वृत्तमानस
मुंबई, सोमवार, २ सप्टेंबर २०२४

# आत्महत्यांनी चिंता वाढवली

भारतातील विद्यार्थ्यांच्या आत्महत्या चिंताजनक दराने वाढत असून, हा आकडा शेतकरी आत्महत्येपेक्षा जास्त झाल्याने ही एक मोठी सामाजिक समस्या बनलेली आहे. शिक्षणाने व्यक्तीचा सर्वांगीण विकास होतो, असे म्हटले जाते. मग विद्यार्थ्यांना स्वकर्तृत्वावर एवढा अविश्वास का वाटतो? विद्यार्थ्यांच्या वाढत्या आत्महत्यांचे प्रमाण पाहता सध्या समाजात सुरू असलेली जीवघेणी स्पर्धाच याला कारणीभूत असल्याचे दिसून येते. अभ्यास करूनही एखाद्या कारणाने एखादवेळेस विद्यार्थी परीक्षेत नापास झाला तर पुढील जीवनात आपण स्पर्धेत टिकू शकणार नाही, या विचाराने त्याचे मन खचते आणि आयुष्य संपविण्याशिवाय दुसरा कोणता पर्याय त्याला दिसत नाही. वाढते आत्महत्येचे प्रमाण पाहून कधी कधी असे वाटते की, आजकाल शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना व्यावसायिक व इतर शिक्षणाबरोबरच मानसिक शिक्षणाचीही गरज आहे. एका अहवालानुसार मागील वर्षामध्ये एकूण आत्महत्येचे प्रमाण दोन टक्क्यांनी वाढले आहे. तर याच कालावधीत विद्यार्थी आत्महत्येचे प्रमाण चार टक्क्यांनी वाढले आहे. अहवालानुसार २०२२ मध्ये भारतात १३,०४४ विद्यार्थी आत्महत्या झाल्या. २०२१ मध्ये हा आकडा १३,०८९ होता. त्यामुळे २०२२ मध्ये थोड्या प्रमाणात घट पाहायला मिळाली होती. ही घट असूनही एकूण आत्महत्येचे प्रमाण २०२१ मध्ये १६४,०३३ होते, जे २०२२ पर्यंत १७०,९२४ पर्यंत वाढले आहे. यात यंदासुद्धा वाढ होण्याची भीती आहे. या अहवालानुसार दुर्दैवाने महाराष्ट्र या आकडेवारीत आघाडीवर आहे. २०२२ मध्ये महाराष्ट्र १४ टक्के, तामिळनाडू ११ टक्के आणि मध्य प्रदेश १० टक्के या तीन राज्यांमध्ये सर्वाधिक विद्यार्थी आत्महत्यांची नोंद करण्यात आली आहे. त्यापाठोपाठ आठ टक्क्यांसह उत्तर प्रदेश आणि सहा टक्क्यांसह झारखंडचा क्रमांक येतो. दक्षिणी राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये एकत्रितपणे २९ टक्के प्रकरणे नोंदवण्यात आली आहेत. तर कोटासारखे कोचिंग हब असणारे उच्च दर्जाच्या शैक्षणिक वातावरणासाठी ओळखले जाणारे राजस्थान १०व्या क्रमांकावर आहे. या अहवालाचा अभ्यास केला तर असे लक्षात येते की २०२२ मध्ये एकूण विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांपैकी ५३ टक्के आत्महत्या करणारे पुरुष विद्यार्थी होते. २०२१ ते २०२२ दरम्यान पुरुष विद्यार्थ्यांच्या आत्महत्या सहा टक्क्यांनी कमी झाल्या आहेत, तर महिला विद्यार्थ्यांच्या आत्महत्या सात टक्क्यांनी वाढल्या आहेत, असे या अहवालात स्पष्ट केले असल्याने त्याकडे गांभीर्याने पाहिले पाहिजे. याशिवाय अहवालात असे नमूद करण्यात आले आहे की, गेल्या दशकात देशभरात विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांमध्ये लक्षणीय वाढ झाली असून, एकूण पुरुषांच्या आत्महत्यांमध्ये ५० टक्के आणि महिलांच्या आत्महत्यांमध्ये ६१ टक्क्यांनी वाढ झाली आहे. विद्यार्थ्यांच्या आत्महत्येचा दर वाढत आहे. ही एक चिंताजनक समस्या असून, भविष्यात अधिक भीषण रूप धारण करण्याची शक्यता आहे. मुख्य म्हणजे लोकसंख्या वाढीच्या दरापेक्षाही विद्यार्थी आत्महत्येचा दर अधिक असू शकतो, अशी शक्यता असल्याने त्याला वेळीच आवर घातला पाहिजे. विद्यार्थ्यांच्या आत्महत्येच्या घटनांनी लोकसंख्या वाढीचा दर आणि एकूणच आत्महत्येचा दर या दोन्हींना मागे टाकले आहे. गेल्या दशकात ०-२४ वर्षे वयोगटातील लोकसंख्या ५८२ दशलक्षवरून ५८१ दशलक्षपर्यंत कमी झाली आहे, तर विद्यार्थी आत्महत्यांची संख्या ६,६५४ वरून १३,०४४ पर्यंत वाढली आहे. ही वाढ खरोखरच चिंताजनक आहे. कारण गेल्या २० वर्षांमध्ये विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांचे प्रमाण एकूण आत्महत्या दराच्या दुप्पट वेगाने वाढत आहे. एकूण आत्महत्येच्या घटनांमध्ये ७.६ टक्के विद्यार्थी आत्महत्येच्या घटनांचा समावेश आहे. हा दर पगारदार कामगार, शेतकरी, बेरोजगार तरुण आणि स्वयंरोजगार असलेल्या इतर अनेक व्यवसायांच्या तुलनेतील आहे. तरुण लोकांमधील आत्महत्या ही एक गंभीर समस्या आहे आणि १५ ते २४ वर्षे वयोगटातील किशोरवयीन मुलांमधील मृत्यूचे हे जगातील दुसरे सर्वात मोठे कारण आहे. आत्महत्येचा प्रयत्न करणारी बहुसंख्य मुले आणि किशोरांना मानसिक आरोग्य विकार आहे, ज्याकडे लक्ष देण्याची गरज आहे. लहान मुलांमध्ये आत्महत्येचे प्रयत्न अनेकदा आवेगपूर्ण असतात. ते स्वतःला गोंधळ, दुःख, राग, लक्ष आणि अतिक्रियाशीलतेच्या समस्या, तणावाच्या भावना, आत्म शंका, यशस्वी होण्याचा दबाव, आर्थिक अनिश्चितता, निराशा आणि तोटा या भावनांशी जोडतात. सर्व बाजूंनी आपण हताश झालो आहोत व सुटकेचा उपाय दिसतच नाही. असे नेहमीच कष्ट सहन करण्यापेक्षा एकदाच काय तो त्रास होऊ दे, असे टोकाचे विचार करून अनेक तरुण आत्महत्येचा पर्याय स्वीकारतात. अनेक प्रकरणांची पोलिस ठाण्यात नोंद केली जात नाही. सामाजिक कलंक आणि आत्महत्येविरोधातील काही कायदे यासाठी कारणीभूत असल्याचे सांगितले जाते. याशिवाय एक मजबूत डेटा संकलन प्रणाली नसल्यामुळेही या घटनांची नोंद होत नाही. विशेषतः ग्रामीण भागात जेथे तक्रार नोंदवणे शहरी क्षेत्रांच्या तुलनेत कमी सुसंगत असल्याचे यानिमित्ताने स्पष्ट होते. अनेक प्रकरणांमध्ये भारतातील विद्यार्थ्यांच्या आत्महत्येशी संबंधित अनेक महत्त्वाच्या घटकांचाही उल्लेख करण्यात आला आहे. त्यात शैक्षणिक तणाव, केंद्रित लक्ष्यापर्यंत पोहोचण्यात अपयश येणे, रॅगिंग आणि गुंडगिरी, भेदभाव आणि आर्थिक ताण, यांसारख्या गोष्टींचा अपेक्षांचे ओझे इत्यादी हे तरुण समावेश असून त्यावर विचारमंथन करणे आवश्यक आहे. बालसंगोपन व तरुणांना मागदर्शन करताना आपला उद्देश त्यांना अडचणीपासून दूर ठेवणे हा नसून, त्यांना अडचणींना तोंड देण्यासाठी सशक्त व परिपूर्ण बनवणे हा असावा. तसेच पालकांनीसुद्धा मुलांची अति काळजी करू नये. तसे केल्यास त्यांच्यात असुरक्षिततेची भावना निर्माण होते. त्यामुळे ते आयुष्याच्या आव्हानांना सामोरे जाण्यास घाबरतात. त्यामुळे तरुणांना स्वतःचे निर्णय घेण्यास प्रोत्साहित करणे आवश्यक आहे. अभ्यासाबरोबरच व्यावहारिक ज्ञान व शारीरिक सशक्तपण याकडे लक्ष्य देणे आवश्यक आहे. या सर्व गोष्टीमुळे मुलांमध्ये प्रतिकार क्षमता वाढते. वाढता तणाव, शैक्षणिक अपयश, प्रेमभंग होणे, व्यसनाधीनता पालकांच्या वाढत्या अपेक्षांचे ओझे इत्यादी ही तरुण वयातील आत्महत्येची कारणे आहेत. त्यामुळे मानसोपचारतज्ज्ञांच्या मदतीने ताणतणाव नियोजन शिकणे, समुपदेशन व गरज पडल्यास औषधोपचाराने असे तणाव दूर करता येतात. तसेच विद्यार्थ्यांच्या शिक्षण विषयक क्षमता वाढविण्याकडे वळले पाहिजे, जेणेकरून ते त्यांच्या सर्वांगीण विकासास आणि स्पर्धात्मक वातावरणासाठी तयार होतील. ते म्हणाले की प्रत्येक संस्थेमध्ये एक पद्धतशीर, सर्वसमावेशक आणि मजबूत महाविद्यालयीन समुपदेशन प्रणाली तयार करणे अत्यावश्यक आहे तसेच अभ्यासक्रमातही याचा समावेश करणे आवश्यक आहे. वाढत्या संकटाला तोंड देण्यासाठी, मानसिक आरोग्याला चालना देणे, शिक्षणाचा दर्जा सुधारणे आणि पुरेशा साहाय्य सेवा प्रदान करणे यासारख्या सर्वसमावेशक उपायांची अंमलबजावणी करण्याची तातडीने गरज आहे. शालेय व महाविद्यालयीन जीवनात विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास टिकून राहत असला तर त्याचा उत्साह कायम टिकून राहू शकतो. त्यांच्यातील आत्मविश्वास कायम टिकून राहावा यासाठी शिक्षक व पालकांनी प्रयत्न करणे आवश्यक आहे. जगात कितीही स्पर्धा वाढली तरी मी माझ्या कुटुंबाचा व स्वतःचा उदरनिर्वाह करू शकतो, असा विश्वास विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झाला तर आत्महत्येचा विचारच त्यांच्या मनात येणार नाही. शिवाय विद्यार्थी जेव्हा तणावाखाली असतात त्या वेळी त्यांचा आत्मविश्वास ढासळणार नाही यासाठी शिक्षक व पालकांनी त्यांच्या पातळीवर प्रयत्न करणे आवश्यक आहे. तसे केले तरच वाढते आत्महत्येचे सत्र थांबविता येणे शक्य होणार आहे.

# घाणेरडे राजकारण संपवा, मुंबईचे प्रश्न सोडवा



महापालिकायन

सुनील शिंदे
मोबाईल नंबर-९८२१९९६११७

**देशाला** दिशा दाखवणाऱ्या आपल्या महाराष्ट्र राज्यात २०१९ पासून राजकारणाचा स्तर खाली गेला आहे. गेल्या ५ वर्षापासून ज्या राजकीय घडामोडी, एकमेकांवर अगदी खालच्या पातळीवर जाऊन होत असलेली टीका, पक्ष फोडी, इकडे येतो की नाही की, लाऊ ईडी, इन्कम टॅक्स, सी बी आय च्या चौकशीचा सासेमिरा? असे करून अनेकांना पक्षात घेऊन खिचडी सरकार आज राज्यात सत्तेवर आहे.राज्याच्या विकासासाठी मूलभूत, पायाभूत सुविधा उपलब्ध करून देणे, शेतकरी आत्महत्या रोखणे, महागाई, सर्वच थरातील भष्टाचार रोखणे, सुशिक्षित बेरोजगारांची संख्या वाढत आहे. त्यांना कायमस्वरूपी नोकऱ्या उपलब्ध करून देणे,केंद्र व राज्य सरकारने कंत्राटी पद्धतीचा अवलंब करून

सुशिक्षित बेकरांची चेष्टा करणे सुरू केली आहे. ती बंद करणे,राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका गेल्या ४-५ वर्षापासून झालेल्या नाहीत. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांचा कारभार लोकप्रतिनिधी ऐवजी सनदी अधिकारी प्रशासक म्हणून चालवत आहेत. त्या निवडणुका सत्ताधारी पक्षाने मनात आणले तर लगेच जाहीर करण्यास निवडणूक आयोगाला सांगू शकतात. न्यायालयात २३६ की २२७ प्रभाग असणे हे निवडणूक घेण्यासाठी महत्वाचे नाही. तर ती घेण्याची इच्छा शक्ती हवी होती. ती न दाखवल्यामुळे या निवडणुका रखडल्या आहेत. हे सारे प्रश्न सरकार म्हणून सत्ताधारी पक्षाने सोडविणे आवश्यक असताना. आज जे चालले आहे.ते सारे लाजिरवाणे, आणि राज्याची शान रसातळाला घेऊन जाणारे आहे. आता विधान सभेच्या निवडणुका होणार आहेत. त्यामुळे सरकारकडून वाट्टेल तो निर्णय घेतला जात आहे.केवळ लोकांना खुश करून निवडणुकीत

पुन्हा निवडून येण्यासाठी व पुन्हा सत्ता काबीज करण्यासाठी, राज्यावर ८ लाख कोटी रुपयांचे कर्ज असताना सरकार खिरापत वाटत सुटले आहे. या मागचे अर्थकारण सत्ताधारी पुढाऱ्यांनी लोकांना समजावून सांगण्याची गरज आहे. बदलापूर येथे १३ ऑगस्ट रोजी एका शाळेत दोन लहान मुलींवर झालेल्या बलात्कार प्रकरणानंतर जो उद्रेक झाला तो राज्याने पाहिला आहे. पण त्या नंतर रोज कुठेना कुठे बलात्कार, विनयभंग, मुलींची छेड छाड होत असलेली प्रकरणे घडत आहेत. कायद्याचा धाक कुणाला राहिलेला दिसत नाही. हेच यातून दिसून येते. मालवण राजकोट येथे छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा पडल्याची घटना घडली. बदलापूर व मालवण मध्ये घडलेल्या या घटना महाराष्ट्राला मान शरमेने खाली घालायला लावणाऱ्या आहेत. केवळ माफी मागून एव्हड्यावरच हे प्रकरण थांबू दिले तर पुढेही अशा घटना घडत राहतील. पण इथे ही सत्ताधारी व विरोधक यांचे राजकारण दिसून आले. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन या गोष्टी पुन्हा घडणार नाही. याबाबत काही करणे आवश्यक असताना. त्यांच्या मध्ये टीका टिपणी सुरू आहे. अर्थात महाविकास आघाडी सत्तेवर असती व अशा घटना घडल्या असत्या तरी भाजप, शिंदे गटाने हेचच केले असते. जे आज महाविकास आघाडी करीत आहे. किंबहुना ते अधिक कसे पेटेल असा प्रयत्न केला गेला असता. सरकारने राजीनामा द्यावा म्हणून संपूर्ण राज्यात भाजपने रान पेटवले असते. पण इथे पाठ जमिनीला टेकली तरी टांग वर होती म्हणून सत्ताधारी उच्चरवाने सांगत आहेत.वाट्टेल ते स्टेटमेंट करून चेंडू विरोधकांच्या कोर्टात ढकलण्याचा प्रयत्न होताना दिसत आहे."केवळ सत्तेसाठी महाराष्ट्रात स्थापन केलेला महाविकास आघाडीचा अनैतिक प्रयोग पुरता फसल्यामुळे शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांना कमालीचे नैराश्य आले आहे. त्यामुळेच महायुती सरकारला अस्थिर करून राज्यात अराजक माजविण्याकरिता राष्ट्रपुरुषांना वेठीस धरण्यापर्यंत या वैफल्यग्रस्तांची मजल गेली आहे, असा आरोप भाजपचे प्रदेश प्रवक्ते केशव उपाध्ये यांनी नाशिक मध्ये पत्रकार परिषद घेऊन केला. तर माजी खासदार निलेश राणे यांनी सिंधुदुर्गातील राजकोट किल्ल्यावरील दुर्दैवी पुतळा दुर्घटनेमागे आ. वैभव नाईकांचा तर हात नाही ना? ते १५ मिनिटात दुर्घटनास्थळी नाईक कसे काय पोहोचले, असा सवाल त्यांनी केला आहे. टीका करताना ती लोकांना पटेल अशी केली पाहिजे. हे तर अगदी बालीशपणाचे वागणे झाले. असे आरोप विरोधकांवर केले तर वरिष्ठ नक्कीच शाबासकी देतील. पण लोक काय म्हणतील यांचा तरी विचार करायला हवा. कालच एक बातमी प्रसिद्ध झाली आहे.नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्युरोने (एनसीआरबी) या संस्थेने केलेला आपला अभ्यास अहवाल नुकताच सादर केला म्हणे. या बातमीत म्हटले आहे की, बदलापूरच्या घटनेनंतर राज्यात महिला सुरक्षित नसल्याचे नॅरेटीव्ह विरोधकांकडून सेट केले जात आहे. परंतु, त्यांच्या काळात महिलांवरील अत्याचाराने कळस गाठला होता. उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील महाविकास आघाडीचे सरकार सत्तेवर असताना, लॉकडाऊनमध्येही राज्यात दररोज १०९ महिलांवर अत्याचार होत असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. मार्च २०२० मध्ये लॉकडाऊन लागू झाल्यानंतर संपूर्ण देश ठप्प झाला. रस्ते, वाड्या, वस्त्या निर्मनुष्य असताना वर्ष २०२० मध्ये महाराष्ट्रात ३१ हजार ७०१ महिलांवर अत्याचार झाले. त्याची सरासरी प्रतिदिन ८८ दिवस इतकी आहे. २०२१ मध्ये कोरोनाची दुसरी लाट सुरू झाल्याने पुन्हा लॉकडाऊन लागू करण्यात आले. या वर्षात राज्यातील महिला अत्याचाराच्या घटनांची संख्या तब्बल ३९ हजार २६६ वर पोहोचली. त्याची सरासरी १०९ घटना प्रतिदिवस इतकी आहे. जानेवारी ते जून २०२२ या काळात (महाविकास आघाडी सत्तेवर असेपर्यंत) महिला अत्याचाराच्या एकूण २२ हजार ८४३ घटना घडल्या. त्याची सरासरी १२६ घटना प्रतिदिवस इतकी आहे. अल्पवयीन मुलींवर अत्याचाराचे प्रयत्न (पॉक्सो कलम १२, भादंवि ५०९) या श्रेणीतील गुन्हे पाहिले, तर त्यात २०२१ पासून अचानकच मोठी वाढ झाल्याचे दिसून येते. हे गुन्हे २०१७ मध्ये ९४, २०१८ मध्ये ४८, २०१९ मध्ये ९४, २०२० मध्ये ४८ इतके होते. असे या बातमीत म्हटले आहे. ही बातमी पेरलेली दिसत आहे. बदलापूरच्या घटनेनंतरच हा अहवाल चार वर्षानंतर आताच बाहेर कसा आला, हा पहिला प्रश्न पडतो. आमच्या सरकारच्या काळात घडलेला हा प्रकार काहीच नाही.पण तुमच्या काळात किती भयंकर प्रकार घडले ते पहा हे विरोधकांना सांगण्याचा हा प्रयत्न असावा अशी दाट शंका येते आणि तिसरे म्हणजे कोविड काळात बातमीत म्हटल्याप्रमाणे, मार्च २०२० मध्ये लॉकडाऊन लागू झाल्यानंतर संपूर्ण देश ठप्प झाला. रस्ते, वाड्या, वस्त्या निर्मनुष्य होते. असे असताना रोज १०९ महिलांवर अत्याचार कसे होत होते? कोविड मधील लॉकडाऊन मध्ये कुणी कुणाच्या घरी दारी जात नव्हते. अगदी भाऊ भाऊ सुध्दा एकमेकांच्या घरी जात नव्हते. कोविड काळात अनेकांचा मृत्यू झाला. पण त्यांचा मृतदेह उचलायला, धार्मिक विधी करायला किंवा अंत्यसंस्कार करायला सुद्धा कुणी त्यांचे नातेवाईक जाऊ शकत नव्हते. एकमेकांशी हस्तांदोलन करण्यास ही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मनाई केली होती. या काळात लग्न समारंभ झाले पण तेही घरात, ५-६ लोकांच्या उपस्थितीमध्ये. अशी आणीबाणीची परिस्थिती असताना या काळात रोज १०९ महिलांवर अत्याचार होत होते? आणि ही इतकी मोठी घटना असताना सुद्धा ती लपून कशी काय राहिली?. ती समाज माध्यमांवर सुद्धा वाचायला मिळाली नाही. हे कसे काय?हा सुद्धा एक राजकारणाचा भाग आहे. सत्ताधारी म्हणून आपल्यावर आलेले बालंट झटकण्याचा करण्यात आलेला हा प्रयत्न आहे. लोक सुज्ञ आहेत. या मागे सुद्धा राजकारण आहे हे त्यांना सांगायला कुणा मुरब्बी राजकारण्यांची गरज आहे असे वाटत नाही.

मुंबईतील समस्या सोडवा

मुंबईतील अनेक समस्या जटील झाल्या आहेत. मुंबईतील वाहतूक आणि पार्किंगची समस्या जटील बनत चालली आहेच. पण मुंबईत लोकसंख्या वाढीचा भस्मासुर वाढत आहे. त्यामुळे लोकांना मूलभूत सोयी सुविधा पुरविताना मुंबई महानगरपालिकेवर ताण येत आहे. त्यातच मुंबईत राहणाऱ्या मराठी जनतेवर फार मोठे अरिष्ट येऊ घातले आहे. मुंबईतील मराठी माणूस मुंबई बाहेर किंवा शहर भागातून उपनगरात कसा फेकला जाईल. याचे प्रयत्न सुरू झाले आहेत. धारावी च्या लोकांना आधी मुलुंड मग कुर्ला येथे हलविण्याच्या हालचाली सुरू झाल्या होत्या पण ते जमलेसे दिसत नाही. पण त्यांचे प्रयत्न जारी आहेत. तसेच प्रयत्न वांद्रे येथील शासकीय वसाहत आणि गोरेगांव पश्चिम येथे असलेल्या मोतीलाल नगर क्रमांक १,२ आणि ३ मधील सुमारे ३५०० रहिवाश्यांवर होत आहे. अर्थात या मागे कोण आहे व त्याला पाठीशी कोण घालत आहे. हे सांगण्याची आवश्यकता आहे असे वाटत नाही. पण या साऱ्या समस्या, प्रश्न निर्माण होत असताना राज्यात सुरू असलेल्या सुडाचे व घाणेरड्या राजकारणाचा आता लोकांना वीट आला आहे. आता बस करा तुमचे हे घाणेरडे राजकारण असे म्हणण्याची वेळ लोकांवर आली आहे. परिस्थिती हाताबाहेर जाण्यापूर्वी राजकीय पक्ष, नेते यांनी स्वतःला आणि आपली राजकीय दिशा बदलण्याची गरज आहे. त्याऐवजी सत्तेचा वापर लोकांचे प्रश्न, समस्या सोडवण्यात केला तर निवडणुकीत प्रचाराची गरज भासणार नाही. त्यांनी स्वतःमध्ये बदल घडवून आणण्याची गरज आहे. मुंबई शहर उभे आडवे वाढत आहे. लोकसंख्या वाढीमुळे लोकांना पुरविण्यात येणाऱ्या मूलभूत सोयी सुविधांमध्ये वाढ होण्याची शक्यता आहे. त्या दृष्टीने आता मुंबई महानगरपालिकेने कामाला सुरुवात केली पाहिजे. यात सर्वप्रथम पाण्याच्या सध्याच्या १८०० मिलिमीटर च्या जुन्या म्हणजे १३६ वर्षापूर्वी टाकलेल्या जलवाहिन्या आता बदलण्याची गरज आहे. या जलवाहिन्यांची झीज झाली आहे. त्यामुळे त्या फुटण्याचे प्रमाण वाढत आहे. मुंबईला साधारणपणे १५० कि मी अंतरावरून जलवाहिन्याद्वारे पाणी येत असते. त्या जलवाहिन्या उघड्यावर आहेत. तसेच मुंबईत जे जलवाहिन्यांचे जाळे पसरले आहे. त्या

जलवाहिन्यासुद्धा गंजून झिजल्या आहेत. त्यामुळे त्यातून पाण्याची गळती होत असते. मुंबईत आता सिमेंट काँक्रिट रस्त्याची कामे सुरू आहेत. ही कामे सुरू करण्यापूर्वी जुन्या जलवाहिन्या बदलण्याची गरज आहे. यापुढे नव्याने बांधण्यात येणाऱ्या सिमेंट काँक्रिटच्या रस्त्यांच्या कामा आधी जलवाहिन्या बदलण्याचे काम करता येऊ शकेल.नुकतेच २३ ऑगस्ट रोजी पवई येथे गौतम नगर परिसरात तानसा पश्चिम मुख्य जलवाहिनीला भगदाड पडून मोठ्या प्रमाणात पाणी वाहून गेलेच पण तिथल्या काही घरांचेही नुकसान झाले. अशा घटना वारंवार घडत असतात. फुटलेल्या जलवाहिनीला ढीगळ लावायचे. आणि मग पुन्हा दुसऱ्या ठिकाणी जलवाहिनी फुटली की, तिथेही तेच काम करायचे. असे किती दिवस करणार? आताच एका सामाजिक संस्थेचा अहवाल प्रसिद्ध झाला आहे.त्यात म्हटले आहे की, मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या जलवाहिन्यांभोवती अनेक ठिकाणी झोपड्यांचे अतिक्रमण झाले आहे. अनेक ठिकाणी जलवाहिन्यांना गंज चढला आहे. गंजरोधक उपायांचा अभाव आहे. अनेक ठिकाणी जलवाहिन्यांच्या परिसरात सुरक्षेसाठी गस्त घालण्याचे प्रमाण कमी झाले आहे, अशी निरीक्षणे वॉचडॉग फाउंडेशनने नोंदवली आहे. या बाबीकडे पालिका प्रशासनाने गांभीर्याने पाहण्याची गरज आहे असे वाटते.

## पत्र मानस

### धक्कादायक वास्तव

ऑस्ट्रेलियातील कार्टिन आणि नेट्रो डेम विद्यापीठात केलेल्या संशोधनात धक्कादायक वास्तव समोर आले आहे.सर्व जगाला भेडसावणाऱ्या प्लास्टिकचे प्रदूषण आता मानवाच्या मेंदू पर्यंत जाऊन पोहोचले आहे. प्लास्टिक वापरल्या शिवाय आपला एकही दिवस जात नाही.कारण, सकाळीच दात ब्रश करतांना प्रथम प्लास्टिक चा वापर नंतर हातात कायम असलेला मोबाईल फोन, पाण्याच्या बाटल्या,खाण्याचे टिफीन इतर अनेक माध्यमातुन आपला प्लास्टिक या न विरघळणाऱ्या घटकाचा संबंध येतो.संपूर्ण जगाची डोकेदुखी ठरणाऱ्या प्लास्टिकचे मायक्रो कण संशोधनात डोक्यातील मेंदूत आढळून आलेले आहेत.त्या मुळे मानवी आरोग्याच्या बाबतीत ही धोक्याची घंटा म्हणावी लागेल.मायक्रोप्लास्टिक हे पाच मिलिमीटर पेक्षा लहान असल्याने हे प्लास्टिक साध्या डोळ्यांनी दिसत नाही. त्याचा परिणाम स्वरूप हे मायक्रो प्लास्टिकचे कण हवेच्या आणि खाण्याच्या माधयमातून आपल्या शरीरात प्रवेश करीत आहेत तर हे त्यांनी प्रवेश केलेले आहेत.हे मायक्रोकण आतडे आणि फुफ्फुसांच्या मार्गात आले की रक्तप्रवाहात मिसळतात आणि शरीराच्या विविध अवयवांमध्ये प्रवेश करू शकतात. मानवाच्या हृदयात,सांधे,यकृत, प्रजनन भाग, रक्तवाहिन्या इत्यादी अवयांमध्ये मायक्रो प्लास्टिक आढळून आले आहे. त्यामुळे जगाला भेडसावणारी समस्या आता आपल्या शरीराला सुद्धा भेडसावणार आहे.ही मायक्रो प्लास्टिकची समस्या मानवी आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत गंभीर आजार निर्माण करणारी आहे.

- दत्तप्रसाद शिरोडकर, मुंबई

### लाडक्या बहिणींचे इव्हेन्ट कशाला ?

महायुती सरकारने मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना सुरु केली.२१ ते ६५ वर्षापर्यंतच्या महिलाना दरमहा १५०० रुपये देण्याची योजना सुरु केली.त्यासाठी २०० कोटी जाहिरातीच्या रुपाने खर्च केले.वास्तविक राज्यावर ९ लाख हजार कोटी कर्ज असताना केवळ लोकसभा निवडणुकाचे परिणाम पाहुन विधानसभेच्या निवडणुकासाठी हि योजना आणल्याचे स्पष्ट झाले.महायुतीने यासाठी कोणते पैश्याचे झाड लावले आहे तेच कळत नाही.या योजनेनुसार महिलाना १५०० देण्यात येत आहेत पण गावागावात जाऊन या योजनेचे इव्हेंट करण्याची गरज काय? तुम्ही जर निरपेक्ष वृत्तीने आणि कोणताही स्वार्थ न ठेवता जर हि योजना आणली असेल तर महाराष्ट्रात फिरुन महिलाना तुम्हाला पैसे मिळाले का ? असे विचारण्याची पाळी का यावी ?

**- अरुण पां.खटावकर, लालबाग**

### या पुढे पुतळे उभारताना काळजी घ्यावी

कोकणातील मालवणच्या राजकोट जवळील नौदलाने उभारलेला पूर्णाकृती छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा आठ महिन्यातच कोसळला.दुर्देवी घटना घडली.याचे सर्व जनतेस दुःख झाले.या दुर्घटनेनंतर सर्वत्र संताप व्यक्त होत आहे.निषेध केला जात आहे. मोर्चे,धरणे धरणे धरली जात आहेत.या दुर्घटनेस जबाबदार असणाऱ्या व्यक्तींवर सरकारतर्फे कारवाई केली जात आहे. राजकीय पक्षांतर्फे आरोप,प्रत्यारोप होत आहेत.पण यापुढे या दुर्घटनेचा बोध घेवून कोणताही पुतळा उभारताना विशेष काळजी घ्यायला हवी.पुतळ्याची पडझड,कोसळण्याच्या घटना टाळण्यासाठी अभ्यास करूनच पुतळे उभारावेत. महापुरुषांचे पुतळे समाजाला आदर्शवत,प्रेरणादायी, असतात.त्यांची निगाही ठेवणे गरजेचे आहे.

- नंदकुमार आ पांचाळ, घोडपदेव

### बँकांनी दंड आकारतांना ग्राहकांच्या सहनशीलता विचारात घ्यावी

देशातील सार्वजनिक व खाजगी क्षेत्रातील बँका, प्रादेशिक बँका, परदेशी बँकांच्या शाखा, अर्बन सहकारी बँका आणि ग्रामीण भागांतील सहकारी बँका आपल्या खातेदारांना, कर्जदारांना आवश्यक तसेच अत्याधुनिक सोयी सुविधा उपलब्ध करून देतात हे जरी खरे असले तरी त्या सेवा पुरविण्यासाठी जो काही शुल्क आकारले जाते. त्यामुळे सामान्य, निवृत्त, ज्येष्ठ नागरिक यांना मोठ्या प्रमाणात सेवा शुल्क आकारले जाते ते मुकाट्याने सहन करण्याशिवाय अन्य पर्याय उरलेला नाही. बँकिंग क्षेत्रात एटीएम कार्ड्स, क्रेडिट, डेबिट कार्ड्स, एका ठिकाणाहून किंवा एका खात्यातून दुसऱ्या ठिकाणी/खात्यांत पैसै पाठविण्याकरिता सुरू केलेल्या आरटीजीएस, एनईएफटी यांसारख्या सोयी, सेफ डिपॉझिट लॉकर्स या व इतर काही सेवांची सुरूवात करताना त्या विनाशुल्क असल्याच्या जाहिराती करून प्रत्येक बँकेने ग्राहकांना आकर्षित करीत आपल्या व्यवसायात चांगलीच भर घातली. कालांतराने याच सेवा विनाशुल्क न ठेवता सशुल्क केल्या. बँक खात्याशी निगडित डूप्लिकेट पासबुक देण्यावर शुल्क, खात्यात जमा केलेला चेक न वटता परत आल्यास शुल्क, बँकेतील सही तपासण्यास शुल्क, वारसदाराच्या नावांत बदल, एटीएम कार्ड्स दुसऱ्या बँकेत वापरल्यास शुल्क, मासिक/त्रैमासिक एसएमएस शुल्क अशा जवळपास सर्वच प्रकारच्या सेवा पुरवितांना शुल्क आकारणी केली जात आहे. या शुल्क आकारणीमुळे बँकांच्या उत्पन्नाची जणू चंगळ होतेय तर गरीब, सामान्य बचत खातेदार मात्र कंगाल होतोय. याचप्रमाणे बँकांकडून केली जाणारी दंड आकारणी हि सुध्दा. किमान शिल्लक न राखल्यास दंड, डॉर्मंट झालेले खात्यातील व्यवहार पुनः सुरू करताना काही बँका दंड आकारणी करतात. सार्वजनिक क्षेत्रातील बँकांनी २०१९ -२० आणि त्यानंतरच्या पाच वर्षांत साडे आठ हजार कोटी रुपयांचा दंड आपल्या खातेदारांकडून वसूल केला. दिवस रात्र सेवा पुरविली जाते ती डिजिटल बँकिंग सेवा विनामूल्य उपलब्ध करून न देता जे काही शुल्क आकारले जाते त्यावरून त्या सेवा मोफत पुरविल्या जात नसतात हे ग्राहकांनी लक्षात घ्यायला हवे. बँकांकडून दिल्या जाणाऱ्या प्रत्येक सेवांवर सेवाकर आकारणे व्यवसायाच्या दृष्टीने ठीक असले तरी काही प्रकारचे कर आकरण्यापूर्वी खातेदार किती प्रमाणात कर आकारणी सहन करू शकतो याचा प्रामुख्याने विचार करण्याची गरज आहे. तशीच बँक खातेदारांप्रति असलेली संवेदनशीलता आणि संबंध यांत सुधारणा होण्याची गरज भासत आहे. एकेकाळी खाजगी कर्ज देणारे सावकार व त्यांच्या पेढ्या यांमध्ये असलेल्या संबंधांपेक्षा आमूलाग्र बदल बँकांचे कारभार व व्यवहारांतून दिसून येणे जसे अपेक्षित आहे. तसेच खातेदार व कर्जदारांच्या व्यवहारांवरच बँकांचे यशापयश अवलंबून असते हे ध्यानात घेऊन बँकांकडून सामाजिक बांधिलकी अधिक जबाबदारीने जपण्याची गरज आहे. "

- स्नेहा राज, गोरेगांव.

५ वृत्तमानस
ठाणे-रायगड
मुंबई, सोमवार, २ सप्टेंबर २०२४

## लग्न जुळविणाऱ्या ॲपच्या माध्यमातून ओळख, अन् 95 हजारांची फसवणूक

**ठाणे :** विवाह जुळविणाऱ्या ॲपच्या माध्यमातून ओळख करून एका भामट्याने ४७ वर्षीय महिलेची ९५ हजार रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी शनिवारी कळवा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपीचा शोध सुरू आहे. फसवणूक झालेली महिला सरकारी कर्मचारी आहे. काही महिन्यांपूर्वीच त्यांनी विवाह जुळविणाऱ्या एका ॲपमध्ये त्यांचे खाते उघडले होते. या ॲपच्या माध्यमातून त्यांची ओळख एका तरुणासोबत झाली होती. त्याचे पुण्यात कपड्याचे दुकान असल्याचे त्याने सांगितले होते. महिलेने त्याला भेटण्याची इच्छा व्यक्त केली होती. परंतु त्याने महिलेला भेटण्याचे टाळले होते. महिलेचा त्याच्यासोबत व्हॉट्सॲपच्या माध्यमातून बोलणे सुरू होते. मार्च महिन्यात त्याने महिलेला गव्हर्मेंट शेअर बाजार बंद होणार असून आठवड्यात दुप्पट परतावा मिळवून देतो असे सांगितले. महिलेने विश्वास ठेऊन टप्प्या टप्प्याने ९५ हजार रुपये पाठविले. परंतु त्याने महिलेला पैसे परत केले नाही. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर महिलेने पैशांची मागणी करण्यास सुरूवात केली. परंतु त्याने महिलेला पैसे देणार नाही काय करायचे ते कर असे म्हणत धमकावले.



### म ह त्वा चे

## 76 लाख तीस हजारांची फसवणूक

**पनवेल :** अर्थ फायनान्स कंपनीत व इतर स्कीम मध्ये पैसे गुंतवून 120% वार्षिक रिटर्न मिळवून देण्याचे आमिष दाखवून 76 लाख तीस हजारांची फसवणूक केल्याप्रकरणी अनिकेत कुलकर्णी (राहणार बाणेर, पुणे) याच्या विरोधात खांदेश्वर पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला. गीता गोरे या खांदा कॉलनी येथे राहत असून त्यांच्या घरी अनिकेत कुलकर्णी आले. आणि त्यांनी अर्थ फायनान्स कंपनीची माहिती त्यांना दिली. आणि बँकेत पैसे ठेवल्यास इंटरेस्ट कमी मिळेल व त्यांच्या कंपनीत पैसे गुंतवल्यास जास्तीत जास्त वार्षिक 120 टक्के पैसे देण्याचे आश्वासन त्यांना दिले. 2022 ते 2023 रोजी अनिकेत कुलकर्णी यांनी त्यांना अर्थ फायनान्स यात रक्कम गुंतवण्यासाठी 48 लाख 30 हजार रुपये घेतले. तसेच बिदिशा मुख्यपाध्याय यांच्याकडून 22 लाख तर डॉ. संदीप शिंदे यांच्याकडून सहा लाख असे 76 लाख 30 हजार रुपये घेतले आणि ते पैसे परत दिले नाहीत. त्यामुळे अनिकेत कुलकर्णी याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

## महिलेच्या गळ्यातील मंगळसूत्र खेचले

**पनवेल :** मंदिरात दर्शनासाठी गेले असताना दोन अनोळखी इसमानी 64 वर्षीय महिलेच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र खेचून ते पळून गेले. यावेळी या महिलेला वीस फूट फरफटत नेऊन ती जखमी झाली आहे. याप्रकरणी दोघांविरोधात खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.कलाबाई देवराम पाटील ह्या सेकटर 12, खारघर येथे राहत असून त्या 31 ऑगस्ट रोजी देवाळेश्वर मंदिर सेक्टर 12, खारघर येथे सकाळी सहाच्या सुमारास दर्शनासाठी जात होते. यावेळी मंदिराच्या गेट समोर असताना पाठीमागून मोटरसायकल वरून दोघे आले व सोन्याचे मंगळसूत्र खेचले. त्यांनी मोटरसायकलवर पाठीमागे बसलेले इसमाची कॉलर धरून खाली पाडण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी त्या मोटरसायकल वरील चोरांनी या महिलेला वीस फूट फरफटत नेले. यात त्या जखमी झाल्या आहेत. त्या ओरडल्या असत्या दोघेही मोटरसायकल वरून पळून गेले. यावेळी मंगळसूत्राचा अर्धा भाग त्यांच्या गळ्यात तसाच होता. नऊ ग्रॅम वजनाचे मंगळसूत्र खेचून नेल्याप्रकरणी चोराविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

# ...जर वादग्रस्त विधाने थांबली नाहीत तर आमच्याही कार्यकर्त्यांना आवरता येणार नाही

## अजित पवारांचा थेट शिंदे आणि फडणवीस यांना इशारा

प्रतिनिधी
■ नागपूर

विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने महाराष्ट्रातील राजकीय वर्तुळात हालचाली सुरू झाल्याचे दिसत आहे. महाविकास आघाडीने सरकारला अनेक मुद्यांवरून घेरण्यास सुरुवात केली आहे. तर दुसरीकडे महायुतीमध्ये मात्र अंतर्गत वाद सुरू असल्याचे गेल्या काही दिवसांपासून दिसत आहे. भाजप आणि राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार गटातील अंतर्गत वाद आता लपून राहिलेला नाही. याच पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री अजित पवारांनी थेट इशाराच दिला आहे.

अजित पवार म्हणाले, वादग्रस्त वक्तव्यं थांबली नाहीत तर आमच्याही कार्यकर्त्यांना आवरायला अडचणीचं जाईल, असे म्हणत त्यांनी थेट मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना इशाराच दिला आहे. आरोग्य मंत्री व शिंदे गटाचे नेते तानाजी सावंत आणि गणेश हाके यांच्या राष्ट्रवादी पक्षाच्या विरोधातील वादग्रस्त



विधानांमुळे अजित पवारांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे नाराजी व्यक्त केली आहे. नागपूरच्या रामगिरी येथे महायुतीची महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीत ते बोलत होते.

यापुढे महायुतीला तडे जातील असे वादग्रस्त वक्तव्य परत होणार नाहीत याची दखल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी घेतली आहे. महायुतीच्या कोणत्याही नेत्यांनी वादग्रस्त वक्तव्य करू करु नये यासाठी एक गाईडलाईन ठरवली जाणार असल्याचा निर्णय या बैठकीत झाला असल्याचे समजते.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या रामगिरी बंगल्यावर साडे आठ वाजता सुरू झालेली बैठक मध्यरात्री नंतर एक वाजता संपली. या विशेष बैठकीत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, दुसरे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार, राष्ट्रवादी काँग्रेसचे वरिष्ठ नेते प्रफुल्ल पटेल, राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे हे उपस्थित होते. या बैठकीत संपूर्ण राज्याच्या महायुतीच्या जागा वाटपासंदर्भात सखोल चर्चा करण्यात आली आहे.

# छत्रपतींचा अपमान वाटला असता तर इथं राडे केले नसते

## जरांगेंचा नारायण राणेंना टोला

प्रतिनिधी
■ मालवण

तुम्हाला वाटतं तुम्ही लय शहाणे आहात, पण महाराष्ट्र सारं बघतोय. छत्रपतींच्या जीवावर कोणीही राजकारण करु नका. जनता तुमचा कार्यक्रम लावणार. तुम्ही उघडे पडायला लागलाय. तुमची सगळी भांडणं ही खुर्ची मिळवण्यासाठी, यांना छत्रपतींचा पुतळा पडल्याचे दुःखंच नाही. सगळं काही सत्तेसाठी सुरु आहे. यांना जर छत्रपतींचा अपमान वाटला असता तर यांनी इथं राडे केले नसते, असे म्हणत नारायण राणे आणि त्यांच्या पुत्रांचे नाव न घेता मनोज जरांगेंनी टोला लगावला.

जिल्ह्यातील मालवण येथील राजकोट किल्ल्यावरील छत्रपती शिवाजी महाराजांचा 35 फूट उंचीचा पुतळा कोसळला. यानंतर संपूर्ण महाराष्ट्रातून संतप्त प्रतिक्रिया उमटत आहेत. महाविकास आघाडीच्यावतीने आज 'जोडे मारो' आंदोलन केले जात आहे. तर जालना येथील मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे यांनी आज राजकोट किल्ल्याला भेट देत घटनास्थळाची पाहणी केली. यावेळी मनोज जरांगे यांनी एक गंभीर सवाल उपस्थित केला.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी दावा केला होता की, ताशी 45 किलो मीटर वेगाने वारे वाहात होते त्यामुळे पुतळा पडला. सरकारकडून सांगण्यात आले, पश्चिमेकडून आलेल्या वाऱ्यामुळे पुतळा पडला. यावर मनोज जरांगे पाटील यांनी पश्चिमेकडून वारा आला तर पुतळा पश्चिमेकडेच कसा पडला, अशी शंका उपस्थित केली आहे.

मनोज जरांगे म्हणाले की, या प्रकरणाच्या मुळाशी जाण्याची गरज आहे. त्यासोबतच इथे नवीन स्मारक उभे राहणेसुद्धा गरजेचे आहे, असे ते म्हणाले. आता भरपूर वेळ लागला तरी चालेल पण छत्रपती शिवाजी महाराजांचे दर्जेदार स्मारक उभे राहिले पाहिजे. ते भव्य आणि टिकाऊ देखील असले पाहिजे, असेही मनोज जरांगे म्हणाले.

***वारा पश्चिमेकडून, पुतळा पडलाही पश्चिमेलाच !***
*मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी आज राजकोट किल्ल्यावर जाऊन पुतळा पडला त्या ठिकाणची पाहणी केली. त्यानंतर माध्यमांशी बोलताना मनोज जरांगे म्हणाले की, पश्चिमेकडून आलेल्या वाऱ्यामुळे पुतळा पडला असे म्हटले जाते. मग पुतळा पश्चिमेकडेच कसा पडला? महाराजांच्या पुतळ्यात राजकारण आणू नका. सरकारने या प्रकरणाची सखोल चौकशी केली पाहिजे. पुतळा उभारण्याचे ज्यांना ज्यांना कंत्राट दिले होते. त्या सर्व कंत्राटदारांना आयुष्यभरासाठी जेलमध्ये टाकलं पाहिजे, अशी मागणी मनोज जरांगे यांनी केली.*

## बेलापूरच्या तीन सोसायट्यांमध्ये 'प्लास्टिकमुक्त सोसायटी' विषयी जनजागृती



प्रतिनिधी
■ नवी मुंबई

स्वच्छतेप्रमाणेच पर्यावरणाला व मानवी जीवनाला घातक असणा-या प्लास्टिकपासून सर्वांना वाचविण्यासाठी प्लास्टिकचा वापर टाळण्याबाबत नवी मुंबई महानगरपालिकेच्या माध्यमातून व्यापक जनजागृती करण्यात येत असून महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली 'प्लास्टिकमुक्त सोसायटी' अभियान राबविले जात आहे. या अंतर्गत आज बेलापूर विभागाचे सहा. आयुक्त तथा विभाग अधिकारी श्री. शशिकांत तांडेल यांच्या पुढाकारातून स्वच्छता अधिकारी श्री. सूर्यकांत म्हात्रे यांच्या सहयोगाने सेक्टर 38 नेरूळ येथील केंद्रीय विहार सोसायटी, सेक्टर 44 नेरूळ येथील गिरीराज सोसायटी व सेक्टर 11 सीबीडी बेलापूर येथील मरमेंट सोसायटी याठिकाणी स्वच्छतेसोबतच प्लास्टिकमुक्त सोसायटी विषयी जनजागृती करण्यात आली व तेथील रहिवाश्यांना प्रोत्साहित करण्यात आले.

## मुसळधार पावसाचा यवतमाळला फटका

### पैनगंगा नदीला पूर, तर अनेक गावांत पाणी

प्रतिनिधी
■ यवतमाळ

श्रावण महिन्याच्या आधीपासूनच दडी मारलेला पाऊस राज्यात पुन्हा सक्रिय झाला आहे. याशिवाय बंगालच्या उपसागरातील कमी दाब क्षेत्राच्या प्रभावामुळे विदर्भासह राज्यात पावसाचा जोर पुन्हा वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे हवामान विभागाने आज (1 सप्टेंबर) विदर्भातील नागपूर, यवतमाळ, चंद्रपूरला अतिमुसळधार पावसाचा इशारा दिला आहे, तर विदर्भासह, मराठवाड्यात तुरळक ठिकाणी मुसळधार पावसाचा आणि उर्वरित राज्यात विजांसह जोरदार पावसाचा अंदाज वर्तविण्यात आला आहे. मात्र शनिवारी सायंकाळपासून पडणाऱ्या पावसाचा यवळतमाळ जिल्ह्याला फटका बसला आहे.





हवामान विभागाने यवतमाळ जिल्ह्यात शनिवार आणि रविवार हे दोन दिवस मुसळधार पावसाचे राहतील, असा अंदाज वर्तविला होता. त्यानुसार, शनिवारी दुपारपासून या जिल्ह्यात पावसाने हजेरी लावली. सायंकाळनंतर पावसाचा या जिल्ह्यात जोर वाढला आणि रात्री 9 ते आज (रविवारी 1 सप्टेंबर) सकाळी 7 वाजेपर्यंत ढगांच्या गडगडाटासह मुसळधार पाऊस कोसळला. त्यामुळे अनेक गावांत पाणी शिरले.

विदर्भ-मराठवाडा सीमेवरील महागाव तालुक्यातील धनोडा येथे पैनगंगा नदीचे पाणी पुलावरून वाहत असल्याने यवतमाळ-माहूर, किनवट हा मार्ग वाहतुकीसाठी बंद करण्यात आला आहे. बेंबळा नदी प्रकल्पाच्या पाणलोट क्षेत्रात मुसळधार पाऊस कोसळल्याने धरणातील जलसाठ्यात झपाट्याने वाढ झाली आहे. त्यामुळे आज सकाळी प्रकल्पाचे 10 दरवाजे 50 सेंमीने उघडून पाण्याचा विसर्ग करण्यात आला.

## प्रजापती मॅग्नम महिला समूहतर्फे पारंपारीक मंगळागौर उत्साहात संपन्न

प्रतिनिधी
■ उरण

हिंदू संस्कृतीचे पारंपारीक सण मंगळागौर सण आजच्या धावपळीच्या युगातही प्रकर्षाने साजरे होताना पूर्ण महाराष्ट्रात पहावयास मिळते.उरण तालुक्यातील द्रोणागिरी नोड येथील प्रजापती मॅग्नम वसाहत मध्ये मंगळागौर सण मोठया उत्साहात साजरा करण्यात आला. नित्य नियमित होणारे महिला अत्याचार, बलात्कार यावरून धार्मिकता आणि हिंदू संस्कृती लोप पावत चालली आहे.

त्यामुळे काळाला अनुसरून संस्कार आणि संस्कृती जतन करणे आवश्यक आहे. याउद्देशाने मंगळागौरचे आयोजन प्रजापती



म्यॅगन इमारती मध्ये करण्यात आले. गौरीच्या रूपात पेहराव, साज श्रुगार करून गौरीचे पूजा समूह नृत्य, झिम्मा, विविध फुगडी प्रकार , पिंगा, सासू सुनेचे भांडण, नाच ग घुमा, घागर घुमू दे, या पारंपारीक नृत्याने वसाहत दुमदूमली होती. मंगळागौर सणामुळे मैत्रीचे स्नेहधागे बांधून एक संस्कृतीचा वसा पुढच्या पिढीला साकार केला गेला .

## अतिश म्हात्रे लिखित, जन्मांतर एक रहस्य कादंबरी प्रकाशन सोहळा संपन्न

प्रतिनिधी
■ अलिबाग

अतिश म्हात्रे यांनी लिहिलेल्या "जन्मांतर एक रहस्य" ह्या कादंबरीचा प्रकाशन सोहळा दिनांक18, ऑगस्ट रोजी साई ईन रिसॉर्ट येथे दिमाखात पार पडला.

प्रकाशन सोहळा कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान एन के जी एस बी बँकेच्या अध्यक्षा सीए हिमांगी नाडकर्णी ह्यांनी भूषविले. या वेळी चिंतामणी नाडकर्णी , एन के जि एस बी बँकेचे उपाध्यक्ष सी ए शांतेश वर्टी , सौ. सुषमा वर्टी, रोहा मुरुड नगरपालिका सी ई ओ पंकजजी भुसे , किहीम सरपंच प्रसाद गायकवाड ,विश्वास परांजपे, सौ. स्मिता परांजपे, श्रीमती. आरती म्हात्रे, तसेच त्यांचे सर्व कुटुंबीय ह्यांची विशेष उपस्थिती होती.



ह्या कादंबरीच्या प्रकाशक सौ शालीना म्हात्रे ह्यांनी सर्व पाहुण्यांचे स्वागत केले.अतिश म्हात्रे ह्यांना लहानपणापासून ज्यांनी ज्यांनी घडवले ह्या सगळ्यांचा सत्कार या वेळी करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षा सौ हिमांगी नाडकर्णी तसेच उपस्थित सर्व मान्यवरांच्या हस्ते जन्मातर एक रहस्य या कादंबरीचे प्रकाशन करण्यात आले.

"जन्मांतर एक रहस्य" ह्या कादंबरीची प्रस्तावना आणि मनोगत वाचन सौ सिमंतीका वस्त - मोरे ह्यांनी केले व नरेंद्र बोंबटकर ह्यांनी सूत्रसंचालन केले.

अतिश म्हात्रे हे एन के जि एस बी बँकेत, डेप्युटी मॅनेजर ह्या पदावर असून ते अलिबाग शाखेत शाखा प्रबंधक म्हणून कार्यरत आहेत. बँकिंग क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करून त्यांनी साहित्य क्षेत्रात पदार्पण केल्याबद्दल त्यांचे मान्यवर याच्याकडून अभिनंदन करून हा दिमाखदार सोहळा ३५० वाचकांसमोर साई ईन रिसॉर्ट येथे संपन्न झाला. यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवर व्यक्ती उपस्थित होत्या त्यांनी सर्वांनी आतिष म्हात्रे यांना व त्यांनी लिहलेल्या पुस्तकांस शुभेच्छा देऊन अशीच साहित्य संपदा आपल्या हातून घडावी असा आशीर्वाद ही त्यांनी व्यक्त केले. वाचकांना ही कादंबरी हवी असल्यास त्यांनी 9769209919 ह्या क्रमांकावर संपर्क करावा..

## नवी मुंबईकर खेळाडू आणि शालेय जिल्हास्तरीय संस्थांचा 2 सप्टेंबरला सन्मान

प्रतिनिधी
■ नवी मुंबई

महानगरपालिका कार्यक्षेत्रातील शालेय क्रीडा स्पर्धांना जिल्हयाचा दर्जा प्राप्त झाल्याने नवी मुंबई शहरातील शालेय विद्यार्थ्यांना थेट मुंबई विभागीय स्तरावर खेळण्याची सुवर्ण संधी लाभलेली आहे. विशेषत: पूर्वी ठाणे जिल्हयामध्ये तालुका म्हणून प्रथम खेळून ठाणे जिल्हयात विविध तालुक्यामध्ये स्पर्धांचे आयोजन होत असल्याने त्याठिकाणी जावे लागत असे. त्यामुळे स्पर्धांमध्ये नवी मुंबईतील बहुतांश शाळा सहभागी होत नव्हत्या.

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांच्या मान्यतेने आयोजित नवी मुंबई महानगरपालिका जिल्हास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धांमध्ये शाळांचा सहभाग वाढत जाऊन आज 250 हून अधिक शाळांचा आणि 45 हजारहून अधिक खेळाडूंचा सहभाग होत आहेत. विशेषत: मुंबई विभागामध्ये राज्यस्तर व राष्ट्रीय स्तरावर सर्वाधिक खेळणारे खेळाडू हे नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील आहेत. खेळाडूंना अधिक प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने जिल्हा, राज्य व राष्ट्रीय स्तरावरील क्रीडा नैपुण्य प्राप्त खेळाडूंना क्रीडा शिष्यवृत्ती देण्याच्या ठरावास मा. महानगरपालिका सर्वसाधारण सभेने मंजुरी दिलेली आहे.

## टिटवाळ्यात दोन वर्षाच्या चिमुकलीवर लैंगिक अत्याचार

■ टिटवाळा

कल्याण तालुक्यातील टिटवाळयाजवळील दहागावमध्ये एका नराधमाने एका दोन वर्षाच्या मुलीवर लैंगिक अत्याचार केल्याची घटना शुक्रवारी उघडकीला आला आहे. याप्रकरणी मुलीच्या पालकांच्या तक्रारीवरून टिटवाळा पोलिसांनी तात्काळ गुन्हा दाखल करून आरोपीला अटक केली आहे. याप्रकरणाने दहागाव परिसरातील नागरिकांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे.

विनयभंग, लैंगिक अत्याचार करणाऱ्या गुन्हेगारांना तात्काळ कठोर शिक्षा होत नसल्याने हे प्रकार वाढत असल्याचा नागरिकांचा सूर आहे. दहागावमधील एक दोन वर्षाची चिमुकली शुक्रवारी दुपारी आपल्या घराच्या अंगात खेळत होती. त्यावेळी आरोपी नराधम तेथे आला. त्याने मुलीला खाऊ देण्याचे आमिष दाखवून गावा बाहेरील निर्जनस्थळी नेले. तेथे त्याने तिच्यावर लैंगिक अत्याचार केले. घडल्या प्रकाराने मुलगी घाबरली. तिला असह्य वेदना सुरू झाल्या. घटनास्थळावरून नराधन पळून गेला. मुलगी रडत घरी आली. अंगणात खेळत असलेली मुलगी का रडते म्हणून तिला काही सरपटणारा साप चावला आहे का, तिच्या अंगाला काही झाले आहे का याची चाचपणी पालकांनी केली. घडल्या प्रकाराबाबत मुलगी काही सांगू शकत नव्हती. नंतर पालकांच्या मुलीवर लैंगिक अत्याचार झाला असल्याचे लक्षात आले. हा प्रकार करणारा इसम पालकांच्या लक्षात येताच त्याच्या नावाने टिटवाळा पोलीस ठाण्यात तक्रार करण्यात आली.

## नवोदित शिल्पकारांना छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा उभारण्याची जबादारी देण्याचा निर्णय चुकीचा होता

### रामदास आठवलेंनी राजकोट किल्ल्याला भेट देऊन केली पाहणी

प्रतिनिधी
■ मालवण

छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळण्याची दुर्घटना अत्यंत दुःखद मनाला चटका लावणारी आहे.या प्रकरणी सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी. मालवण राजकोट येथील छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा उभारण्याचे काम नवोदित शिल्पकारास देण्याचा निर्णय चुकीचा होता.राज्यात राम सुतार आणि सारंग सारखे ज्येष्ठ अनुभवी शिल्पकार असताना नवोदितांना ही मोठी जबाबदारी देण्याचा निर्णय चुकीचा होता असे मत रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना रामदास आठवले यांनी व्यक्त केले.

आज मालवण मधील राजकोट किल्ल्याला ना रामदास आठवले यांनी आज भेट देऊन छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा



कोसळण्याची दुर्घटना घडलेल्या जागेची पाहणी केली.

मालवण राजकोट मध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळण्याची दुर्घटना अक्षम्य आहे.मोठे वादळ आलेले नसताना पुतळा कसा कोसळला याची सखोल चौकशी झाली पाहिजे.नेव्ही आणि पीडबल्यूडी च्या जबाबदार अधिकाऱ्यांची चौकशी झाली पाहिजे. याप्रकरणी दोषींना कठोर शिक्षा झाली पाहिजे. जो कोणी मुख्य दोषी असेल त्यास फशीची कठोर शिक्षा झाली पाहिजे असा हा गुन्हा घडला आहे.असे ना रामदास आठवले म्हणाले.

याप्रकरणी पंतप्रधान मोदींनी माफी मागितली आहे. मुख्यमंत्री शिंदेंनी माफी मागितली आहे. त्यामुळे विरोधकांनी यात राजकारण करू नये. या प्रकरणी चौकशी समिती नियुक्त करण्यात आली आहे. विरोधकांनी यात राजकारण करू नये. छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा पुन्हा कसा मजबूत चांगला भव्य उभारता येईल यासाठी सर्वांनी एकत्र प्रयत्न करावेत.त्यासाठी राज्य सरकार ने नव्याने पुतळा उभारण्यासाठी सरकारी पक्षासोबत विरोधी पक्षातील लोकप्रतिनिधींना आणि तज्ञांचां समावेश करून समिती नियुक्त करावी.या समितीने नवीन पुतळा कसा असावा आणि त्याच्या निर्मिती चे काम कुणास द्यावे याचा शासनाला सल्ला द्यावा.अशी समिती स्थापन करण्याची आपली मागणी असून आपण याबाबत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेणार आहोत असे ना रामदास आठवले म्हणाले.

कन्याकुमारी येथे तीन समुद्राचा संगम आहे तिथे अनेक पुतळे आहेत मात्र आजवर कधीही पुतळा कोसळण्याची दुर्घटना घडली नाही.मात्र राजकोट मध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळण्याची दुर्घटना घडली याचे दुःख आहे असे ना. रामदास आठवले म्हणाले.

## मांडवा - गेटवे जलवाहतूक पुन्हा जोमाने सुरु

### गणेशभक्तांसाठी मोठा दिलासा

प्रतिनिधी
■ अलिबाग

पावसाळ्याच्या कालावधीत बंद असलेली मुंबई-गेट वे ते मांडवा ही जलवाहतूक सेवा आजपासून पुन्हा सुरू करण्यात येत आहे. 1 सप्टेंबरपासून ही सेवा पुन्हा सुरू झाली आहे. त्यामुळं गणेशभक्तांसाठी हा मोठा दिलासा ठरणार आहे. अलिबाग येथे जाण्यासाठी पर्यटकांची मोठी गर्दी असते. रस्तेमार्गे अलिबाग गाठण्यासाठी खूप वेळ खर्ची पडतो. मात्र, या मांडवा-गेट वे सेवेमुळं अलिबागमध्ये पोहोचण्यासाठी अवघा 1 तास लागतो. त्यामुळं अनेक नागरिकांसाठी ही जलवाहतूक खूप फायद्याची ठरते.

जून ते ऑगस्ट या दोन महिन्याच्या कालावधीत पावसाचा जोर जास्त असतो. अशावेळी मांडवा-गेटवे जलवाहतूक बंद ठेवण्यात येते. आता पावसाचा जोर काहीसा कमी



झालेला आहे. त्यामुळं मांडवा ते गेट वे जलवाहतूक सेवा रविवारपासून सुरू करण्यात आली आहे. हवामानाचा अंदाज घेऊन दिवसाला एक ते दोन फेऱ्या होणार आहेत, असं कंपनीकडून सांगण्यात येत आहे. तीन महिने ही सेवा बंद होती. मात्र आता सेवा सुरू झाल्यापासून गणेशोत्सवासाठी कोकणात विशेषतः अलिबाग मुरुड तालुक्यात येणाऱ्या चाकरमान्यांना मोठा दिलासा मिळणार आहे.

पर्यटन हंगामाला ही चालना मिळणार आहे. हवामानाचा अंदाज घेवून मेरीटाईम बोर्डाने हा निर्णय घेतला आहे. वातावरणाची स्थिती पाहूनच ही सेवा सुरू ठेवण्यात यावी अशा सूचना मेरी टाईम बोर्डाने वाहतूकदार संस्थांना दिल्या आहेत. गणपती बाप्पाचे आगमन 7 सप्टेंबर रोजी होणार आहे. त्यामुळं अलिबागहून मुंबईत येणाऱ्या चाकरमान्यांना जलवाहतूक सुरू झाल्याने दिलासा मिळाला आहे. अलिबाग ते रस्तेमार्गे अंतर जास्त असल्याने वेळ जास्त लागत होता. तसंच, रोरो सेवेचे तिकिट जास्त असल्याने ती परवडत नाही. मात्र आता मांडवा- गेटवे सेवा सुरू झाल्याने प्रवास अधिक आरामदायी होणार आहे.

# लढवय्या सलामीवीर शिखर धवन

**भारताचा** माजी डावखुरा लढवय्या सलामीवीर, ३८ वर्षीय शिखर धवनने अखेर आपल्या १४ वर्षाच्या आंतरराष्ट्रीय क्रिकेट कारकिर्दीला पूर्णविराम देण्याचा निर्णय घेतला. गेल्या २ वर्षापासून भारतीय क्रिकेट संघासाठी शिखरला दरवाजे बंद झाले होते. दुखापती, खराब फॉर्म आणि गिल-जयस्वाल या युवा सलामीच्या जोडीचे भारतीय क्रिकेट संघात यशस्वी आगमन झाल्यामुळे शिखरसाठी आता भारतीय संघात स्थान मिळविण्याची शक्यता फारच कमी होती. त्यामुळे त्यांनी आपली बॅट "म्यान" करण्याचा घेतलेला निर्णय योग्यच म्हणावा लागेल. आपल्या धडाकेबाज आणि फटकेबाज फलंदाजीचा ठसा शिखरने उमटवला. सोनेट क्लब, पश्चिम दिल्ली येथून आपला क्रिकेटचा श्रीगणेशा करणाऱ्या शिखरकडे वेगवान गोलंदाजी खेळण्याचे तंत्र फारसे चांगले नव्हते. तरी देखील जबरदस्त जिद्दीच्या आणि बेधडकपणाच्या जोरावर कायम सकारात्मक असलेल्या शिखरने भारतीय संघातील स्थान निश्चित केले ही देखील बाब कौतुकास्पद म्हणावी लागेल.

तारक सिन्हा, मदन शर्मा यांच्या तालमीत शिखर तयार झाला. दिल्लीकर असलेल्या धडकेबाज फलंदाजीसाठी प्रसिद्ध असलेल्या विरेंद्र सेहेवागची भारतीय संघातील जागा घेणाऱ्या शिखरने मग त्याचाच वसा पुढे कायम ठेवला असे म्हटले तर वावगे ठरू नये. एखाद्या कुस्तीपटू प्रमाणे मजबूत शरीरियष्टी लाभलेल्या शिखरच्या फटक्यात विविधता बघायला मिळाली. पूर्ण ताकदीने मारलेले त्याचे अनेक फटके सीमारेषा कधी पार करायचे ते क्षेत्ररक्षकांना कळत नसायचे. गोलंदाजांवर तुफानी हल्ला चढवायला शिखरला नेहमीच आवडायचे. गोलंदाजांना कधीच वरचढ होऊ द्यायचे नाही अशीच शिखरची देहबोली असायची. "गब्बर" या टोपणनावाने ओळखल्या जाणाऱ्या शिखरचे आंतरराष्ट्रीय पदार्पण मात्र खराब होते. सलामीच्या दोन वनडे सामन्यात त्याला भोपळा देखील फोडता आला नाही. त्यामुळे पुन्हा संघात स्थान मिळविण्यासाठी त्याला काही काळ झगडावे लागले.



२०१३ साली ऑस्ट्रेलियाविरुद्ध त्याने मोहाली कसोटीत पदार्पण केले. सेहेवागला डावलून त्यावेळी निवड समितीचे अध्यक्ष असलेल्या मुंबईकर माजी कसोटीवीर संदीप पाटील यांनी धवनला त्या कसोटीत खेळण्याची मोठी संधी दिली. त्या संधीचे शिखरने सोने केले. त्याने तुफानी १८५ धावांची जबरदस्त शतकी खेळी केली. अवघ्या ८५ चेंडूत त्याने शतक ठोकले. कसोटीत पदार्पणात एवढ्या कमी चेंडूत शतक काढणारा शिखरपहिला फलंदाज ठरला. हा कसोटी सामना भारताने सहज जिंकला होता. यावेळी नशीबदेखील त्याच्यावर खूष होते. ऑस्ट्रेलियन वेगवान गोलंदाज स्टार्क गोलंदाजी करताना त्याच्या हाताला लागून सुटलेला चेंडू थेट यष्टिवर आदळला होता. त्यावेळी नॉनस्ट्रायकर एंडला उभा असलेला शिखर क्रीझच्या बाहेर होता. त्यावेळी त्याच्या नावावर फारशा धावा देखील नव्हत्या. नियमाप्रमाणे शिखर बाद होता. परंतु ऑस्ट्रेलियन खेळाडूंनी अपील न केल्याचा फायदा शिखरला मिळाला. मग मात्र शिखरने मागे वळून बघितलेच नाही. पुढील ७-८ वर्षे भारतीय संघातील त्याचे स्थान पक्के झाले.

कर्णधार रोहित शर्मा आणि विराट कोहली सोबत त्याने अनेक महत्त्वपूर्ण भागिदाऱ्या करून भारतीय विजयात मोलाची भूमिका बजावली. संघ जिंकावा यासाठीच शिखरची नेहमी धडपड असायची. विशेषतः आयसीसी क्रिकेट स्पर्धामध्ये त्याची बॅट खूप चालली. इंग्लंडमध्ये झालेल्या चॅम्पियन्स ट्रॉफी विजयात शिखरची मोठी भूमिका होती. स्पर्धेत सर्वाधिक धावा काढतना त्याने सर्वोत्तम खेळाडूचा मान देखील मिळवला होता. इतरांना नेहमीच मदतीचा हात देणारा शिखर झेल टिपल्यावर मांडीवर हात मारून कबड्डीपटूंप्रमाणे जल्लोष करणारा क्रिकेट प्रेमींना नेहमीच मैदानावर बघायला मिळाला. तो क्रिकेटमध्ये नसता तर चांगला कबड्डी अथवा कुस्तीपटू म्हणून पुढे आला असता.

२००४ मध्ये ढाक्का येथे झालेल्या १९ वर्षांखालील विश्व क्रिकेट स्पर्धेसाठी शिखरची निवड सुरुवाती भारतीय संघात करण्यात आली नव्हती. त्यावेळी बीसीसीआयच्या टॅलेंट सर्च डेव्हलपमेंट कमिटीचे अध्यक्ष दिलीप वेंगसरकर होते. त्यांनी निवड समिती सदस्यांकडे तेव्हा शिखरच्या निवडीसाठी आग्रह धरला. वेंगसरकरांचा मान राखून शिखरला भारतीय संघात स्थान मिळाले. मग ही स्पर्धा शिखरने चांगलीच गाजवली. त्यांनी ७ सामन्यात ८४.१६ च्या सरासरीने ५०५ धावा ठोकल्या होत्या. त्यामुळे संदीप पाटील आणि दिलीप वेंगसरकर या दोघांचे ऋण शिखर कधीच विसरू शकत नाही. ३४ कसोटी, १०७ वनडे आणि ६८ टी-२० सामने तो भारतातर्फे खेळला. वन डे सामन्यात ५ हजारपेक्षा जास्त धावा करणारा, ४० पेक्षा जास्त सरासरी असणारा आणि ९० पेक्षा जास्त स्ट्राइकरेट असणाऱ्या विश्वातील ८ अव्वल फलंदाजांमध्ये शिखरचा समावेश आहे. धोकादायक फलंदाज म्हणून ओळखल्या जाणाऱ्या शिखरला २०१८च्या आशियाचषक स्पर्धेत सर्वोत्तम खेळाडूचा मान मिळाला होता. क्रिकेटचे "बायबल" समजल्या जाणाऱ्या "विस्डेन" मासिकाने देखील शिखरची दखल घेतली. तर आयसीसीचा सर्वोत्तम फलंदाजाचा पुरस्कार देखील शिखरला मिळाला. प्रथम दर्जाच्या सामन्यात तो दिल्ली आणि पंजाबतर्फे खेळला तर आयपीएल स्पर्धेत दिल्ली, मुंबई, पंजाब, हैद्राबादचेत्याने प्रतिनिधित्त्व केले. २०१६ साली हैद्राबाद संघाने आयपीएल स्पर्धा जिंकली होती. त्या विजयात शिखरचा वाटा मोठा होता. आयपीएल स्पर्धेत विराट कोहली नंतर सर्वोधिक धावा करणाऱ्या फलंदाजांमध्ये शिखर दुसऱ्या स्थानावर आहे. आतापर्यंत २२२ आयपीएल सामने खेळणाऱ्या शिखरने ६७०० पेक्षा जास्त धावा पटकावल्या. त्यात २ शतके आणि ५० अर्ध शतकांचा समावेश आहे. तब्बल सव्वाशे कोटीचा धनी असलेला शिखर पुढे काय करणार याची उत्सुकता त्याच्या चाहत्यांना आहे. प्रशिक्षक, बॉलिवुड अथवा व्यवसायिक यामध्ये तो आपली भावी कारकीर्द करू शकतो असा अंदाज आहे. या लढाऊ बाणा असलेल्या फलंदाजाच्या वाट्याला फारसे कौतुकमात्र आले नाही. तसेच दिर्घकाळ भारतीय संघाचे नेतृत्त्व करण्याची जास्त संधी शिखरला मिळाली नाही. बऱ्याचदा छोट्या दौऱ्यांसाठी ज्येष्ठ खेळाडू उपलब्ध नसताना कर्णधार पदाची जबाबदारी शिखरकडे दिली जात होती. शिखरने भारतीय क्रिकेटसाठी दिलेले योगदान मात्र भारतीय क्रिकेटप्रेमी विसरू शकणार नाही.

**- सुहास जोशी,** ज्येष्ठ क्रीडा पत्रकार

# गणेशोत्सवात विधायक कामे करावीत

लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सव सुरू करून आज १३० वर्ष झाली. इंग्रजांच्या राजवटीत भारतीय संस्कृतीची उघड उघड विटंबना होत होती. इंग्रजांच्या दमनशाही विरुद्ध तरुण एकत्र यायला तयार नव्हते. तरुणांना एकत्र आणल्याशिवाय इंग्रजांविरुद्ध लढा देणे अशक्य आहे हे ओळखून लोकमान्य टिळकांनी तरुणांना एकत्र आणण्यासाठी व त्यांच्यात देशभक्तीची मशाल पेटवण्यासाठी सार्वजनिक गणेशोत्सव सुरू केला. हळूहळू सार्वजनिक गणेशोत्सव ही महाराष्ट्राची परंपरा बनली. आजही ती परंपरा मोठया भक्तिभावाने जोपासली जाते. लोकमान्य टिळकांनी सुरू केलेला सार्वजनिक गणेशोत्सव महाराष्ट्रात मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण देशात गणेशोत्सव मोठ्या जल्लोषात साजरा केला जातो. गणेशोत्सव हा महाराष्ट्राचा मानबिंदू आहे. गणेशोत्सव महाराष्ट्राची ओळख आहे. लवकरच गणेशाचे आगमन होणार आहे. गणेशोत्सवाच्या दहा दिवसांच्या कालावधीत सर्वच गणेशभक्त गणेशाची मनोभावी पूजा करतात. सर्वत्र उत्साहाचे आणि जल्लोषाचे वातावरण असते मात्र अलीकडच्या काळात गणेशोत्सवाचे हे स्वरूप बदलू लागले आहे. टिळकांनी ज्या उद्देशाने हा सण सुरू केला तो उद्देशच आता हरपला आहे. इतकेच काय पण या उत्सवाचे पावित्र्यही कमी होऊ लागले आहे. आज गणेशोत्सव हा उत्सव न राहता इव्हेंट बनला आहे. उंचच उंच मूर्तींची जणू स्पर्धाच सुरू झाली आहे. या मोठ्या मुर्त्या समुद्राच्या पाण्यात विसर्जित करताना दोरीच्या साहाय्याने बांधाव्या लागतात. उंचच उंच मूर्तीचे अवडंबर न माजवता पर्यावरण पूरक गणेश मूर्ती खरेदी करून तिची प्राणप्रतिष्ठा करावी. शास्त्रानुसार शाडूच्या मातीने गणेश मूर्ती बनवावी, असे सांगितले आहे असे असतानाही सर्रास प्लॅस्टर ऑफ पॅरिसपासून मुर्त्या बनवल्या जातात. या मुर्त्या पाण्यात विरघळत नसल्याने पाण्याचेही प्रदूषण होते. गणेशोत्सवाच्या दहा दिवसांत ध्वनी प्रदूषणही खूप वाढते. गणेशोत्सवात डॉल्बीच्या स्पीकरवर मोठमोठ्या आवाजात गाणी लावून चित्रपटांच्या गाण्यावर हिडीस नृत्य करण्याची फॅशन रूढ झाली आहे. या डॉल्बीचा आवाज इतका मोठा असतो की त्याचा परिणाम लहान मुले व जेष्ठ नागरिकांच्या श्रवण इंद्रियांवर होऊ शकतो. उत्सवाच्या नावाखाली वर्गणी उकळली जाते प्रसंगी धमकीही दिली जाते. त्यावरही गणेशभक्त नाराज आहेत. भक्तांनी जितकी वर्गणी दिली गणेश मंडळांनी तीच दान म्हणून स्वीकारावी. गणेशोत्सवात डोळे दिपवणारी रोषणाई केली जाते त्यामुळे विजेचाही अपव्यय होतो. तेंव्हा सजावटी रोषणाई यावर मर्यादा घालावी. काही सार्वजनिक गणेशोत्सव मंडळे आपल्या मंडळाचे मार्केटिंग करत आहेत. नवसाला पावणारा गणपती अशी जाहिरात करून सिलेंब्रेटींना बोलवले जाते. त्यातूनच मग मंडळा- मंडळामध्ये मतभेद होऊन तेढ निर्माण होते त्यातूनच मग कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होतो. टिळकांनी गणेशोत्सव साधेपणाने साजरा करण्यास सांगितले आहे. दुसऱ्यांना त्रास होऊ न देता गणेशोत्सव साजरा केला पाहिजे. गणेश मंडळांनी दहा दिवसांच्या कालावधीत सामाजिक उपक्रम राबवले पाहिजेत. गणेश मंडळांनी समाजाला उपयोगी पडतील अशी विधायक कामे करावीत. रक्तदान शिबिर, दुष्काळग्रस्तांना, पूरग्रस्तांना मदत तसेच गरीब आणि कोरोना काळात पालक गमवलेल्या अनाथ मुलांचे शैक्षणिक पालकत्व स्वीकारावे. अनाथ आश्रम, वृद्ध आश्रमांना मदत करावी. गणेश मंडळांनी शालेय विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव दिला पाहिजे. मंडळांनी शालेय विद्यार्थ्यांच्या गीत गायन स्पर्धा, नृत्य स्पर्धा यांचे आयोजन करावे. गणेश ही बुद्धीची देवता आहे त्यामुळे विद्यार्थ्यांची बुद्धिमत्ता वाढीस लागेल असे उपक्रम राबवावेत. हा उत्सव जितका साधेपणाने साजरा केला जाईल तितकेच त्याचे पावित्र्य कायम राहील आणि भक्तांनाही त्याचा आनंद लुटता येईल.

**- श्याम ठाणेदार, पुणे**

# मुलींच्या सुरक्षिततेवर उपाय नाहीत, लोकांच्या बंदला प्रतिबंध मग चारित्र्य पडताळणी तरी करणार कां?

**गेल्या** काही दिवसांत मुली महिलांवरील अत्याचारांच्या घटनांमध्ये वाढ झाली असल्याचे प्रशासकीय आकडेवारी स्पष्ट करीत आहे. जिथे शिक्षणासाठी शिक्षणार्थी शाळा, आश्रमशाळा येथे एकत्रित येऊन आपल्या भावी आयुष्याचे पाया उभारणीचे कर्तव्य पार पाडत असतात त्याच ठिकाणी प्रशिक्षणाचे कार्य करणाऱ्या सेवकांकडून जर अत्याचार, अन्यायकारक प्रकार घडत असतील तर तेथील सुरक्षा व्यवस्थेवर विश्र्वास तरी कसा ठेवायचा असे प्रश्न उपस्थित होतात. बदलापूर येथील अत्याचाराच्या घटनेस ताबडतोब प्रसिद्धि मिळाल्याने स्थानिक आणि जिल्हा पातळीवरील लोकांकडून निषेध, मोर्चे, धरणे धरण्याची आंदोलने आयोजली गेली. लोकांच्या मनातील भावना अनावर झाल्याने त्यांनी या निषेध प्रकारांना उस्फूर्त प्रतिसाद दिला. या घटनांच्या चौकशा तपास यांच्या दिरंगाई विरोधात विरोधी पक्षांनी सरकारी निर्णयांचा निषेध व्यक्त करण्यासाठी बंदचे आवाहन केले, परंतु या बंदवर मा.न्यायालयाकडून मनाई आदेश दिले गेल्याने लोकांनी काळे झेंडे दाखवत ठिकठिकाणी धरणे आंदोलन करीत सरकारचा निषेध केला. विरोधकांचा बंद हाणून पाडण्यासाठी सरकारने न्यायालयाचा आसरा घेतला, त्याचप्रमाणे या पुर्वी बेपत्ता असलेल्या स्त्रियां/मुलींच्या तपासासाठी शीघ्र तपासण्या मोहिमा, हिट अँड रन मधील आरोपींवर फास्ट ट्रॅक कोर्ट केसेस चालवून अन्यायग्रस्तांना न्याय मिळवून दिला असता सरकारची विश्वासार्हता वाढून सरकारच्या कारवाई करण्यावरचा भरवशात भर पडली असती. सध्या सरकारकडून अत्त्याचार करणाऱ्यांवर ठोस कारवाई केली जाईल अशी फक्त आश्वासने दिली जात आहेत. यापूर्वी देखील सरकारने अनेक गुन्हेगारी प्रसंगांवर आधारित चौकशा तपास करून अटक करण्यात आलेल्या गुन्हेगारांवर कारवाया करण्याची आश्वासने दिली होती त्यांची प्रत्यक्ष अमंलबजावणी अद्याप बाकी आहे. या साऱ्या प्रकारांचा विचार करता सरकार गुन्हेगारांना पाठीशी घालत आहे असे जे काही आरोप केले जात आहेत त्यात काही अंशी तथ्य असावे अशी सामान्यांच्या मनात संभ्रमात्मक भावना निर्माण होणे स्वाभाविक आहे.



बदलापूर येथील शाळेत दोन अल्पवयीन मुलींवर झालेल्या अत्त्याचारांनी राज्यभर तीव्र पडसाद उमटत आहेत. त्यात आरोपीच्या पार्श्वभूमीचा त्याच्या नेमणूक करतांना तपास केला होता का असा सवाल विचारला जात आहे. कारण अनेक परप्रांतीय लोक येथे आल्यावर महिलांवर अत्याचार करून पुन्हा आपल्या राज्यात निघून जातात. त्यामुळे त्यांच्या गुन्ह्यांचा तपास करणे पोलीस यंत्रणेला कठीण होऊन बसते. वसई, न्हावा शेवा, कोपरखैरणे, उरण येथील महिलांवर झालेल्या अत्याचारांच्या घटनांवर राज्य महिला आयोग तपास करीत आहे त्या ठिकाणी झालेल्या अत्याचारांमध्ये गुन्हेगार ठरलेले सर्व आरोपी परप्रांतीय असून त्यांच्या चारित्र्य तपासणी संबंधी माहितीअभावी तपास कार्यात काही अडथळे निर्माण होत आहेत. अशाच प्रकारच्या कारणांनी तपास कार्ये दीर्घकाळ सुरु रहातात त्याचा फायदा आरोपी उठवतात आणि आपापल्या गावी पलायन करतात. पोलिसांनी तरी अशा किती लोकांना गाठून तपास कार्य सुरु ठेवायचे ! गुन्हे वाढतच आहेत, त्यांच्या तपासांची, चौकशांची प्रकरणे देखील वाढतच आहेत यावर कुणाचाही दबाव आहे असे दिसून येत नाही असे प्रकार आवाक्याबाहेर जाऊ नयेत अशा भावनेने लोकं भयभीत होऊ शकतात. त्यावर काहीतरी उपाययोजना करणे आवश्यक आहे यांवर एकत्रित कृती करण्याची गरज भासू लागली. त्याचसारख्या अनेक कारणांवर एक उपाय म्हणून महिला आयोग अध्यक्षांनी राज्यात कामानिमित्त येणाऱ्या परप्रांतीयांची चारित्र्य पडताळणी करावी अशी सरकारकडे शिफारस केली आहे अशा प्रकारच्या पडताळणीने परराज्यांतून आलेल्यांच्या पार्श्र्वभूमीची नोंद केली गेल्यास त्यांतील माहितीच्या आधारावर गुन्हेगारांचा मागोवा घेणे तपास यंत्रणांना फार मोठ्या मोलाचे ठरु शकेल. प्रत्येक राज्यांमध्ये कामानिमित्त परप्रांतात जाणाऱ्या लोकांचा तपशील ईतर प्रांतांतून येणाऱ्या तपास यंत्रणांना उपलब्ध झाल्यास तपासाची गती वाढून निकाल लावून, सजा ठोठावण्याच्या प्रक्रिया अल्पावधीत पार पाडल्या जातील. छायाचित्र असलेल्या ओळखपत्राशिवाय कोठल्याही प्रकारच्या नोकऱ्या न देण्याच्या अटी गुन्ह्यांवर नक्कीच आळा घालण्यास उपयुक्त ठरतील. केन्द्र व राज्य सरकारांनी या शिफारशींना मान्यता दिल्यास गुन्हे, अत्याचार यांचे प्रमाण कमी होईल किंबहुना तशी दुष्कृत्ये करण्यास कुणीही सहजासहजी धजावणार नाही असे वाटते."

**- स्नेहा राज, गोरेगांव.**

# बैलपोळा – गंमतीदार माहिती व फोटो !

> अगदी प्राचीन काळापासून भारतात शेती हा सर्वात मुख्य व्यवसाय होता. एखाद्याची प्रतिष्ठा ही त्याच्याकडील गोधनाच्या संख्येवर ठरत असे. आता तर शेतीचे महत्व खूपच वाढू लागले आहे. " ॲग्रिकल्चर इज द कल्चर ऑफ इंडिया " असे म्हटले जाते ! साहजिकच पूर्वी आपल्या संस्कृतीत जमीन, माती, शेतकरी, बैल, नांगर, बैलगाडी अशा गोष्टींना ठिकठिकाणी महत्वाचे स्थान दिलेले

शेती या अतिशय महत्वाच्या व्यवसायाचे अगदी आजसुद्धा, दोन सर्वात महत्वाचे दुवे म्हणजे शेतकरी आणि त्याचे बैल ! बैल म्हणजे नांगरणी, पेरणी, वाहतूक, पाणी काढण्यासाठी रहाट किंवा मोट ओढणे अशा अतिशय महत्वाच्या कामांमधील सर्वात उपयुक्त प्राणी आहे ! खूप मेहेनतीची आणि कष्टाची कामे, कमालीच्या ताकतीने बिनबोभाट करणारा बैल हा अद्वितीय प्राणी आहे. शेतकरी आणि बैल या दोघांमधील नातेही मोठे विलक्षणच ! हे असे नाते साजरे करण्याचा वर्षातील महत्वाचा सण म्हणजे बैल पोळा म्हणजेच पोळा किंवा बेंदूर ! श्रावणातील अमावास्येला मातृदिन, पिठोरी अमावस्या आणि बैल पोळा असे तीन सण साजरे केले जातात. या अमावास्येपर्यंत शेतीमधील पूर्वार्धातील सर्व मेहेनतीची कामे संपलेली असतात. यावेळी मातृदिनाच्या निमित्ताने आईबद्दल ( आणि धरती मातेबद्दलही ) कृतज्ञता व्यक्त केली जाते. हजारो वर्षे जुन्या हिंदू धर्मातील हा





मदर्स डे ! पिठोरीच्या पूजेमध्ये स्वत:च्या मुलांच्या स्वास्थ्यासाठी प्रार्थना केली जाते. आणि पोळ्यामध्ये बैल या शेतीमित्राचे कौतुक असते. गणेश चतुर्थीच्या दुसऱ्या दिवशी येणाऱ्या ऋषीपंचमीला, बैलाच्या श्रमाचे काहीही न खाण्याची पद्धत आहे ती बैलाला आणखी एक दिवस आराम देण्याच्या दृष्टीनेच आहे. मात्र बैलांच्या जीवावर उठणाऱ्या झुंजी, जलिकट्टू सारख्या शर्यती, बैलजोड्यांच्या शर्यती, विदेशातील बुलफाइट्स या गोष्टी बैलांसाठी काहीच उपयोगाच्या नसतात. श्रीमंत मालक केवळ आपल्या चैनीसाठी या मुक्या प्राण्यांच्या जीवावर उठतात. पण सर्वसाधारण शेतकरी मात्र बैलाला आपला कुटुंबीयच मानतो.

येत्या २ सप्टेंबर २०२४ ला मातृदिन, पिठोरी अमावस्या, बैलपोळा आहे. या निमित्ताने ६८ वर्षांपूर्वीच्या आमच्या शालेय पाठयपुस्तकातील शेतकरी, पोळा सण यांची माहिती देणाऱ्या धड्यांच्या पानांचे फोटो देत आहे. तसेच शेती या पूर्ण वेगळ्या, महत्वाच्या आणि शहरी माणसांचा फारसा संबंध न येणाऱ्या विषयावरील माझ्याकडील कांही वस्तू

**छायाचित्र क्रमांक १ --** धान्य पेरणीसाठी वापरल्या जाणाऱ्या तिफणीवरील अत्यंत कलात्मक असे चाड किंवा चाडे ! याला जमिनीचे तोंड असेही म्हणतात. उखळीच्या आकाराच्या या भांड्याला २, ३ किंवा ४ अशी आरपार छिद्रे असतात. पेरणी करतांना मुठीतून या चाडेत बियाणे घातले जाते. त्याला जमिनीपर्यंत जोडलेल्या नळ्यांमधून ते बियाणे बरोबर सरळ रेषेतच जमिनीत पडते. सोबतच्या फोटोतील माझ्याकडील या लाकडी चाडेवर खूप छान कोरीव काम केलेले आहे. चार बाजूंना गणपती, मारुती आणि २ बैल यांची चित्रेही कोरलेली दिसतात. छायाचित्र क्रमांक २ -- बैलांची शिंगे रंगविल्यावर त्यांच्या टोकांवर ही कलात्मक पितळी टोपणे खिळ्यांनी ठोकून बसवतात. यांना शिंगऱ्या किंवा शिंगोळ्या म्हणतात. यातील एका शिंगोळीचे वजन २०० ग्रॅम ते ५०० ग्रॅम इतके असते. छायाचित्र क्रमांक ३ -- ही शिंगोळ्यांची खूप सुंदर जोडी. याच्या टोकांवर बैलाचे तोंड आहे. त्याखाली घुंगूर लावलेले आहेत. छायाचित्र क्रमांक ४ आणि ५ -- बैलांच्या गळ्यातील पितळी घुंगुरांच्या माळा. छायाचित्र क्रमांक ६ --- बैलांच्या मानेवर जेव्हां जोखड (जू) ठेवले जाते. त्याच्या मध्यातून एका बाजूने, एक पट्टा बैलाच्या गळ्याखालून घेऊन, जोखडाच्या शेवटी असलेल्या मोठ्या छिद्रामध्ये असलेल्या खुंटीमध्ये अडकविला जातो. अशी पितळी कोरीव खुंटी या छायाचित्रात पाहायला मिळते. छायाचित्र क्रमांक ७ -- शेतीमधील महत्वाचे अवजार, भगवान बलरामाचे आयुध म्हणजे नांगर ! आपण शहरात राहत असलो तरीही हा बैलपोळा आपण या वस्तूंचे फोटो पाहून, ही माहिती व जुन्या धड्याची पाने वाचून साजरा करायला हरकत नाही.









**- मकरंद करंदीकर.**

## गणाधीश चषक मोफत कॅरम स्पर्धा 13 सप्टेंबरला

**मुंबई :** बाळ गोपाळ-अभिलाषा गणेशोत्सव मंडळ व आयडियल स्पोर्ट्स अकॅडमीतर्फे माजी नगरपाल डॉ. जगन्नाथराव हेगडे सहकार्याने शालेय व कॉलेजमधील १८ वर्षाखालील मुलांची विनाशुल्क कॅरम स्पर्धा १३ सप्टेंबर रोजी काळाचौकी येथे आयोजित करण्यात आली आहे. विजेत्या-उपविजेत्यांना एकूण ८ आकर्षक चषक व स्ट्रायकर पुरस्कार दिला जाणार आहे. मुंबईतील ज्युनियर खेळाडूंच्या मागणीनुसार मोफत स्पर्धात्मक सराव उपलब्ध करून देण्यासाठी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. त्यासाठी लायन्स डॉ. जगन्नाथराव हेगडे व आयडियल स्पोर्ट्स अकॅडमी यांच्या मार्गदर्शनाखाली क्रीडाप्रेमी स्वप्निल शिंगे, रवींद्र गोनबरे, सिद्धेश ढोलम, शुभ्रतो वरेकर, ऋषिकेश शेडगे आदी मंडळी कार्यरत आहेत. स्पर्धेत भाग घेऊ इच्छिणाऱ्या संबंधीत स्पर्धकांनी प्रवेश अर्जासाठी अथवा अधिक माहितीसाठी संयोजक लीलाधर चव्हाण अथवा क्रीडा शिक्षक अविनाश महाडिक [९००४७ ५४५०७] यांच्याकडे ३ सप्टेंबरपर्यंत संपर्क साधावा.



# टीम इंडियात एन्ट्री पण अंडर 19 विश्वचषकातून बाहेर

- ज्युनिअर द्रविडचे स्वप्न भंगले
- स्पर्धेपर्यंत 19 वर्षांपेक्षा अधिक वय होणार

प्रतिनिधी
■ मुंबई

भारताचा माजी कर्णधार आणि माजी मुख्य प्रशिक्षक राहुल द्रविड यांनी त्यांच्या काळात अनेक विक्रम केले. आता त्यांचा मुलगा समित भारतासाठी खेळण्यासाठी सज्ज झाला आहे. समितची अंडर-19 संघात निवड झाली आ हे. समित भारताकडून ऑस्ट्रेलियाविरुद्ध मैदानात उतरणार आहे. समितची अलीकडची कामगिरी लक्षात घेऊन त्याची निवड करण्यात आली आहे. समितने या वर्षाच्या सुरुवातीला कूचबिहार ट्रॉफीमध्ये कर्नाटकसाठी उत्कृष्ट कामगिरी केली होती. समितची भारताच्या अंडर-१९ संघात निवड झाली असली तरी तो विश्वचषक खेळू शकणार नाही. २०२६ मध्ये अंडर-१९ विश्वचषक खेळवला जाणार आहे. राहुलच्या मोठ्या मुलाचा जन्म १० नोव्हेंबर २००५ रोजी झाला आणि तो आपला १९ वा वाढदिवस साजरा करण्यापासून फक्त दोन महिने दूर आहे. याचा अर्थ बीसीसीआयने २०२६ च्या विश्वचषकासाठी अंडर-१९ संघाची निवड केली तेव्हा त्याचे वय सुमारे २१ वर्षे असेल आणि त्यामुळे तो अंडर-१९ विश्वचषक स्पर्धेत भारताकडून खेळू शकणार नाही. समित द्रविड हा एक अफलातून अष्टपैलू खेळाडू समित द्रविड सध्या कर्नाटकात महाराजा टी २० ट्रॉफी खेळत आहे.

तो म्हैसूर वॉरियर्स संघाचा भाग आहे आणि त्याने सात डावात ११४ च्या स्ट्राइक रेटने मधल्या फळीतील फलंदाज म्हणून ८२ धावा केल्या आहेत, जरी त्याच्या वेगवान गोलंदाजीच्या क्षमतेचा उपयोग केला गेला नाही.

# पॅरालिम्पिकच्या चौथ्या दिवशी मनीषा-नित्या उपांत्य तर राकेश कुमारची उपांत्यपूर्व फेरीत धडक

वृत्तसंस्था
■ पॅरिस

पॅरालिम्पिकमध्ये भारताने आतापर्यंत चमकदार कामगिरी केली आहे. भारतीय खेळाडूंनी आतापर्यंत एकूण पाच पदके जिंकली आहेत. आतापर्यंत भारतीय खेळाडूंनी एक सुवर्ण, एक रौप्य आणि तीन कांस्य पदके जिंकली आहेत. चौथ्या दिवशी, पदकांची संख्या दुहेरी अंकात पोहोचू शकेल असे वाटले होते, मात्र भारताची पदरी निराशा आली आहे. परंतु, बॅडमिंटनपटू मनीषा रामदास आणि नित्या श्री सिवनने उपांत्य फेरीत आणि तिरंदाज राकेश कुमारने उपांत्यपूर्व फेरीत धडक मारली आहे.

भारताची बॅडमिंटन स्टार मनीषा रामदास हिने महिला एकेरीच्या SU5 प्रकारातील उपांत्यपूर्व फेरीत जपानच्या मामिको टोयोडा हिचा २१-१३, २१-१४ असा पराभव केला. त्याचबरोबर नित्या श्री सिवनने चमकदार कामगिरी केली आहे. महिलांच्या उपांत्यपूर्व फेरीतील सामना जिंकून तिने उपांत्य फेरीत धडक मारली आहे. नित्याने पोलंडच्या ऑलिव्हियाचा २१-४, २१-७ असा पराभव केला आहे. आता तिचा सामना चीनच्या लिन एस हिच्याशी होईल.

तसेच तिरंदाज राकेश कुमारने चमकदार कामगिरी केली आहे. त्याने उपांत्यपूर्व फेरीत धडक मारली आहे. राकेशने इंडोनेशियन आर्चरचा पराभव केला आहे.

पॅरालिम्पिकच्या चौथ्या दिवसाची सुरुवात भारतासाठी खूपच खराब झाली. बॅडमिंटनपटू मनदीप कौरचा पॅरालिम्पिक २०२४ मधील प्रवास संपला आहे. तिचा नायजेरियाच्या मरियम बोलाजीने २१-८, २१-९ असा सरळ सेटमध्ये सहज पराभव करून उपांत्य फेरीत प्रवेश केला. यानंतर पलक कोहलीलाही बॅडमिंटनमध्ये उपांत्यपूर्व फेरीत पराभव पत्करावा लागला आहे. तिला इंडोनेशियाच्या खेळाडूने २१-१९, २१-१५ ने पराभूत केले.



### रवी रोंगालीकडून निराशा



*पॅरिस पॅरालिम्पिकमध्ये भारताच्या रवी रोंगालीकडून पदक मिळवण्याची अपेक्षा होती, परंतु पुरुषांच्या F40 शॉट पुटच्या अंतिम फेरीत पाचव्या स्थानावर राहून तो पदकापासून वंचित राहिला. गेल्या वर्षी चीनमधील आशियाई पॅरा गेम्समध्ये रौप्य पदक जिंकणाऱ्या रवीने १०.६३ मीटरची वैयक्तिक सर्वोत्कृष्ट कामगिरी नोंदवली असली, तरी तो पहिल्या तीनमध्ये पोहोचण्यात अपयशी ठरला.*

**पॅरा शूटिंग: अवनी-सिद्धार्थ मिश्र स्पर्धेतून बाहेर**

पॅरा नेमबाजीच्या १० मीटर एअर रायफलच्या मिश्र प्रकारात सिद्धार्थ आणि अवनी या जोडीचे अंतिम फेरीतील स्थान हुकले. तसेच, श्रीहर्ष देवारेड्डी रामकृष्ण देखील १० मीटर एअर रायफल प्रोन एसएच-२ स्पर्धेच्या पात्रता फेरीतून बाहेर पडला आहे. तो ६३० .२ गुणांसह २६ व्या स्थानावर आहे.

## आमदार सुनिल शिंदे यांना महाराष्ट्र विधान परीक्षद उत्कृष्ट भाषण पुरस्कार



प्रतिनिधी
■ मुंबई

राष्ट्रकुल संसदीय मंडळ (महाराष्ट्र शाखा) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन यांच्यातर्फे विधानपरिषदेतील उत्कृष्ट कामगिरी साठी सन २०२३-२४ साला करीता देण्यात येणाऱ्या प्रतिष्ठेच्या महाराष्ट्र विधानपरिषद 'उत्कृष्ट भाषण' या पुरस्कारासाठी आमदार सुनिल शिंद यांची निवड करण्यात आली आहे. मंगळवार, दिनांक ३ सप्टेंबर २०२४ रोजी विधान भवन, मुंबई येथे भारताच्या महामहिम राष्ट्रपती महोदय यांच्या शुभहस्ते हा पुरस्कार प्रदान केला जाणार आहे. शिंदे यांना पुरस्कार जाहीर झाल्याबाबत सर्वच स्थरातील लोकांकडून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे. शिंदे यांच्या कार्यालयात त्यांना शुभेच्छा आणि अभिनंदन करण्यासाठी लोक गर्दी करत आहेत.

# बोईसर वर्षा मॅरेथॉन; तीन हजार धावपटूंचा सहभाग

प्रतिनिधी
■ पालघर

पालघर जिल्ह्यातील तीन हजार धावपटूंचा सहभाग असलेली बोईसर वर्षा मॅरथॉन स्पर्धा उत्साहात पार पडली. शिवसेना आणि आधार प्रतिष्ठान बोईसर आयोजित व पालघर जिल्हा अथेलेटिक्स असोसिएशन मान्यता प्राप्त मॅरथॉन स्पर्धेत सहभागी झालेल्या विविध गटातील विजेत्या स्पर्धकांना तब्बल एक लाख रुपयांची बक्षिसे देण्यात आली.



स्वच्छ बोईसर सुंदर बोईसर हे घोषवाक्य घेऊन शिवसेना पालघर जिल्हा आणि आधार प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी सकाळी बोईसर तारापूर मार्गावर वर्षा मॅरथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. शिवसेनेचे आदिवासी समाज महाराष्ट्र संघटक जगदीश धोडी, पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील,माजी जिल्हाप्रमुख वैभव संखे आणि आधार प्रतिष्ठानचे अध्यक्ष महेंद्र सिंह यांनी प्रथम खुल्या गटातील १० किमी स्पर्धेला झेंडा दाखवून सुरुवात केली. त्यानंतर टप्प्याटप्प्याने मुला मुलींची सहा किमी, पाच किमी, तीन किमी आणि साठ वर्षावरील ज्येष्ठ नागरिक यांच्यासाठी ची स्पर्धा पार पडली. ज्येष्ठ नागरिक गटात एका ९७ वर्षाच्या आजीबाईंनी एक किमी ची स्पर्धा पूर्ण करून सर्वांना आश्चर्याचा धक्का दिला. बोईसर वर्षा मॅरथॉन स्पर्धेत संपूर्ण पालघर जिल्ह्यातील विविध शाळा आणि महाविद्यालये आणि वैयक्तिक स्वरूपात जवळपास तीन हजार धावपटूंनी सहभाग घेतला. स्पर्धेदरम्यान पावसाने अचानक हजेरी लावल्याने सहभागी धावपटूंचा उत्साह अधिकच वाढीस लागला. स्पर्धा निर्विघ्न पार पडावी व धावपटूंना कोणताही अडथळा येऊ नये यासाठी बोईसर तारापूर रस्त्यावरील कुरगावपर्यंत बोईसर पोलीस स्टेशन, वाहतूक शाखेचे अधिकारी व कर्मचारी, आधार प्रतिष्ठानचे आयोजक,स्वयंसेवक, मॅरथॉन स्पर्धेचे अनुभवी मार्गदर्शक, प्रशिक्षक, पंच यांनी अगदी व्यवस्थित नियोजन केले होते. तर आयोजकांतर्फे धावपटूंसाठी बिस्किट्स आणि पाणी यांची धावण्याच्या मार्गावर जागोजागी व्यवस्था करण्यात आली होती. तुंगा, अधिकारी आणि शगुन या रुग्णालयाकडून रुग्णवाहिका, डॉक्टर्स, नर्स आणि प्रथमोपचार साहित्य यांची व्यवस्था केली होती.

बोईसर वर्षा मॅरथॉन स्पर्धेच्या उद्घाटनाला खासदार डॉ. हेमंत सावरा आणि पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील हे आवर्जून उपस्थित होते. तर जिल्हा परिषदेचे अध्यक्ष प्रकाश निकम, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख कुंदन संखे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी भानुदास पालवे, भाजपचे उपाध्यक्ष अशोक वडे, शिवशक्ती संघटनेचे अध्यक्ष संजय पाटील, अतुल देसाई, जिल्हा परिषद सदस्य महेंद्र भोणे, पूर्णिमा थोडी, अनंत वनगा, वसंत भसारा,रणवीर शर्मा, सत्यप्रकाश सिंह, डॉ. संतोष संगारे यांच्या हस्ते विविध वयोगटातील विजेत्या स्पर्धकांना बक्षीस वितरण करण्यात आले.

**खुला गट १० किमी विजेते स्पर्धक (पुरुष)**
प्रथम क्रमांक -रोहन चौधरी
द्वितीय क्रमांक - निखिल सिंग
तृतीय क्रमांक -निलेश आसरेकर

**खुला गट १० किमी विजेते स्पर्धक (महिला)**
प्रथम क्रमांक - जयश्री पुंजारा
द्वितीय क्रमांक - कविता दागडे
तृतीय क्रमांक - कलावती धांगडा

# मध्य रेल्वेचे नवे महाव्यवस्थापक म्हणून धर्म वीर मीना यांनी स्वीकारला पदभार

प्रतिनिधी
■ मुंबई

श्री धर्म वीर मीना यांनी . १/०९/२०२४ रोजी मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक म्हणून पदभार स्वीकारला आहे. ते १९८८ परीक्षेच्या बॅचमधील इंडियन रेल्वे सर्व्हिस ऑफ सिग्नल इंजिनिअर्स (IRSSE) चे अधिकारी आहेत. मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक म्हणून पदभार स्वीकारण्यापूर्वी ते मध्य रेल्वेचे प्रधान मुख्य सिग्नल आणि दूरसंचार अभियंता म्हणून कार्यरत होते. ३१ ऑगस्ट २०२४ रोजी सेवानिवृत्त झालेल्या राम करन यादव यांच्या रिक्त पदावर त्यांची नियुक्ती झाली आहे.



महाव्यवस्थापक म्हणून रुजू होण्यापूर्वी, एप्रिल २०२४ पासून मध्य रेल्वेचे प्रधान मुख्य सिग्नल आणि दूरसंचार अभियंता (PCSTE) म्हणून १२६ दिवसात महत्त्वपूर्ण छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस (CSMT) येथील इलेक्ट्रॉनिक इंटरलॉकिंग (EI) सह ऑटोमॅटिक ब्लॉक सिग्नलिंग (ABS), एक्सल काउंटर्स (BPAC) द्वारे ब्लॉक प्रूविंग करणे, गती वाढवणे, मल्टीट्रॅकिंग प्रकल्प, ऑपरेशनल अडथळे दूर करणे, लेव्हल क्रॉसिंग इंटरलॉकिंग आणि क्लोजर कामे, गतिशीलता आणि थ्रूपुट वर्धित कामे यासारखे विक्रमी ८८ सिग्नलिंग आणि संबंधित इंस्टॉलेशन्स प्रभावित केले आहेत. त्यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण क्षेत्रीय नेटवर्कवर कवच (KAVACH) च्या अंमलबजावणीसाठी निविदा आमंत्रित करणारी मध्य रेल्वे पहिली रेल्वे ठरली आहे.

श्री धर्म वीर मीना यांनी एम. बी. एम. अभियांत्रिकी महाविद्यालय, जोधपूर येथून १९८८ मध्ये इलेक्ट्रॉनिक्स आणि कम्युनिकेशनमध्ये बी.ई. केले असून त्यांनी कायद्याची पदवी देखील घेतली आहे. ते मार्च १९९० मध्ये रेल्वे मध्ये रुजू झाले.

त्यांनी दक्षिण पूर्व रेल्वे, पश्चिम रेल्वे, पश्चिम मध्य रेल्वे आणि मध्य रेल्वेत क्षेत्रिय आणि मुख्यालय या दोन्ही ठिकाणी विविध भूमिका बजावल्या आहेत. सिग्नलिंग प्रकल्प आणि मल्टीट्रॅकिंग प्रकल्पांशी संबंधित सिग्नलिंग कामे, संरक्षितता कामे विक्रमी वेळेत पूर्ण करणे हे त्यांच्या कार्यकाळाचे वैशिष्ट्य आहे.

# गोरेगांव मुलुंड लिंक रोड प्रकल्पात संतोष नगर मधील तोडलेले शौचालय पुन्हा बांधून द्या

### अन्यथा ४ सप्टेंबर रोजी आंदोलन - प्रिती सातम

प्रतिनिधी
■ मुंबई

गोरेगाव मुलुंड लिंक रोड प्रकल्पात संतोष नगर येथील तोडलेल्या १० आसनी शौचालयाच्या जागी नवीन पर्यायी शौचालय बांधून देण्याचा निर्णय ३ सप्टेंबर २०२४ पूर्वी न घेतल्यास ४ सप्टेंबर रोजी तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा भाजपच्या माजी नगरसेविका प्रिती सातम यांनी.पालिका आयुक्त भूषण गगराणी यांना दिलेल्या निवेदनात दिला आहे.

मुंबई महापालिकेच्यावतीने गोरेगाव मुलुंड लिंक रोड प्रकल्पाचे काम हाती घेण्यात आले असून हा प्रकल्प गोरेगाव पूर्व येथील संतोष नगर परिसरातून जात आहे. या प्रकल्पात बाधित संतोषनगर भागातील १० आसनी सार्वजनिक शौचालय तोडण्यात आले. सदर शौचालय तोडल्याने तात्पुरते मोबाईल शौचालयाची सुविधा पुरवण्यात आली. परंतु पूर्वीच्या शौचालयाचा वापर ३०० कुटुंबांकडून केला जात होता, त्यामुळे एवढ्या मोठ्या लोकवस्तीतील रहिवाशांना मोबाईल टॉयलेटचा वापर करणे शक्य होत नाही. विशेष म्हणजे या मोबाईल टॉयलेटचा वापर जास्त लोकांना करता येत नाही. या मोबाईल टॉयलेटमुळे सर्वाधिक दुर्गंधी पसरली असल्याने अनेक लोकांकडून त्याचा वापर होत नाही, तसेच या टॉयलेटमुळे विभागात दुर्गंधी पसरली आहे. येथील रहिवाशी रस्ता ओलांडून दुसरीकडील शौचालयाच्या सुविधेचा लाभ घेत आहेत. हा रस्ता ओलांडताना अनेकांचे अपघात होण्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे येथील नागरिकांसाठी तात्पुरत्या स्वरुपात एक विटांचे बांधकाम असलेले शौचालय बांधून द्यावे अशी मागणी मागील अनेक दिवसांपासून अतिरिक्त आयुक्त (प्रकल्प) तसेच संबंधित प्रकल्पांचे अधिकारी यांच्याकडे वारंवार करून व याचा पाठपुरावाही करत आहे. तसेच पालकमंत्र्यांच्या सभेतही हा मुद्दा उपस्थित केल्यानंतर प्रशासनाकडून सकारात्मक निर्णय घेतला जात नसल्याने अखेर स्थानिक लोकांसोबत मला रस्त्यावर उतरून आंदोलन करण्याशिवाय पर्याय राहिलेला नाही. असे या निवेदनात सातम यांनी म्हटले आहे



**मुंबई ।** मुंबई इलेक्ट्रिक वर्कर्स युनियनचे अध्यक्ष विठ्ठलराव गायकवाड यांनी युनियनच्या वर्धापनदिनानिमित्त गुणवंत विद्यार्थ्यांचे कौतुक केले. यावेळी युनियनचे सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पालघर येथे सायकल रॅली स्पर्धा उत्साहात



■ पालघर

रोटरी क्लब ऑफ पालघर आणि इनरव्हील क्लब ऑफ पालघर यांनी संयुक्तरीत्या आयोजित केलेल्या मान्सून सायकल रॅलीमध्ये वेगवेगळ्या ११ शाळांतून ३५८ स्पर्धक सहभागी झाले होते. चार गटांत संपन्न झालेल्या या स्पर्धेत ५ वी ते विद्यालयातद्यार्थ्यां ७ वी मुलांच्या गटात साईनाथ मिश्रा प्रथम, साहिल यादव द्वितीय व मेघ पाटील तृतीय आले. तर मुलींच्या गटात तनुश्री गडार प्रथम, राजनंदिनी द्वितीय व दीपा चव्हाण तृतीय आली. ८ वी ९ वी या मुलांच्या गटात सुशांत सांगळे प्रथम, वेदांत तिवारी द्वितीय व अनिकेत यादव तृतीय आलेत. तर मुलींच्या गटात कस्तुरी शिंदे प्रथम, शर्वी मोरे द्वितीय व श्राव्या मोहिते हिने तृतीय क्रमांक पटकाविला.

# दिवा शहर वर्षा मॅरेथॉन स्पर्धा संपन्न



प्रतिनिधी
■ ठाणे

शिवसेना दिवा शहर व धर्मवीर मित्र मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आज दि. ३१ ऑगस्ट रोजी दिवा शहरात भव्य मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. सदर मॅरेथॉन स्पर्धेला आठ हजारापेक्षा जास्त स्पर्धकांनी सहभाग नोंदवला. शिवसेना दिवा शहरप्रमुख, मा. उपमहापौर रमाकांत मढवी यांनी या मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन केले होते. सलग पाच वर्षे आयोजित करण्यात येणाऱ्या या स्पर्धेला अनेक मान्यवरांनी भेट दिली. शिवसेना डोंबिवली शहरप्रमुख राजेश मोरे, उपतालुका प्रमुख बंडू पाटील आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.



**मुंबई ।** शिवसेना प्रणित शिव उद्योग अखिल भारतीय लॉटरी विक्रेता संघटनेचे अध्यक्ष अनुज बाजपेयी यांचा वाढदिवस उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त अनुज बाजपेयी यांनी भाजपा मुंबई अध्यक्ष अॅड. आशिष शेलार यांची भेट घेऊन आशीर्वाद घेतला.या प्रसंगी कामगार नेते मुंबई सचिव जितेन्द्र राऊत यांच्यासह उपाध्यक्ष महेन्द्र दिघे, चिटणीस आशिष मुणगेकर आदीसह अन्य सहकारी उपस्थित होते

# शिव उद्योग संघटनेच्यावतीने भांडुप, नेरुळ, बांद्रा आणि चेंबूर येथे सेंट्रल किचनचे उद्घाटन




प्रतिनिधी
■ मुंबई

शिवसेना प्रणित शिव उद्योग संघटना विविध समितींच्या माध्यमातून महाराष्ट्रात रोजगार आणि स्वयंरोजगाराला चालना देण्यासाठी महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. आपल्या उपक्रमांचा एक भाग म्हणून, शिव उद्योग संघटनेच्या अंतर्गत असलेल्या भोजन समितीने भांडुप, नेरुळ, बांद्रा (पूर्व) आणि चेंबूर येथे सेंट्रल किचनचे उद्घाटन केले आहे.

सेंट्रल किचन मध्ये फक्त भोजन, नाष्टा, चहा इ. तयार करण्यात येणार असून त्याची विक्री करण्याच्या दृष्टीने शिव उद्योग संघटना प्रयत्न करणार आहे. त्यासाठी सेंट्रल किचन कार्यरत असलेल्या विभागातील औद्यागिक केंद्र, रुग्णालय, बँक अशा व्यावसायिक ठिकाणी बहुउद्देशीय विद्युत वाहनाच्या सहाय्याने वितरण करणार आहे.

उद्घाटन सोहळ्याला शिव उद्योग संघटनेचे अध्यक्ष दीपक काळीद, भोजन समिती प्रमुख संतोष आडविलकर, मालमत्ता समिती प्रमुख भालचंद्र डफळ, तसेच केंद्र व्यवस्थापक मंगला लोंढे (भांडुप), रागिणी खामकर (नेरुळ), विमल यादव (बांद्रा) आणि प्रिती बारगोडे (चेंबूर) यांच्यासह विभागातील प्रतिनिधीही उपस्थित होते.

राज्यात रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे आणि स्वयंरोजगाराला चालना देणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे. शिवउद्योग संघटना महाराष्ट्रातील लघुउद्योग आणि उद्योजकांच्या वाढीस पाठिंबा देण्यासाठी वचनबद्ध आहे, असे उद्गार उद्घाटन प्रसंगी शिव उद्योग संघटनेचे अध्यक्ष दीपक काळीद यांनी काढले.

# आई.. बाप्पा आले...



## वाजत गाजत गणराया आले...

**मुंबईच्या पूर्वाश्रमीच्या गिरणगावात म्हणजेच लालबाग - परळमध्ये रविवार लाडक्या बाप्पांचा 'आगमन दिवस' ठरला. ढोल-ताशांच्या गजरात श्री गणरायांच्या विविध रूपातील मनोहारी भव्यदिव्य मूर्तींचे प्रथमदर्शन लाखो गणेश भक्तांनी जल्लोषात घेतले.सार्वजनिक गणेश मंडळांच्या मंडपांकडे जाणाऱ्या या आगमन मिरवणुकांतून प्रचलित विषयांवर जनजागृती करणारे फ्लेक्स घेऊन भाविक महिला ,मुले आगमन मिरवणुकीत सामील झाले होते. एकूण गणेशभक्तांच्या उत्साहाला या मिरवणुकांतून उधाण आले होते.**

छायाचित्रे - अनिल पानस्कर


















# 'तमाशा कलावंताचा आधारवड' जुन्नरचे 'नेराळे'



लेखक
संजय नलावडे
धोलवड, मुंबई

आठ-दहा वर्षे भारतीय शास्त्रीय गायनाचे धडे गिरवल्यानंतर कदाचित एका महान गायकाचा उदय झाला असता. परंतु वडिलोपार्जित व्यवसाय बंद पडल्याने पन्नास एक कुटुंबाच्यासमोर उदरनिर्वाहाचा प्रश्न उभा राहिला. संगीताची वाट अर्ध्यावर सोडून एक चौदा पंधरा वर्षांचा तरूण पुन्हा थिएटरकडे वळला आणि पुढे अनेक वर्षे तमाशा क्षेत्राचा, कलावंतांचा 'आधारवड' झाला. तमाशा कलेचा चालता बोलता इतिहास म्हणून स्वत:ची ओळख निर्माण करणारा हा तरूण म्हणजे लालबाग, मुंबई येथील हनुमान थिएटरचे मालक श्री. मधुकरशेठ नेराळे होय. आधीची गंमत - कालचा तमाशा - आताचं लोकनाट्य या स्थित्यंतराचा, तमाशाचा सुवर्णकाळ अनुभवलेला जुन्या पिढीतील एक महत्त्वाचा साक्षीदार म्हणजे 'श्री. मधुकर नेराळे' होय.

मधुकर नेराळे यांचा जन्म ९ जून १९४३ रोजी जुन्नर येथे झाला. मूळचे ओतूर येथील हे कर्डिले कुटुंब खूप अगोदर जुन्नरला रहायला गेले होते. आजोबांचे कर्जतजवळ नेरळ येथे तेलाच्या व्यवसायानिमित्त दीर्घकाळ वास्तव्य असल्याने 'नेराळे' हे आडनाव पडले असे मधुकर नेराळे सांगतात. वडिल पांडुरंग आणि आई अंजनाबाई या दाम्पत्याने १९४५ साली मुंबईला आल्यावर लालबाग येथे भाजी व्यवसाय सुरू केला. जुन्नरच्या वातावरणात वाढले असल्याने वडिलांना तमाशा कलेची ओढ होती. त्यांनी लालबाग येथील मुख्य रस्त्याच्या मागील बाजूस असलेली झाडाझुडपांची जागा भाड्याने घेऊन साफसफाई केली. बहुसंख्येने गिरणी कामगार असलेल्या या भागात १९४९ मध्ये 'कणात' लावून तिकिटावर तमाशाचा खेळ सुरू केला आणि 'हनुमान थिएटर' अस्तित्वात आले. पुढील पंचेचाळीस वर्षे इतिहास घडला. तमाशाचे मुंबईतील 'प्रमुख केंद्र' आणि तमाशा कलावंतासाठी हनुमान थिएटर एक 'आधार केंद्र' बनले.

मराठी शालेय शिक्षण सुरू असतानाच वडिल पांडुरंग यांनी मधुकरला शास्त्रीय गायन शिकण्यासाठी पं. राजारामजी शुक्ला यांचे मार्गदर्शनाची व्यवस्था केली होती. परंतु अल्पवयातच १९५८ साली पितृछत्र हरपले, भरभराटीला असलेल्या थिएटर व्यवसायात बाहेरील मंडळींची दादागिरी सुरू झाली. कलावंताना वेळेवर पैसे मिळेनात, उपासमारीची वेळ आली. माधवराव नगरकर, तुकाराम खेडकर, पांडुरंग मुळे, दत्ता महाडिक इ. अनेक कलावंतांच्या अंगाखांद्यावर खेळलेल्या मधुकरला ही दैन्यावस्था पाहवली नाही. सात वर्षांची गायन तपस्या भंग झाली. उद्याचा होऊ घातलेला महान भारतीय शास्त्रीय गायक या वडिलांनी पाहिलेल्या स्वप्नाला तिलांजली देऊन उद्ध्वस्त होऊ लागलेल्या पन्नास - साठ कुटुंबाचे संसार पुन्हा उभे करणे पोरवयातील मधुकरला जास्त योग्य वाटले. सातवी पास झाल्यानंतर शाळा सुटली पण थिएटरचा कारभार हळूहळू सुरळीतपणे सुरू झाला. अनेक दिग्गज हरहुन्नरी कलावंताचा सहवास मधुकरला लहान वयातच लाभला. तमाशातील बारकावे, कलावंतांचे स्वभाव, व्यवहार चातुर्य, रंगेल प्रेक्षकांचा धूडगूस या नियमित बाबींना तोंड देत 'मधुकरशेठ नेराळे' नावाचं एक बहुआयामी, चतुरस्त्र व्यक्तिमत्व घडत गेलं.

दिवस रात्र फक्त तमाशा आणि कलावंत यांच्या सहवासात राहिल्याने प्रत्येक कलावंत त्यांना पाहता क्षणी वाचता येऊ लागला. खेडोपाड्यातून आलेल्या अनेक गरीब कलावंतांच्या समस्या त्यांना स्वत:च्या वाटू लागल्या. तमाशाच्या प्रत्येक अंगाचा अभ्यास झाला. अनेक लावण्या, शाहिरी कवणं, पाठांतर झाली. लोककला, लोककलावंत, लोकसाहित्य, शाहिर पठ्ठे बापूराव, भाऊ फक्कड यांच्या साहित्याचा सखोल अभ्यास झाल्यामुळे मधुकर नेराळे यांच्या व्यक्तीमत्वाला आधिकच झळाळी प्राप्त झाली. गिरणगावातील दिग्गज काँग्रेस नेते समाज कल्याणमंत्री स्व. दादासाहेब रूपवते यांचा दीर्घकाळ सहवास व भरभक्कम आधार मधुकर नेराळे यांना लाभल्याने कलावंतांच्या समस्या शासन दरबारी मांडण्यासाठी त्यांनी पुढाकार घेतला. फड मालकांचे आपपसातील वाद हनुमान थिएटरमध्ये बैठका होऊन मनोमीलन होऊ लागले. मधुकर नेराळे यांचे मध्यस्थीने दोन दिग्गज कलाकार एकत्र येऊन नवीन समीकरणं अस्तित्वात येऊ लागली.

'जसराज थिएटर' या स्वत:च्या नाट्यसंस्थेमार्फत १९६९ साली प्रथमच व्यावसायीक रंगभूमीवर आणलेले 'दादू इंदुरीकर यांचा सावळ्या कुंभार आणि प्रभा शिवनेरकरची गंगी' साकारलेले 'गाढवाचं लग्न' प्रयोगाने विक्रमी यश संपादले. गाढवाचं लग्न, आतुन किर्तन वरून तमाशा, राजकारण गेलं चुलीत, उदं गं अंबे उदं, एक नार चार बेजार, पुनवेची रात्र व काजळी जसराजच्या या नाटकांनीही तुफान यश मिळवले. १९७८ मध्ये 'तमाशा कला व कलावंत विकास मंदिर' ही कलावंताचे प्रश्न सोडविण्यासाठी राज्य पातळीवरील संस्था स्थापन करण्यात पुढाकार घेतला, तमाशा कलावंतासाठी अनेक सवलती मिळवल्या. तमाशा कलावंताना बारमाही पगार मिळावा म्हणून योजना आणण्यासाठी प्रयत्न केले पण ते अयशस्वी झाले.

लोककलेची उत्तम जाण आणि अभ्यास असल्याने शासनाच्या अनेक सांस्कृतिक समित्यांवर काम करण्याची संधी मधुकर नेराळे यांना मिळाली. मुंबई दुरदर्शनवर सहा वर्षे चित्रपट पूर्वपरिक्षण समिती सदस्य, मुंबई आकाशवाणीवर कार्यक्रम सल्लागार समिती सदस्य, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेवर आकरा वर्ष कार्यकारिणी सदस्य, जपान महोत्सवात मधुकर नेराळे यांचे नेतृत्वाखाली पाठवलेल्या लावणी संचाची दैदिप्यमान कामगिरी, महाराष्ट्र शासन सांस्कृतिक विभागातर्फे कलावंत पुरस्कार निवड समिती सदस्य, अखिल भारतीय मराठी शाहिर परिषद ही शाहिरांची संघटना स्थापन करून शाहिरी कलेचे प्रश्न सोडविण्याचे कार्य महाराष्ट्रातील मान्यवर शाहिरांच्या सहकार्याने उत्तम प्रकारे केले. महाराष्ट्र विधानसभा निवडणुक - १९८५ मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री स्व. वसंतदादा पाटील यांनी प्रचारासाठी शंभर कलापथकांचं नेतृत्व श्री. मधुकर नेराळे यांच्यावर सोपवलं. महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक खात्याने तमाशा प्रशिक्षण संचालक म्हणून सातारा, लातूर, सांगली, जुन्नर, नाशिक येथे १९९०-९६ कालावधीत शिबीरे आयोजित करून मार्गदर्शन करण्याची जबाबदारी सोपवली. या पाच शिबीरांमधून ७५ मुली, ७५ मुले असे एकूण १५० प्रशिक्षणार्थी उत्तमरित्या तयार केले.

मुंबईत तमाशाला उत्तम प्रतिसाद होता, १९ तमाशा थिएटर होती. पण हळूहळू तमाशा बदलत गेला आणि एकेक करून सर्व थिएटर बंद झाली. सर्वात शेवटी १९९५ मध्ये हनुमान थिएटर बंद झाले. या कलेच्या पवित्र मंदिरात अनेकजण घडले, अनेक कुटुंब उभी राहिली, अनेकांची आयुष्य स्थिरस्थावर झाली. अनेक कलावंताची कारकिर्द एवढी बहरली की आजही तमाशा रसिक विसरले नाहीत. गुलाब संगमनेरकर ही पूर्णपणे उध्वस्त झालेली कलावंत पण मधुकर नेराळे आणि हनुमान थिएटरने तिला पुन्हा उभी केली आणि तिने स्वत:चा फड काढला.

सुप्रसिद्ध सिने अभिनेत्री मधु कांबीकर यांना मराठी चित्रपट घट्ट पाय होवून उभे करण्यात मधुकर नेराळे यांचे मोठे योगदान आहे. महाराष्ट्रातील प्रत्येक तमाशा कलावंताची खूबी मधुकर नेराळे यांना माहित होती. मुंबईत असूनही जुन्नर तालुक्यातील प्रत्येक गावागावातील कलावंत, गावे, रस्ते यांची खडान् खडा माहिती मधुकर नेराळे आजही सांगतात.

आज वयाच्या ७८ व्या वर्षी तब्बेत ठिक नसतानाही तमाशा कलेबद्दलची आत्मियता तसूभरही कमी झालेली नाही. मी जेंव्हा मधुकर नेराळे (बाबा) यांना भेटण्यासाठी गेलो तेंव्हा त्यांच्या बोलण्यातून त्यांना झालेला आनंद ओसंडून वाहताना दिसला. आजच्या तमाशा रसिकांना आणि कलावतांनाही माहित नसलेले अनेक किस्से, संदर्भ उलगडून सांगताना बाबांनी गप्पांची मैफल अशी काही रंगवली की दोन - अडीच तास मी तमाशाचा सुवर्णकाळ अनुभवला. उदाहरणार्थ...लोककला, म्हणजे काय? लावणीचे प्रकार - खरी लावणी, जुंदरी लावणी, पंढरपुरची लावणी, बैठकीची लावणी, ढोलकीच्या फडाची लावणी आणि संगीत बारीची लावणी यातील वेगळेपण काय आहे? बतावणीची लावणी म्हणजे काय? हे समजावून सांगताना हरीभाऊ वडगावकरांनी लिहीलेली आणि दादू इंदुरीकर यांनी सादर केलेली अर्धा तासाची बतावणीची लावणी सांगितली. बैठकीची लावणी हा मराठी लोककलेतील अतिशय गोंडस प्रकार असल्याचं सांगितले. सत्यभामाबाई पंढरपूरकर या कधीही रंगमंचावर नाचल्या नाहीत, आयुष्यभर त्यांनी दिवाणखाना केला पण रसिकांना खिळवून ठेवण्याची कला त्यांना अवगत होती. सोने १६ रू. तोळा असताना सत्यभामाबाईंना ५०० रू. मानधन मिळत असे.

एकदा बालगंधर्व भाऊ फक्कड यांचा तमाशा पहायला गेले होते, त्यानंतर बालगंधर्व यांनी दोन पेट्या रंगीत कपडे भाऊ फक्कड यांना भेट म्हणून पाठवली आणि तमाशात रंगीत कपड्यांना सुरूवात झाली. शाहीर पठ्ठे बापूराव यांचेवर समाजाने गुन्हा दाखल केला तेंव्हा शाहीरांनी 'साहित्य आणि कला' ही कोणा एका समाजाची मक्तेदारी नाही असे ठणकावून सांगितले. एकदा भाऊ फक्कड शाहू महाराजांची भूमिका करत असताना दस्तुरखुद्द शाहू महाराज उपस्थित झाले. सर्वांनी मुजरा केला पण भाऊ फक्कडांनी मात्र दुर्लक्ष केल्याने अनेकांच्या भुवया वर गेल्या. परंतु तमाशा संपल्यावर भाऊंनी,'मी राजा होतो म्हणून मुजरा केला नाही, असे सांगून माफी मागितली, नंतर शाहू महाराजांनी भाऊ फक्कड यांना आपल्या पदरी ठेवले. तमाशाला स्त्री कलावंताची गरज का वाटली? तमाशात घुंगरू केंव्हा आले? वगनाट्य हा प्रकार केंव्हा सुरू झाला? बतावणीचे संवादात्मक, काव्यात्मक आणि विनोदात्मक असे प्रकार, श्रमजीवी तमाशा आणि बुद्धीजीवी तमाशा, स्त्री कलावंतांचा करूण आणि भयानक अंत, आजची तमाशाची अर्थव्यवस्था अशा अनेक विषयांवर बाबा भरभरून बोलले. आजच्या कलावंतांनी साहित्यिक मूल्यांचा अभ्यास केला पाहिजे नाहीतर तमाशाचा आत्मा हरवून जाईल असा संदेशही दिला आहे.

वयाच्या सहाव्या वर्षापासून तमाशा क्षेत्रातील गरीब, मागासवर्गीय कलावंतांच्या अंगाखांद्यावर वयाने व कामाने मोठा होण्याचे भाग्य मला लाभले असे बाबा अभिमानाने सांगतात. मधुकर नेराळे यांच्या कार्याची पोचपावती म्हणजे त्यांना मिळालेले तीन-चारशे पुरस्कार होय. राज्य शासनाचा 'लावणी सम्राज्ञी विठाबाई नारायणगावकर' पुरस्कार, प्राचार्य डॉ. पी.बी.पाटील सोशल फोरम शांती निकेतन, सांगली यांचा 'कर्मयोगी' पुरस्कार, मुंबई, पुणेसह अनेक प्रमुख महानगरपालिकांनी पुरस्कारांनी गौरविले आहे. अशा या बहुआयामी, चतुरस्त्र कला तपस्वीला दीर्घायुष्य लाभो! हीच ईश्वरचरणी प्रार्थना!!

# केंद्रीय मंत्री पियुष गोयल व शिवानंद शेट्टी यांच्या उपस्थितीत दहीकाला उत्सव थाटामाटात साजरा

**प्रतिनिधी**

■ **मुंबई**

गोराई येथील सांस्कृतिक मंडळाला केंद्रीय मंत्री पियुष गोयल व शिवानंद शेट्टी यांची उपस्थिती लाभली. सांस्कृतिक मित्रमंडळाच्या दहीहंडीला सलामी देण्यासाठी मुंबई, ठाणे तसेच उपनगरातील नामवंत गोविंदा पथक सहभागी झाले होते. गोविंदा मंडळे आवर्जून संस्कृती क्रीडा मंडळाच्या दहीहंडीला ६, ७ आणि ८ थरांची सलामी देतात यावर्षी करी रोड येथील श्रीराम मंडळाला पन्नास वर्षे पूर्ण झाल्याने सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच साईबाबा महिला गोविंदा पथकाने ६ थराची सलामी दिली.



कमी वेळेत जास्त गोविंदा मंडळे आल्याने एकाच वेळेत दोन दोन मंडळांना सलामी देण्याची संधी मिळाली तसेच लोअर परळ येथील अशोक मित्र मंडळ गोविंदा पथकाला ६० वर्षे पूर्ण झाल्याने शेवटची हंडी फोडण्याचा मान या पथकाला देण्यात आला. मंगळवारी रात्री साडे दहा वाजता ७ थर रचून संस्कृती मित्र मंडळाची शेवटची हंडी अशोक मित्रमंडळाने फोडण्याचा मान या मंडळाला चषक देऊन सन्मानित करण्यात आले. हा संपूर्ण कार्यक्रम पार पाडण्यासाठी घनश्याम गोसावी तसेच सुयोग महाडिक, भिवा जाधव व इतर मान्यवरांची उपस्थिती लाभली.

# आमदार प्रविण दरेकरांना 'उत्कृष्ट संसदपटू' पुरस्कार

■ **मुंबई**

राष्ट्रकूल संसदीय मंडळ महाराष्ट्र शाखेतर्फे देण्यात येणारा महाराष्ट्र विधानपरिषद 'उत्कृष्ट संसदपटू' पुरस्कार भाजपा गटनेते आमदार प्रविण दरेकर यांना जाहीर झाला आहे. मंगळवार ३ सप्टेंबर २०२४ रोजी दुपारी ३. ३० वाजता राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या शुभहस्ते विधान भवनाच्या मध्यवर्ती सभागृहात हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.



विधिमंडळाच्या कामकाजातील नियमित सहभाग, विधिमंडळाच्या नियमांचे काटेकोर पालन, विधिमंडळात उपस्थित करावयाच्या विषयांचे आकलन, उपस्थिती, विषय मांडताना वापरलेले ज्ञान, कौशल्य, निवडलेले मुद्दे, वक्तृत्व शैली, दर्जेदार उत्कृष्ट भाषणे या सर्व गोष्टी पडताळून पाहून पुरस्कारांसाठी नेमलेल्या तज्ज्ञ समितीकडून या पुरस्काराची शिफारस केली जाते. त्यानुसार राष्ट्रकूल संसदीय मंडळाकडून हे पुरस्कार जाहीर केले जातात. भाजपा गटनेते आमदार प्रविण दरेकर यांना 'उत्कृष्ट संसदपटू' पुरस्कार जाहीर झाल्याने मागाठाणे विधानसभा मतदारसंघात सर्वत्र त्यांचे कौतुक आणि अभिनंदनाचा वर्षाव केला जात आहे.

# धारावीतील एनजीओ सर्वेक्षणाच्या समर्थनार्थ मैदानात

## धारावीच्या बाहेर राहणाऱ्या लोकांकडून प्रकल्पाला विरोध होत असल्याचा आरोप

**प्रतिनिधी**

■ **मुंबई**

धारावीतील अनेक सेवाभावी संस्था (एनजीओ) धारावी पुनर्विकास प्रकल्पासाठी मैदानात उतरल्या असून त्यांनी धारावीत सध्या सुरू असलेल्या शासकीय सर्वेक्षणाला आपला लेखी पाठिंबा दर्शविला आहे. राज्य शासनाला सादर केलेल्या लेखी निवेदनात सर्वेक्षणाचे समर्थन करतानाच, अपप्रचार करून सर्वेक्षणात खोडा घालणाऱ्या धारावी बाहेर राहणाऱ्या लोकांवर देखील टीका केली आहे.

धारावीतील सर्वेक्षणाला आपला पाठिंबा दर्शवण्यासाठी या सेवाभावी संस्थांनी राज्य सरकारच्या अखत्यारीतील, धारावी रिव्हलपमेंट प्रोजेक्ट /झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण (डीआरपी/एसआरए) यांना एक निवेदन सादर केले आहे. हे शासकीय प्राधिकरण, धारावी पुनर्विकास प्रकल्पाची अंमलबजावणी करणाऱ्या अदाणी समूहाच्या कामकाजावर देखरेख करते.

गेल्या अनेक वर्षांपासून धारावीत आरोग्य शिक्षण आणि महिला सबलीकरणासह विविध सामाजिक विषयांवर काम करणाऱ्या एकूण 8 सेवाभावी संस्था आणि सिटीजन वेल्फेअर असोसिएशन यांनी डीआरपीच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांची भेट घेऊन धारावीत सध्या सुरू असलेल्या शासकीय सर्वेक्षणाला धारावीकरांचा पाठिंबा असल्याचे निवेदन सादर केले.

धारावी सर्वेक्षणाला आपले समर्थक जाहीर करतानाच ग्लोबल गिविंग फाउंडेशन आणि ऑल इंडिया पोलीस जनसेवा संघटनेचे पदाधिकारी नूर मोहम्मद यांनी पुनर्विकास संदर्भात 13 महत्त्वाच्या विषयांबाबत प्राधिकरणाकडे स्पष्टीकरण मागितले. पुनर्विकसित घरात स्थलांतरित होणाऱ्या नागरिकांना मेंटेनन्सच्या बिलातून किती वर्षे सूट दिली जाईल? जानेवारी 2000 नंतर धारावीत वास्तव्यासाठी आलेल्या नागरिकांच्या घरांबाबत नेमका काय निर्णय घेणार? यांसह अनेक महत्त्वाच्या विषयांवर मोहम्मद यांनी लक्ष वेधले आहे.

सर्वेक्षणाला समर्थन देणाऱ्या, 20 ऑगस्ट 2024 च्या लेखी निवेदनात एनलाईटन फाउंडेशन या संस्थेने लिहिले आहे की, धारावीतील रहिवासी आणि धारावीतील व्यावसायिक या दोघांचाही पुनर्विकास प्रकल्पाला किंवा सर्वेक्षणाला कोणत्याही प्रकारचा विरोध नाही. "पुनर्विकास प्रकल्पाला विरोध करणारे मूठभर लोक हे मूळचे धारावीच्या बाहेर राहणारे आहेत. स्वतःच्या फायद्यासाठी पुनर्विकासाला विरोध दर्शवणाऱ्या लोकांना धारावीतील रहिवाशांच्या समस्यांची जाणीव देखील नाही"अशा शब्दांत फाउंडेशनचे संस्थापक राजेश कुमार पनीरसेल्वम यांनी आपली प्रतिक्रिया दिली.

छत्रपती शिवाजी महाराज सहकारी गृहनिर्माण संस्थेने देखील धारावी पुनर्विकास आणि सर्वेक्षणाला समर्थन देणाऱ्या निवेदनात म्हटले आहे की, गेल्या अनेक दशकांपासून प्रलंबित असलेल्या धारावी पुनर्विकास प्रकल्पाला आता गती प्राप्त झाली असून आम्ही यासाठी आमचा पाठिंबा दर्शवतो. गेल्या अनेक पिढ्यांनी पुनर्विकासाचे स्वप्न पाहिले मात्र सुदैवाने आमच्या हयातीत हे स्वप्न लवकरच पूर्ण होणार आहे, याचे आम्हाला समाधान आहे.

धारावीतील तामिळ समाजाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या थेवर समाजम यांनी देखील सर्वेक्षणाला पाठिंबा दिला असून धारावी पुनर्विकास प्रकल्प, त्यासाठी होणारे सर्वेक्षण या अनेक दशकांपासून प्रलंबित असलेल्या ऐतिहासिक घडामोडींचे साक्षीदार बनणार असल्याचे म्हटले आहे.

धारावीकर आयर्न ग्रुप आणि ओम श्री गौरी मित्र मंडळ या तरुणांच्या संघटनांनी देखील धारावीतील सर्वेक्षणाला पाठिंबा दर्शवला आहे. "धारावीकरांच्या अनेक पिढ्यांनी मूलभूत सुविधांसाठी संघर्ष केला आहे. अनेक दशकांपासून धारावीकरांनी पाहिलेले पुनर्विकासाचे स्वप्न आता दृष्टीपथात येत आहे. म्हणून धारावीतील तरुणांचा या पुनर्विकास प्रकल्पाला आणि सर्वेक्षणाला पाठिंबा आहे"असे या निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे.

धारावीतील पोलीस आणि इतर सरकारी अधिकाऱ्यांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या 'ऑल इंडिया पोलीस जनसेवा संघटने'ने आपल्या निवेदनात सरकारकडे एक महत्त्वाची मागणी केली आहे. बाहेरील लोकांकडून धारावीत संभ्रमाचे वातावरण तयार केले जात असून शासनाने समोर येऊन धारावीकरांना सत्य परिस्थिती सांगायला हवी, अशी मागणी या निवेदनात करण्यात आली आहे.


धारावी रीडेव्हलपमेंट प्रोजेक्ट प्रायव्हेट लिमिटेड हा उपक्रम महाराष्ट्र राज्य शासन आणि अदाणी समूह यांच्या भागीदारीतून संयुक्त उपक्रम असून त्याला राज्य सरकारच्या विशेष प्रकल्पाचा दर्जा देण्यात आला आहे. धारावीकरांचे अद्ययावत घरांचे स्वप्न पूर्ण करतानाच त्यांच्या राहणीमानाचा दर्जा वाढवण्यासाठी डीआरपीपीएलच्या माध्यमातून प्रयत्न सुरू आहेत. दळणवळणाची अत्याधुनिक साधने, अखंडित वीज- पाणीपुरवठा, प्रदूषणमुक्त आणि स्वच्छ परिसर यांसह जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधा धारावीकरांना या प्रकल्पातून दिल्या जाणार आहेत.

## मनोरंजन शब्दकोडे



**आडवे शब्द :**
१) नक्षीकाम ५) एकमोठेफळ ८) मनुष्यवाजनावरांच्याहालचालीचाआवाज ९) उत्तराधिकारी ११) पळून गेलेली व्यक्ती १३) जोरात रडणे १४) कर्म १५) मच्छी १७) लहान खोलगट चमचा १८) कपडा १९) सहावी तिथी २१) काल्पनिक नगर २४) माळ २५) राख २६) स्त्रियांना बांगड्या भरणारा २८) फिरस्त्या मनुष्य ३१) ऊर्जा ३४) अतिशय गडद रंग ३५) माकड ३६) एक फळभाजी ३७) आरूढ झालेला ३८) एक कंदमूळ

**उभे शब्द :**
२) तीव्र इच्छा ३) शिक्षा ४) मस्ती, गुर्मी ५) हिंदू पंचांगातील दुर्मिळ योग ६) रेडा ७) सिंहाची गर्जना १०) सारखे ११) दुसऱ्यावर अवलंबून असलेला १२) विष्णू पत्नी १६) एका पातळीत असलेला १७) हुद्दा १९) जुने क्रीडा पाक्षिक २०) वजन २१) दर्पण २२) पलीकडे २३) माया २४) जवळीक २६) काक २७) साप्ताहिक सुट्टीचा दिवस २९) माझे ३०) महिला नाट्य कलाकार ३२) लोक ३३) इथे कासव महोत्सव भरतो ३४) एक फळ




चित्रातील ५ फरक ओळखा

स्टाईल मारो



विधी भोवड

चित्र रंगवा



## बाल चित्ररंग



वृद्दी देवेन्द्र म्हात्रे
नॅशनल इंग्लिश प्रायमरी स्कूल, विरार (प.)
इयत्ता ३री



## बाल चित्ररंग



आदिराज राहुल कदम
माणिक विद्या मंदिर वांद्रे
इयत्ता ५वी

